
प्रतिभेच्या
प्रांतातील
प्रवास
वाचस्पती अशोक निरफराके

डॉ. अशोक निरफराके

❋ १९६४ साली शालान्त परीक्षेत महाराष्ट्रात सर्वप्रथम

❋ एम.ए. (मानसशास्त्र) परीक्षेत पुणे विद्यापीठात सर्वप्रथम आल्याबद्दल सुवर्णपदक

❋ 'प्रतिभेचा विकास' या विषयावर प्रायोगिक पद्धतीने संशोधन करून पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच्.डी.) पदवी

❋ 'जपानी संस्कृती आणि प्रतिभा' या विषयीच्या संशोधनासाठी जपानमधील नागोया विद्यापीठात सव्वा वर्ष वास्तव्य

❋ पुण्यातील ज्ञान प्रबोधिनीच्या प्रज्ञा मानस संशोधिकेमध्ये दहा वर्षे संशोधक प्राध्यापक

❋ मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत या भाषांमधून काव्यलेखन व गद्यलेखन

❋ 'नादेशिको' हा मराठी कवितांचा संग्रह प्रकाशित

❋ मराठी व हिंदी गीते ज्ञान प्रबोधिनीच्या विविध प्रकाशनांमध्ये समाविष्ट

❋ काही जपानी कवितांचा व गीतांचा मराठीतील पद्यानुवाद वेळोवेळी 'हंस' मासिकाच्या अनुवाद विशेषांकांमधून प्रकाशित

❋ शाकुंतलातील श्लोकांचा मराठीत पद्यानुवाद

❋ 'प्रभावी व्यक्तिमत्त्व' या पुस्तिकेचे सहलेखक

❋ 'मनाचा शोध', 'मराठी नाटक आणि मनोविकृती' इत्यादी पुस्तकांमध्ये लेख समाविष्ट

❋ 'कल्पक बनू या' या पुस्तकाचे लेखक

प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास

(ललित लेखनाची कृतिपुस्तिका)

लेखक

डॉ. अशोक निरफराके

शैक्षणिक उपक्रम संशोधिका-प्रकाशन तिसरे

ज्ञान प्रबोधिनी

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास
(ललित लेखनाची कृतिपुस्तिका)

प्रकाशक :
श्री.वि.शं.देशपांडे,
कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ४११०३०

मुद्रक :
संपादक, छात्र प्रबोधन, पुणे ४११०३०

लेखक :
डॉ.अशोक निरफराके,
'भवानीकृपा', २६० सहकारनगर क्र.१, पुणे ४११००९

अक्षरजुळणी :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी पुणे

मुखपृष्ठ चित्रकार :
दीपक संकपाळ

प्रथम आवृत्ती : राष्ट्रीय सौर श्रावण, शके १९१७, ऑगस्ट १९९५
पुनर्मुद्रण : राष्ट्रीय सौर मार्गशीर्ष, शके १९२१,डिसेंबर १९९९

किंमत रु. ५०/-
Pratibhechya Prantateel Pravas
(A workbook of Literary Creativity)
by Dr.Ashok Nirpharake, in Marathi

माझी आई

के.ती.सरस्वती माधवराव निरफराके

हिला...

माहेरच्या गरिबीमुळे बिजवराशी लग्न,
पुढे सासरची परिस्थितीही डबघाईची,
पण, 'मी भाजी विकण्याचा पारंपरिक व्यवसाय
करणार नाही.' असं म्हणून
ती जिद्दीनं शिकली आणि शिक्षिका झाली.
कंदिलाभोवती एकत्र अभ्यास करताना
तिनं लिहिलेले निबंध आणि कविता वाचूनच
बहिणीला आणि मला लेखनाची स्फूर्ती झाली.
आमच्या लेखनाला तिनं चिकित्सक उत्तेजन दिलं.
लेखन ही कुणाचीही जन्मजात मिरासदारी नाही, हे सांगितलं.
पानशेतचा प्रलय, मुलीचा मृत्यू आणि वैधव्य अशा संकटांवर
मात करून ती ताठ उभी राहिली.
आणि 'सावित्रीबाई फुले महिला मंडळा'च्या माध्यमातून सामाजिक
कार्यही करत राहिली.
तिच्यामुळेच मी 'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास' सुरू केला आहे..

\- अशोक

प्राक्कथन

ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक उपक्रम संशोधिकेची स्थापना दि.८ ऑगस्ट १९९२ या दिवशी झाली. गेल्या तीन वर्षांत शैक्षणिक उप्रकम संशोधिकेतर्फे दोन पुस्तके प्रकाशित झाली. 'छात्र प्रबोधन' मासिक सुरू करण्यात आले. शिक्षक, मुख्याध्यापक व विद्यार्थ्यांसाठी अनेक कृति-सत्रे घेण्यात आली.

ज्ञान प्रबोधिनीत चालू असलेल्या अनेक उपक्रमांपैकी पहिल्या तीन वर्षांसाठी पाच उपक्रम शैक्षणिक संशोधिकेतर्फे निवडले होते. आशयप्रधान शिक्षणाकडून प्रक्रियाप्रधान शिक्षणाकडे जाण्याच्या दृष्टीने महत्त्वाची प्रक्रिया, कौशल्ये शिकवण्याचे हे उपक्रम होते.

त्यांपैकी स्वयंअध्ययन कौशल्ये, वाचन कौशल्ये आणि प्रकल्पांद्वारे अध्ययन या विषयांची पुस्तके तयार झाली. प्रशिक्षण अभ्यासक्रमही तयार झाले. प्रतिभाशक्तीच्या विकासासाठी प्रतिभाशाली लेखन करायला शिकविणे हा उपक्रमही ज्ञान प्रबोधिनीत अनेक वर्षे चालू आहे. मे ९४ मध्ये अन्य विद्यार्थ्यांसाठीही याचे प्रशिक्षण वर्ग झाले. त्याच सुमारास 'छात्र प्रबोधन'मध्ये वाचस्पती अशोकराव निरफराके यांची या विषयावर लेखमाला येत होती. इतर विषयांप्रमाणे ललित-लेखन हाही अभ्यासाचा व आनंद देणारा विषय आहे हे ते त्यामध्ये मांडत होते.

गाणी व गोष्टी लिहायला शिकायचे म्हणजे बाकीचा अभ्यास किंवा खेळ सोडून द्यायचे ? तसे करण्याची काहीच गरज नाही. अभ्यासाबरोबरच्या खेळ, विविध गुणदर्शन इत्यादी उपक्रमांना किंवा आपापल्या चित्रकला, गायन, वादन, नृत्य इत्यादी वैयक्तिक छंदांना तुम्ही जेवढा वेळ देता तेवढा वेळ यासाठी दिलात तरी पुरे. ललित लेखन हा शालेय वयात जोपासण्याजोगा आणि पुढे अतिशय उपयोगी पडणारा छंद आहे हेच पुष्कळांना माहीत नसते. शिवाय भाषेच्या अभ्यासाला या छंदाचा खूप उपयोग होतो हे वेगळेच ! तर या नव्या छंदाचा आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या या आगळ्या पैलूचा तुम्हांला परिचय करून देण्यासाठी हे पुस्तक लिहिले आहे.

हे पुस्तक आणि याबरोबरच प्रकाशित होणारे 'कल्पक बनू या' यांचा वर्गामध्ये अध्यापकांना प्रतिभाविकसन विषय शिकविण्यासाठी उपयोग होईल. पालकांना घरी आपल्या मुलांसाठी यांचा वापर करता येईल आणि विद्यार्थ्यांना स्वत:लाही ही पुस्तके वाचून आपली प्रतिभाशक्ती वाढवता येईल.

- वा.गिरीश श्री.बापट
संचालक, ज्ञान प्रबोधिनी

अनुक्रमणिका

प्रस्तावना

आपल्याकडच्या शालेय अभ्यासक्रमात चित्रकलेला स्थान आहे. संगीताला आहे, हस्तकलांना आहे; पण ललित-लेखन-कलेला मात्र नाही ! ते का नसावे? या अस्वस्थतेतून हे पुस्तक लिहिले गेले आहे.

आपल्याला लिहिता येते हा शोध माझ्या शालेय जीवनात मला अपघातानेच लागला; पण त्यावेळी या क्षमतेच्या विकासाची शालेय जीवनात काहीच सोय नव्हती. हस्तलिखिते, नियतकालिके, निबंधस्पर्धा आणि स्नेहसंमेलनात बसवायचे कार्यक्रम यातून जो काही वाव मिळेल तेवढाच. अजूनही बहुतेक सर्व शाळांतून थोड्या फार फरकाने हीच परिस्थिती आहे. प्रतिभा ही उपजत असते आणि तिचा विकास ज्याने त्याने आपला आपण चुकतमाकत करायचा असतो, ही गैरसमजूत या परिस्थितीच्या मुळाशी आहे.

आधुनिक मानसशास्त्राने ही गैरसमजूत खोटी ठरवली आहे. प्रतिभेचा गाभा असलेली कल्पनाशक्ती प्रत्येकालाच लाभलेली असते आणि प्रशिक्षणाने तिचा विकास होऊ शकतो; उलट तिच्या मार्गात चाकोरीची सक्ती, अपयशाची भीती किंवा टिंगलटवाळी आणि उपेक्षा असे अडथळे उभे केले तर ती कोळपून जाते, हे आता संशोधनाने सिद्ध झाले आहे. मी स्वत:सुद्धा गेली २५-३० वर्षे याच क्षेत्रात संशोधन आणि प्रयोग करतो आहे. (त्या संशोधनाचा तपशील या पुस्तकाच्या शेवटच्या प्रकारणात पाहायला मिळेल.) त्या संशोधनावर हे पुस्तक आधारलेले आहे.

या पुस्तकाची ललित-लेखन-कलेच्या टप्प्यांनुसार तीन विभागांत विभागणी केली आहे. पहिले दोन भाग अभिव्यक्ती-कौशल्याबद्दलचे आहेत. त्यातला पहिला शब्दप्रभुत्व मिळविण्याबद्दलचा, तर दुसरा रचना-प्रभुत्व मिळविण्याबद्दलचा आहे. तिसरा भाग आशयाबद्दलचा, आशय संपन्न होण्यासाठी, अभिनव असण्यासाठी अनुभव-क्षमता वाढविण्याबद्दलचा आहे. इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी हे पुस्तक आपणहून कृतिपुस्तिकेप्रमाणे वापरू शकतील अशा रीतीने ते लिहिलेले आहे. शेवटचे प्रकरण शिक्षकांसाठी आहे. ते वाचणाऱ्या शिक्षकांना, जागरूक पालकांना किंवा शालेय विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व-विकास वर्ग योजणाऱ्या विविध संस्थांच्या कार्यकर्त्यांना आपापल्या विद्यार्थ्यांसाठी अथवा पाल्यांसाठी या पुस्तकातले सर्जनशीलता वाढवणारे पाठ सहज घेऊन पाहता येतील. किंबहुना, ललित लेखन नव्यानेच करू इच्छिणाऱ्या कोणत्याही वयाच्या व्यक्तीला हे पुस्तक उपयोगी पडू शकेल.

गेल्या पिढीमध्ये कै.ना.सी.फडके यांनी शिकाऊ लेखकांना मार्गदर्शन करण्यासाठी 'प्रतिभा-साधन' हे पुस्तक लिहिले होते. विविध कारणांनी ते वादग्रस्तही झाले होते; पण ते पुस्तक आणि हे पु[illegible]यांची भूमिका, मांडणी आणि मानसशास्त्रीय संशोधनाचा आधार

यांमध्ये खूपच तफावत आहे हे दोन्ही पुस्तके वाचणाऱ्यांच्या सहज लक्षात येईल. त्यामुळे वाचकांकडून तशी गल्लत केली जाऊ नये अशी अपेक्षा आहे.

या पुस्तकातला काही भाग 'छात्र प्रबोधन' या ज्ञान प्रबोधिनीच्या मासिकातून प्रसिद्ध झाला आहे. शिक्षकांसाठीच्या प्रकरणातला काही भाग 'शिक्षणसमीक्षा' या द्वैमासिकात प्रसिद्ध झाला आहे. 'प्रतिभा आणि कल्पकता' हे परिशिष्ट 'कल्पक बनू या' या माझ्या पुस्तकातून घेतले आहे. प्रतिभेविषयीच्या सैद्धान्तिक मांडणीला पूरक ठरावे या हेतूने ते पुनर्मुद्रित केले आहे. दोन्ही पुस्तकांना जोडणाऱ्या सेतूचे काम हे परिशिष्ट करील.

'छात्र प्रबोधन'च्या संपादकांच्या आग्रहामुळेच हे पुस्तक लिहून झाले. या पुस्तकात जागोजागी दिलेली 'ज्ञान प्रबोधिनी' प्रशालेतील मुलामुलींच्या लेखनाची उदाहरणे, प्रज्ञा मानस संशोधिकेमधील सगळ्यांच्या प्रेमळ आजी श्रीमती कमलाताई भट यांनी मुलामुलींच्या वह्यांमधून वेळच्या वेळी चिकाटीने टिपून ठेवल्यामुळेच उपलब्ध होऊ शकली. या संशोधनातल्या प्रयोगांसाठी ज्ञान प्रबोधिनीतले संबंधित कार्यकर्ते आणि शिक्षक यांचे सहकार्य लाभले आणि येथील विद्यार्थ्यांचा, तसेच इतर अनेक संस्थांमधल्या विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा उत्साही प्रतिसाद लाभला. (त्या इतर संस्थांची नावे शेवटच्या प्रकरणात आलेलीच आहेत.) या पुस्तकाची मुद्रणप्रत सिद्ध करण्यासाठी कु.श्रद्धा तीर्थळी हिची खूप मदत झाली. या सगळ्यांना मन:पूर्वक धन्यवाद !

हे पुस्तक नुसते सलग वाचून संपवायचे नसून वापरून पाहायचे आहे. त्यामुळे ते वापरल्यानंतरच्या, विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या प्रतिक्रिया आणि सूचना यांची प्रतीक्षा आहे.

ऑगस्ट १९९५ **- अशोक निरफराके**

प्रवासाला निघण्यापूर्वी...

विद्यार्थी मित्रांनो, कवी, कथालेखक, कादंबरीकार, नाटककार, चित्रकार, शिल्पकार, संगीतकार, शास्त्रज्ञ या सगळ्यांमध्ये समान असलेला गुण कोणता? विचार करून पाहा. तुमच्या लक्षात येईल की या सगळ्यांना सतत नवीन कल्पना सुचत असतात आणि सुचलेल्या कल्पना हे लोक शब्द, रंग, रेषा, माती, दगड, सूर, ताल, आकडे, चिन्हे, यंत्रे, उपकरणे वगैरेमधून व्यक्त करत असतात. हे करण्याची बौद्धिक शक्ती म्हणजेच कल्पनाशक्ती किंवा प्रतिभा. साहजिकच या प्रतिभेच्या देशामध्ये साहित्य, चित्रकला, शिल्पकला, गायन-वादन-नृत्य यांनी बनलेले संगीत, विज्ञान, तंत्रज्ञान, वास्तुकला, व्यवहारचातुर्य असे अनेक प्रांत आहेत. त्यातल्या साहित्य या प्रांताच्या सफरीवर तुम्हांला जावेसे वाटावे आणि त्या सफरीची सुरुवात कशी करायची हे समजावे; म्हणून हे छोटे पुस्तक खास तुमच्यासाठी लिहिलेले आहे.

साहित्य हा प्रतिभेचा प्रांत कसा आहे ? शिशुशाळेतल्या बडबड-गीतांपासून आतापर्यंतच्या सर्व इयत्तांच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये तुम्हांला त्याची झलक दिसलेली आहेच; पण कदाचित ती झलक बघताना परीक्षेच्या दडपणामुळे या प्रांतातील सौंदर्यस्थळांकडे तुमचे दुर्लक्ष झाले असेल. तुमच्यापैकी ज्यांना वाचनाचा छंद असेल त्यांनी पाठ्यपुस्तकाशिवाय कवितासंग्रह, कथासंग्रह, कादंबऱ्या, रहस्यकथा, विज्ञानकथा, नाटके अशी इतर पुस्तकेही वाचलेली असतील. तथापि साहित्यातल्या सौंदर्याचा आस्वाद कसा घ्यावा हे सांगण्यासाठी हे पुस्तक लिहिलेले नाही !

मग या पुस्तकात काय आहे ?

आतापर्यंत तुम्ही इतर कवींनी आणि लेखकांनी लिहिलेल्या कविता, गाणी, गोष्टी, नाटके इ. फक्त वाचत आलात. कधी परीक्षेसाठी तर कधी मनोरंजनासाठी; पण **आपणच अशी गाणी किंवा गोष्टी लिहाव्यात असे तुम्हांला कधी वाटले आहे काय ?** वाटले नसले तर वाटू द्या. वाटले असले; पण 'आपल्याला कुठले ते जमायला' अशी शंका जर तुम्हांला पडलेली असली, तर मी तुम्हांला सांगतो की **असे लेखन करणे तुम्हांला नक्की जमू शकेल**. तुम्हांला जर गप्पा मारता येतात, पत्रलेखन करता येते, निबंध लिहिता येतो, मुद्द्यांवरून गोष्ट लिहिता येते, तर गाणी, कविता आणि गोष्टीसुद्धा लिहिता यायलाच पाहिजेत !

पाठ्यपुस्तकातल्या कविता आणि कथा वाचून जर तुम्हांला स्वत:बद्दल शंका वाटत असली, तर हे विसरू नका की त्या त्या कथा-कविता त्या लेखकांनी लहानपणी लिहिलेल्या नसतात. अगदी प्रसिद्ध लेखकांचीही प्रतिभेच्या प्रांतातली सुरुवातीची पावले अडखळतीच असतात. तेव्हा तुम्ही सुरुवातीला अडखळलात तरी घाबरण्याचे कारण नाही. तुमच्यातसुद्धा

उद्याचा एखादा प्रतिभावंत साहित्यिक दडलेला असेल. हे मी एवढ्या ठामपणे म्हणतो आहे ते आधुनिक मानसशास्त्राच्या आधारे. मानसशास्त्र आपल्याला सांगते की आपल्यापैकी प्रत्येकांमध्येच प्रतिभा ही बौद्धिकशक्ती थोड्या फार प्रमाणात असते. कधी जागी तर कधी झोपलेली. तुम्ही झोपलेले असता तेव्हा तुम्हांला स्वप्ने पडतात की नाही? नुसती ही स्वप्ने जरी सकाळी उठल्याउठल्या लिहून ठेवलीत तरी तुम्हांला कळेल की आपल्याला किती भन्नाट कल्पना सुचत असतात! **तुमच्यातल्या या झोपलेल्या प्रतिभेला चांगली जागी करून कामाला लावण्यासाठी हे पुस्तक लिहिलेले आहे.**

प्रतिभेला जागे करून ललित लेखन करायला शिकायचे ते कशासाठी ? स्वत:चा शोध घेण्यासाठी आणि स्वत:चा विकास करण्यासाठी! आणि नंतर आपल्या या विकासाचा इतरांना उपयोग व्हावा म्हणून. वाल्मीकी आणि व्यासांपासून कुसुमाग्रजांपर्यंत सगळे साहित्यिक लोकांना कधी आनंद देतात, कधी झोपेतून जागे करतात, तर कधी डिवचतात आणि मोठ्या कार्याची प्रेरणा देतात; म्हणूनच समाजदेखील साहित्यिकांना आणि प्रतिभावंतांना मोठे मानत असतो, त्यांचा गौरव करत असतो, त्यांच्याविषयी कृतज्ञता बाळगत असतो.

हे पुस्तक कसे वापराल ?

हे पुस्तक नुसते सलग वाचून बाजूला ठेवण्याचे नाही. त्यातल्या वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये ललित लेखनाचे वेगवेगळे टप्पे दिलेले आहेत. सोप्यापासून अवघडाकडे असा त्यांचा क्रम आहे. सुरुवातीला त्या टप्प्याची सोप्या शब्दांत माहिती आणि नंतर त्याचा सराव करण्यासाठी पुष्कळसे भाषिक खेळ आणि कृतिपाठ प्रत्येक प्रकरणात तुम्हांला आढळतील. या कृतिपाठांसाठी तुमच्या एवढ्याच मुलामुलींनी या पूर्वीच्या मी घेतलेल्या शिबिरांमध्ये आणि वर्गांमध्ये लिहिलेली उत्तरे ही नमुन्यादाखल दिलेली आहेत. ती वाचल्यानंतर तुम्हीसुद्धा तुमच्या वहीत तुमची उत्तरे लिहावीत अशी अपेक्षा आहे. तुमची उत्तरे तुम्ही स्वत:च तपासायची आहेत आणि त्यात सुधारणा करायच्या आहेत. त्यासाठीदेखील जागोजागी सूचना दिलेल्या आहेत. तुम्हांला तुमच्या पालकांची किंवा एखाद्या शिक्षकांची मदत मिळाली तर उत्तमच. नाही मिळाली तरी एकलव्याच्या पद्धतीने तुम्ही हे पुस्तक वापरू शकता. पुढचा भाग आधी वाचला तरी बिघडणार नाही; पण लेखनकला शिकण्यासाठी मात्र दिलेल्या क्रमानेच पाठ सोडवा.

करा तर शुभारंभ !

भाग १ : शब्दांशी दोस्ती

आपली कल्पनाशक्ती कवी किंवा लेखक यांच्यासारखी व्हायला हवी असेल, तर आपल्याकडे 'शब्दप्रभुत्व ' असायला हवे. म्हणजे शब्दांवर आपली हुकूमत चालली पाहिजे. हव्या त्या वेळी हव्या त्या प्रकारचा म्हणजे हव्या त्या अर्थाचा, हव्या त्या लांबी-रुंदीचा आणि हव्या त्या नादाचा (आवाजाचा) शब्द आपल्याला सुचला पाहिजे. खूप वाचन केले आणि त्यामुळे खूप शब्दांचे अर्थ माहीत झाले, एवढे त्यासाठी पुरेसे नाही. तर आपण शब्द स्वतंत्रपणे वापरीत राहिले पाहिजे. असे शब्द वापरण्यासाठी आणि वाकवण्यासाठी हे काही खेळ खेळून पाहा.

१) अनुप्रास असलेले वाक्य लिहिणे

उदा.– '*पप्पूला पांडूने पळवून पंढरपूरला पोहचविल्याचे पाहून पंतांची पगडी पर्वतीच्या पायथ्याशी पडली*' या वाक्यातला प्रत्येक शब्द 'प' च्या बाराखडीतल्याच अक्षराने सुरू झालेला आहे. अशा रीतीने ठराविक अक्षर पुन:पुन्हा वाक्यात येणे म्हणजेच अनुप्रास. अशी काही अनुप्रास असलेली वाक्ये तुम्ही लिहून पाहा.

लगेच सुचत नसले तर काय कराल ? प्रथम 'प'ने सुरू होणारी माणसांची काही नावे, आडनावे, ठिकाणांची नावे, वस्तूंची नावे, विशेषणे, क्रियापदे इत्यादींच्या याद्या तयार करा. या याद्या समोर ठेवल्या की त्या शब्दांच्या जुळणीतून मोठमोठी वाक्ये तयार होऊ लागतील. 'प' ची वाक्ये जमल्यानंतर तुम्हांला हव्या त्या अक्षराची बाराखडी घ्या आणि त्या अक्षरांचा असा ' अनुप्रास ' साधणारी लांबलचक वाक्ये तयार करा.

'छात्र प्रबोधन'च्या काही वाचकांनी लिहून पाठवलेली ही पाहा काही वाक्ये-

१) ***खंडूने खोडदच्या खंडोबाजवळचे खारीक खोबरे खारीच्या खुबीने खाल्ले.***

(पराग जोशी, आठवी, धुळे) *

२) ***गाणगापूरच्या गलेलठ्ठ गणू गवळ्याने गोड गुलाबजाम गिळून गंगाखेडच्या गणपतरावांच्या गुबगुबीत गादीवरून गावकऱ्यांसमोर गोड गाणे गायले.***

(राहुल काडगे, सांगली)

* जेव्हा विद्यार्थ्यांच्या नावांपुढे फक्त इयत्ता लिहिलेली असेल, तेव्हा ते विद्यार्थी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील होते असे समजावे. इतर संस्थांतल्या विद्यार्थ्यांच्या नावांपुढे त्यांच्या संस्थेचाही उल्लेख केलेला आहे. सर्वांच्या इयत्ता प्रयोगाच्या वेळच्या आहेत. या पुस्तकातील मजकूर लेखमालिकेच्या स्वरूपात 'छात्र प्रबोधन' मासिकातून प्रकाशित होत असताना वाचकांनी दिलेल्या प्रतिसादांतून निवडलेली उदाहरणे वापरताना, वाचकाच्या नावापुढे त्याच्या/तिच्या गावाचा उल्लेख केलेला आहे.

३) परवा परवाच परशुरामपंतांच्या पुत्राने पंडितने, पाठकांच्या पैशाची पांढरी पिशवी पळवली. पंडितला पकडण्यासाठी पाठकांनी पाच पोलीस पाठविले. पोलिसांनी पंडितला परांजपेकडे पेल्यातून पाणी पिताना पाहिले. पोलिसांना पाहताच पंडित पळाला; पण पळतापळता पडलेल्या पंडितला पोलिसांनी पटकन पकडले.

(अश्विनी इनामदार, दहावी, पुणे)

स्वत: रचलेली अशी अनुप्रास असलेली वाक्ये पाठ करून वर्गातल्या, दलातल्या किंवा शिबिरातल्या मित्रमैत्रिणींना भरभर म्हणून दाखवा आणि त्यांना कशी गंमत वाटते ते पाहा !

अनुप्रासाची ही गंमत काही वेळा मोठी माणसेसुद्धा करतात. गाजलेले वक्ते प्रा.शिवाजीराव भोसले यांच्या भाषणात पुष्कळदा अशी वाक्ये असतात. उदा.- '*इथल्या सगळ्या विद्वानांचा एकत्रित व्यासंग त्या निस्संग वैराग्याच्या व्यासंगाच्या पासंगालासुद्धा पुरणार नाही !* कवितांमध्येसुद्धा पुष्कळदा अनुप्रासाची गंमत आढळते. प्रा.वसंत बापट यांच्या कवितेच्या पुढील ओळी मोठ्याने म्हणून पाहा.

हे रजत-शिखरधर गिरिवर सुंदर उत्तरेस हिमवान
हे चंद्र-चलित-जल ऊर्मिल सागर मंद्र गाति जयगान
जय हिंद हिंद आनंदभुवन जय भारत वर्ष महान !

२) एका कान्याचा फरक

ज्या शब्दांमध्ये फक्त एका कान्याची भर पडल्यामुळे वेगळ्या अर्थाचा नवीन शब्द तयार होतो अशा शब्दांची यादी तयार करा. उदा.- कान-काना, वड-वडा, फळ-फळा, पाव-पावा, मन-मना, मास-मासा, चाळ-चाळा, सांज-सांजा, दमले-दामले. चिकाटीने प्रयत्न केलात तर अशा शब्दांच्या शंभर-सव्वाशे जोड्या तुम्हांला आठवू शकतील. अशा शब्दांचा वापर करून काही गमतीदार वाक्ये लिहिता येतात.

उदा.- *१) लहान काना वर ठेव/ लहान कानावर ठेव.*
२) वडा खाली ठेव/ वडाखाली ठेव.
३) लाकडी फळा वर ठेव/ लाकडी फळावर ठेव.
४) श्रावण मासात मासा कधी खातात काय ?
५) आपल्या मनाला कोण मना करणार ?

तुम्हीही अशी जास्तीत जास्त वाक्ये लिहा.

३) फक्त अनुस्वारामुळे

काही शब्दांमध्ये केवळ एका अनुस्वाराची भर पडल्यामुळे वेगळ्या अर्थाचा नवीन शब्द तयार होतो. अशा शब्दांची यादी करा.

उदा.- चिता-चिंता, आबा-आंबा, ताब्यात-तांब्यात, पेढा-पेंढा, कबर-कंबर. अशा शब्दांचा शोध चालू ठेवा आणि मोठ्यात मोठी यादी लिहून काढा.

या शब्दांचासुद्धा तुम्हांला वाक्यात उपयोग करता येईल.

उदा.-१) चिता माणसाला मेल्यावर जाळते,तर चिंता जिवंतपणीच जाळते!

२) 'आंबासाहेब, असे रागावू नका !' कैरी म्हणाली.

३) गडबड केलीस तर पोलिसाच्या तांब्यात देईन.

४) दिवाणखान्यात पेढा भरलेला वाघ ठेवलेला होता.

५) खानाची कंबर कुठे आहे ?

पाहा बरे अशी वाक्ये सुचतात का ?

४) उलटसुलट शब्द

वाल्याचा वाल्मीकी झाला त्याची गोष्ट आठवते आहे ? प्रत्यक्षात वाल्या, 'मरा मरा मरा' असा जप करीत होता; पण जोडून आलेल्या त्या शब्दांतून 'राम राम राम' असा जप तयार झाला. असे पुराणिकबुवा सांगतात. त्यातली गंमत फक्त बघायची; कारण वाल्याला मराठी भाषा येत नव्हती हे आपल्याला माहीत आहे. तर मरा-राम अशा प्रकारच्या उलटसुलट शब्दांच्या काही जोड्या असतात. उदा.-राधा-धारा, लता-ताल, उमा-माउ, घारे-रेघा, लतिका-कातिल, दवा-वाद, टी.व्ही-व्ही.टी, सर-रस, रीगन-नगरी इत्यादी.

अशा शब्दांच्या सुचतील तितक्या जोड्या लिहून काढा. या शब्दांचा आता वाक्यात उपयोग करून पाहू.

उदा.-१) राधा, धारा काढल्यास का ? *२) लता, ताल चुकू नकोस.*

३) उमा, माउ आली बघ. *४) घारे, रेघा नीट मार.*

५) लतिका, कातिल बनू नकोस. *६) सर, रस घेता ना ?*

तुम्हीही अशी वाक्ये तयार करा.

असे शब्दांचे खेळ पुष्कळदा मोठ्या कवींच्या कवितांतसुद्धा आढळतात. प्रा.वसंत बापटांच्या एका कवितेतली ओळ आहे.

'नको','नको'चा कोन सोडुनी
हव्या हव्याची भोग हवा तर !

वरील शब्दांमध्ये आपण अक्षरांची उलटापालट केली, त्याच पद्धतीने सामासिक शब्दांच्या म्हणजेच जोडशब्दांच्या, पदांची उलटापालट करूनदेखील वेगळे शब्द करता येतात आणि ते शब्द वापरून वाक्ये रचता येतात.

उदा.- १) धर्मयुद्ध–युद्धधर्म
कलियुगामध्ये धर्मयुद्धापेक्षा युद्धधर्म महत्त्वाचा.
२) बुद्धिवाद–वादबुद्धी
बुद्धिवाद हवा; पण वादबुद्धी नको.
३) बादशहा–शहाबाद
शहाबादी फरशीने बादशाही ऐट दाखविल्यावर संगमरवराने कोठे जावे?

५) आद्याक्षरांचा गोंधळ

शामची आई–आमची शाई

वरच्या शब्दांमध्ये काय झाले आहे? पहिल्या आणि दुसऱ्या शब्दातील आद्याक्षरांची उलटापालट करून म्हणजे 'शा' च्या जागी 'आ' आणि 'आ' च्या जागी 'शा' घालून वेगळेच दोन शब्द तयार झाले. त्यांचा अर्थ भलताच असल्यामुळे गंमत झाली. काही वेळा बोलण्याच्या घाईमुळे असा घोटाळा होऊ शकतो. इंग्रजीमध्ये त्याला 'स्पूनरिझम' म्हणतात. मराठीतील अशी छोटी वाक्ये तुम्ही शोधून काढा.

उदा.- १) माडीवर गेला – गाडीवर मेला
२) गाय होऊ – होय गाऊ
३) मोत्याचा हार – हात्याचा मोर

थोड्या खटपटीनंतर तुम्हांला अशी वाक्ये नव्याने रचता येतील.

६) नवे नादानुकारी शब्द

प्रत्यक्षात होणाऱ्या आवाजावरून केले जाणारे शब्द म्हणजे नादानुकारी शब्द. असे असंख्य शब्द मराठीत आहेत.

उदा.- चटचट, चटाचटा, चटकन, चटदिशी, कडकड, कडाकडा, काडकन, काडदिशी, खटाखट, सटासट सपासप, खिटखिट किणकिण, कुरकुर, धुसफूस, मुळुमुळु, टुणकन्.

असे नवीन शब्द रचता येतील का ? असे कोणते आवाज आहेत की ज्यासाठी मराठीत शब्द नाहीत ? तुमच्यासारख्याच काही मुलामुलींनी असे काही नवे शब्द आणि त्यांचे उपयोग सुचविले आहेत.

उदा.- १) नसूकन - तिने नस्कन नाक उडविले.
२) चुळूचुळू - तो चुळूचुळू पाणी पिऊ लागला. (१ व २ विशाखा - ७ वी)
३) तिणतिण - तिने तिणतिण घंटा वाजवली.
४) फुचफुच - गाणे म्हणायला सांगितल्यावर त्याने जरा फुचफुच केली.
५) धच्कन - गाडीला धच्कन गचका बसला. (३ ते ५, देवयानी - ७ वी)

आणखी काही नवे शब्द पुढे दिले आहेत. ते स्वत:शी म्हणून पाहा. त्यावेळी कसले चित्र डोळ्यांपुढे उभे राहते असा विचार करून त्या शब्दांचा वाक्यात उपयोग करा. हपकन्, भणकन्, लसकन्, झळकन्, मडमड, मिटमिट, रियाँव-रियाँव.


आता असे नवीन शब्द तुम्ही स्वत: रचा आणि त्यांचा वाक्यातही उपयोग करून दाखवा.

त्यासाठी बाराखडीचा तक्ता नजरेसमोर ठेवा आणि नादानुकारी शब्दांच्या शेवटी येणारी अक्षरे वेगवेगळ्या अक्षरांना जोडून पाहा. उदा.-'गपकन्' डोळे मिटले, 'रपकन्' आपटला. या शब्दांच्या शेवटची '-पकन्' ही अक्षरे जोडून, कपकन्, खपकन्, घपकन् असे ओळीने म्हणा. त्यात सपकन्, टपकन् असे काही ओळखीचे शब्द भेटतील; पण उरलेले मात्र नवीन असतील.


७) त्रि-कूट


हा खेळ म्हणजे एक प्रकारचे तिहेरी कोडे आहे; म्हणून त्याचे नाव त्रि-कूट.


उदा.-





या उदाहरणामध्ये प्रश्नचिन्हाच्या जागी कोणते अक्षर घालावे ? हे एकच अक्षर घातल्याने तीन अर्थपूर्ण शब्द तयार व्हायला हवेत. समजा 'द' हे अक्षर घातले तर अंदर आणि उदर हे अर्थपूर्ण शब्द होतात; पण सुदर असा शब्द मात्र नाही; म्हणून 'द ' हे अक्षर घालता येणार नाही. मग दुसरे कोणते घालता येईल ? थोडा विचार केल्यावर तुमच्या लक्षात येईल की आपल्याला हवे असलेले अक्षर आहे 'धा'. ते घातल्यावर अंधार, सुधार आणि उधार असे तीनही अर्थपूर्ण शब्द तयार होतात. आता याच पद्धतीने पुढील कोडी सोडवा -


१. 

२. 

३. 

४. 

५. 

६. 

७. का / म / व → [?] — ण

८. अ / र / स → [?] — न

९. रु / ख / सा → [?] — ल

१०. चि / चु / च → [?] — र

११. सं / वि / आ → [?] — र

१२. च / ध / ने → [?] — की

१३. गा / ढ / व → [?] — न

१४. सं / पं / रं → [?] — त

१५. अं / वं / रिं → [?] — ण

सगळी कोडी सोडवून झाली का ? तयार उत्तरे बघण्याचा मोह होऊच नये; म्हणून नेहमी देतात तशी उत्तरे अन्यत्र कोठेही छापलेली नाहीत.

कोडी सोडवण्यापेक्षाही जास्त गंमत येते ती कोडे रचण्यामध्ये. त्यामुळे याच प्रकारची आणखी कोडी तुम्ही रचून पाहा.

८) शब्दांची उत्क्रांती

जीवशास्त्रामध्ये प्राण्यांची उत्क्रांती (म्हणजेच टप्प्याटप्प्याने विकास) कशी झाली याची माहिती तुम्ही घेतली असेल. प्राण्यांप्रमाणेच शब्दांमध्येसुद्धा उत्क्रांती करता येते. समजा मी म्हटले की 'सुंदर' या शब्दातून 'घायाळ' हा शब्द करता येतो, तर तुम्ही हसायला लागाल ! पण या खेळाच्या नियमानुसार मी ते तुम्हांला करून दाखवतो. नियम असा की आधीच्या शब्दातले एकच अक्षर एकावेळी बदलता येईल आणि अशा रीतीने अक्षर बदलून तयार झालेला नवा शब्द अर्थपूर्ण असलाच पाहिजे. पुन्हा या नव्या शब्दाचे कोणतेही एक अक्षर बदलून पुढचा अर्थपूर्ण शब्द करायचा. असे टप्प्याटप्प्याने करतकरत शेवटचा शब्द काढून दाखवायचा.

उदा.– सुंदर–आदर–आदळ–आयाळ–घायाळ

पहिल्या शब्दाकडून शेवटच्या शब्दाकडे जाण्याचा हा प्रवास कमीत कमी टप्प्यात झाला पाहिजे. या पद्धतीने आता तुम्ही पुढील शब्दांच्या जोड्या सोडवून दाखवा.

खुशीत – वापरा *दर्ग्यात – सूर्यास्त* *डोंगर – अंबर*

सापळा – कावड *शारदा – पुराण* *परात – कानात*

शेखर - मगध	नेणता - हरला	शतक - चेतना
बाजरी - वाटतो	आदर - पहाट	येशूचा - महिना
विरक्त -हसरा	टिटवी - चकली	वैशाली - रटाळ
स्मरण - पुरावा	मरण - बसला	साखर - नगर

शब्दांच्या अशा जोड्या तुम्हांला शोधून काढता येतील का ?

९) शाब्दिक कोट्या

विनोबांकडे म्हणे एकदा चरणसिंग गेले. ते विनोबांना म्हणाले, ''मी चरणसिंग.'' ''आचरणसिंग व्हा !'' लगेच विनोबा त्यांना म्हणाले. तसेच जेव्हा त्यांच्याकडे राज नारायण गेले, तेव्हा विनोबा त्यांना म्हणाले, ''तुम्ही तर नाराज नारायण !''

अशा बोलण्याला शब्दावर कोटी करणे असे म्हणतात. विनोबा पुष्कळदा अशा कोट्या करीत. ज्यांना चरणसिंग आणि राज नारायण यांच्या त्या वेळच्या राजकारणातील भूमिका माहीत आहेत त्यांना या कोट्यांमधील खोच आणि सूचक अर्थ लक्षात येईल. इतरही काही प्रसिद्ध कोट्या तुम्ही वाचल्या असतील.

उदा.- १) *भक्त म्हणजे विभक्त नोहे. (रामदास)*

२) *दान माणसाला नादान करते. (बाबा आमटे)*

३) *त्यांची द्राक्ष-संस्कृती, तर आमची रुद्राक्ष-संस्कृती (पु.ल.देशपांडे)*

या सगळ्या उदाहरणांमध्ये मूळच्या शब्दात एखाद्या अक्षराची भर घालून नवीन शब्द केला आणि ते दोन्ही शब्द एकाच वाक्यात वापरले. त्यामुळे ती वाक्ये चमकदार, थोड्या शब्दांत खूप अर्थ सांगणारी आणि खूप काळ लक्षात राहणारी अशी झाली. काही वेळा मूळच्या शब्दातले एखादे अक्षर वगळून नवा शब्द करता येतो आणि असे दोन्ही शब्द एकाच वाक्यात वापरता येतात.

उदा.- १) *शैक्षणिक यश-म्हणजे क्षणिक यश !*

२) *नाव सरिता, अन् घडा रिता !*

काही वेळा मूळ शब्दात अक्षराची भर घालणे अथवा अक्षर वगळणे अशा दोन्हींचे मिश्रण करता येते आणि तसे दोन-तीन शब्द एकाच वाक्यात वापरता येतात.

उदा. - १) *हे सार चाखल्यावर कोण म्हणेल की संसार असार आहे?*

२) *खरेच का तो दु:खे सारी हरील लहरी हरी ?*

३) *श्रावणातल्या वणव्यांचे वण अजुनी ना बुजलेले !*

शब्दांच्या अशा घडामोडी करून शाब्दिक कोट्या करणे आता आपण शिकू. त्यासाठी आधी अशा शब्दांची यादी करा.

उदा.–क) मुली–मामुली, राठी–मराठी, लाख–चलाख, काशी–मोकाशी, वडा–केवडा

ख) चिमणी–मणी, पगार–गार, लोखंडे–खंडे, दीपाली–पाली, चितळे–तळे, निपाणी–पाणी

अशा शब्दांचा वापर करून तुमच्यासारख्याच विद्यार्थ्यांनी रचलेली ही काही वाक्ये पाहा.

उदा.- १) मुलींना काय मामुली समजलात ?
२) हे काशीचे मोकाशी.
३) लोखंडे जगातील सर्व खंडे पाहून आले.
४) तो पालीचा गणपती, हा दीपालीचा.
५) राठींचे मराठीशी वाकडे आहे.
६) लाखामधून एखादाच चलाख निघतो.
७) हरिण सावध, म्हणून त्याचा वध टळला.
८) मेद आणि उमेद यांचे प्रमाण एकूण व्यस्तच !

आता या धर्तीची सुचतील तितकी वाक्ये तुम्ही लिहून पाहा.

१०) श्लेष

श्लेष म्हणजे जुळलेले असणे किंवा चिकटलेले असणे. एकाच शब्दाला अनेक अर्थ चिकटलेले असणे म्हणजे आत्ताचा खेळ - 'श्लेष'

(क) काही वेळा एखाद्या शब्दाला मुळातच दोन वेगळे अर्थ असतात. बोलणाऱ्याने तो शब्द एका अर्थाने वापरलेला असतो. तर उत्तर देणारा त्याच शब्दाचा दुसरा अर्थ मनात धरून उत्तर देतो आणि त्यामुळे गंमत येते किंवा विनोद निर्माण होतो.

विनोबांची एक गोष्ट सांगतात. त्यांच्याकडे एकदा उत्तर प्रदेशातले पुढारी आले. विनोबांनी त्यांना विचारले, "कोठून आलात ?"

"उत्तर प्रदेशातून" – पुढारी म्हणाले. विनोबांनी विचारले "उत्तर प्रदेशातून? की प्रश्न प्रदेशातून ?".

येथे पुढाऱ्यांनी ' उत्तर ' हा शब्द मूळचा दिशा दाखवणारा शब्द, प्रांताच्या नावातला म्हणून वापरला होता; पण विनोबांनी त्याचा अर्थ 'प्रश्नाचे उत्तर' असा घेतला आणि त्यातून 'तुमचा प्रांत उत्तर देणारा प्रांत नसून प्रश्न उत्पन्न करणारा प्रांत आहे.' असा अर्थ त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचवला.

श्री.पु.ल.देशपांडे हे तर त्यांच्या श्लेष आणि कोट्या यांच्याबद्दल प्रसिद्धच आहेत.

आपल्या शालेय आयुष्याबद्दल बोलताना ते एकदा म्हणाले *'तेव्हा आम्ही गुरुजींना 'सर' केलेले नव्हते !''* येथे 'सर' हे इंग्रजीतून घेतलेले संबोधन आणि 'सर करणे' म्हणजे जिंकणे हा वाक्प्रचार एकाच वाक्यात एकदम वापरून त्यांनी श्लेषाची गंमत साधली.

(ख) काही वेळा एखाद्या शब्दाची दोन छोट्या शब्दांत फोड करून अशीच गंमत साधली जाते. प्रा.शिवाजीराव भोसल्यांचे एक वाक्य प्रसिद्ध आहे, *'जेथे विद्या लयाला जाते अशी ही आजची विद्यालये !'*

मूळचा 'विद्यालय' शब्द तोडून 'विद्या' आणि 'लय' दोन शब्द वापरल्याने वाक्यामध्ये केवढा वेगळा अर्थ आला !

गांधीवादी विचारवंत श्री.बाळासाहेब भारदे हेदेखील आपल्या भाषणात नेहमी असे शब्दांचे खेळ करतात. ते एकदा म्हणाले, *''शिक्षणाचा सगळा तपशील मांडला गेला; पण तप आणि शील यांचा विचार मात्र राहून गेला !''*

त्यांची ही आवड लक्षात घेऊन पर्वतीदर्शन येथील एका कार्यक्रमात त्यांच्या भाषणापूर्वी बोलताना मी पुढील दोन ओळी रचून म्हटल्या -

''शब्दांना अर्थाचा बहुत भार दे
ऐसा हा भक्त तुझा देवि शारदे !''

त्यावर अर्थातच त्यांनीही हसून दाद दिली.

तुम्हांलाही असे श्लेष करता येतील.

(क) त्यासाठी प्रथम एकाच वेळी दोन अर्थ असलेल्या शब्दांची यादी करा.

उदा.- पालक (आईवडील/ भाजी)
मोड (कडधान्याचा अंकुर/ सुट्टे पैसे/ मोडणेचा आज्ञार्थ)
वर, हार, बस, काच, परतणे, वाढणे, वाळणे इ.

अशा शब्दांचा वापर करून विद्यार्थि-विद्यार्थिनींनी लिहिलेली ही काही वाक्ये पाहा.

उदा.- *१) ''जाऊ का ?'' - ''कुणाची ?''*
२) ''पायाला पाणी लागल.''-''मग पंप आणला का ?''
३) (भिजलेल्या मुलीला)'' इतक्यात किती वाळलीस ?''
४) कुंतीला वर मिळाला.
५) ते तर कोरडे आहेत.

(ख) आता जे शब्द तोडल्यावर त्यांच्यातून दोन वेगळे शब्द तयार होतात अशा शब्दांची यादी करा.

उदा.-	खासदार	-	खास	दार
	चपलाहार	-	चपला	हार
	सरपण	-	सर	पण
	सरदार	-	सर	दार
	कडेवर	-	कडे	वर
	तिन्हीसांजा	-	तिन्ही	सांजा
	हापूस	-	हा	पूस
	चक्रम	-	च	क्रम

अशा शब्दांच्या साहाय्याने इयत्ता सातवी व आठवीच्या मुलामुलींनी लिहिलेली ही वाक्ये पाहा.

उदा.- १) त्या खास-दाराने बाहेर जावे. २) मिळतिल चपला-हार कधी ?
३) सर-दार तिकडे आहे ? ४) ते सर-पणाला लावले.
५) कडे-वर घे ना ! ६) गृहपाठ, वाचन, लेखन, तिन्ही-सांजा झाल्यावर करू.
७) हा-पूस आंबा. ८) याच क्र-माने वाचावे.

(ग) काही वाक्प्रचारांनाही दोन अर्थ असतात. उदा.- डोळे येणे, डोळे मिटणे, दिवे लावणे, ट्यूब पेटणे, पोटात दुखणे इत्यादी. अशा वाक्प्रचारांची यादी करा. त्यांचा वाक्यात द्व्यर्थी वापर करा.

उदा.- १) 'डोळे आलेत !' - 'हो ? मग औषध आणा !'
२) मी तर पंख्याच्या वाऱ्यालाही उभा राहत नाही.

या पद्धतीने तुम्ही प्रथम शब्दांची यादी करा आणि मग त्या शब्दांचा वाक्यात उपयोग करा. फक्त तुमच्या आसपास बावडेकर, जावडेकर किंवा पळशीकर अशा आडनावांचे मित्र नाहीत ना याची खात्री करा. नाहीतर उगाच मारामारी व्हायची!

आचार्य अत्र्यांना अशा मारामारीची (अर्थात बौद्धिक !) हौस असे. एकदा बापट आडनावाच्या गृहस्थांनी अत्र्यांची काही खोडी काढली. त्यावर अत्र्यांनी चिडून अग्रलेख लिहिला. त्याचे शीर्षक होते, 'बापट की बिन-बापट' हे बापट आपले नाव लिहिताना फक्त स्वत:चे नाव आणि आडनाव लिहीत. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे मधले वडिलांचे नाव लिहीत नसत. या गोष्टीचा अत्र्यांनी वापर करून घेतला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी यशवंतराव चव्हाण म्हणाले, "संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे असे म्हणा. 'झालाच' पाहिजे असे कशाला?" त्यावर

आचार्य अत्रे भाषणात म्हणाले, "यांना 'च' चे महत्त्व आम्ही काय सांगणार?' यांच्या आडनावातला 'च' काढून टाकला तर खाली काय उरेल? फक्त व्हाण ! म्हणजे 'वहाण', चपला !" तर श्लेष आणि कोट्या यांचा असा वादविवादातसुद्धा उपयोग होऊ शकतो.

श्लेष किंवा कोट्या किती लहान वयापासून सुचत असतील ? *अन्वया नावाच्या एका अडीच-तीन वर्षांच्या मुलीशी मी गप्पा मारीत होतो. तिला एक नाव ओळखायला सांगत होतो. "नाव तीन अक्षरी आहे आणि पहिलं अक्षर आहे सु-" एवढे मी म्हणताच ती हसायला लागली; कारण विचारल्यावर, "सु म्हणजे सू करायची !" असे म्हणून ती जास्तच जोरात हसू लागली. त्यामुळे इतक्या लहान वयातच शब्दाचा दुसरा विनोदी अर्थ जाणवण्याची क्षमता असली पाहिजे.*

मी स्वत: आठवीत असताना मला सुचलेला एक श्लेष आणि त्या वेळी गुरुकिल्ली सापडल्यावर व्हावा तसा झालेला आनंद अजूनही आठवतो.

आमच्या घराशेजारी बेलाचे झाड होते. त्याच्या फळांचा काढा करतात हे घरच्या लोकांच्या बोलण्यात ऐकले. त्याच वेळी शाळेत क्षेत्रफळ-घनफळाची गणिते चालू असल्यामुळे मला एकदम 'घनफळ-काढा' म्हणजे 'घनफळ' नावाच्या फळापासून केलेला औषधी 'काढा' असा श्लेष सुचला ! मग तो गणित कच्चे असलेल्या मुलांनी घ्यावा, वगैरे भर घालून मी एक विनोदी जाहिरातही वर्गाच्या हस्तलिखितासाठी लिहिली होती.

ज्ञान प्रबोधिनीचे बिनीचे कार्यकर्ते प्रा.रामभाऊ डिंबळे त्यांच्या उत्स्फूर्त कोट्यांबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यांच्या प्रतिभेचा विकास मी त्यांच्या-माझ्या शालेय वयापासून जवळून पाहिला आहे. पद्यरचनेचा सराव आणि विनोदबुद्धी यातून त्यांना सुचलेल्या एका ओळीने धमाल केली होती ! प्रसंग असा होता...

शालान्त परीक्षा संपवून आम्ही काही जण तमिळनाडूच्या अभ्यासदौऱ्याला गेलो होतो. दौरा संपतासंपता, रामायणकाळापासून प्रसिद्ध असलेला गंधमादन पर्वत पाहायला जायचे ठरले. पर्वत थोडासा चढून झाल्यावर रामभाऊ जोरात गाऊ लागले – 'गंधमादन पर्वत चढुनी, जाति ते रामाकडे... ' बरोबरचे शिक्षक थोडेसे दूर जाताच सूर बदलून रामभाऊ गाऊ लागले – 'जाति तेरा माकडे !' आम्ही सगळेच हसतहसत गाण्यात सामील झालो; कारण गंमत अशी होती की आम्ही एकूण तेरा जण होतो; पण ते शिक्षक धरून ! शिक्षक रागावले तरी त्यांना शिस्तभंगाचा इलाज करताच येत नव्हता !

आत्तापर्यंत दिलेले खेळ जर तुमचे खेळून झाले असतील तर एव्हाना तुमची शब्दांशी चांगलीच दोस्ती झाली असेल. ही दोस्ती वाढवण्यासाठी तुम्ही आवड असल्यास शब्दकोडी खेळू शकता. वेगवेगळी पुस्तके वाचताना नवे शब्द टिपून ठेवू शकता. शब्दकोशांमध्ये त्यांचा अर्थ बघू शकता. अनोख्या शब्दांची व्युत्पत्ती (म्हणजे तो शब्द मुळात कोठून आला आणि त्याच्यात काय काय बदल होत गेले याचा इतिहास) शोधून काढू शकता.

पण आपल्याला येथेच थांबायचे नाही; कारण शब्दप्रभुत्व ही तर लेखनकलेची फक्त पूर्वतयारी आहे. या शब्दांची जुळणी करून त्यातून अर्थ कसा व्यक्त करायचा ते आपण यानंतर पाहणार आहोत.

भाग २ : रचनेची खटपट

१. गाणी, कविता वगैरे ...

१) चिडवाचिडवी

एक होता अशोक । तो करायचा सारखे जोक ।
म्हणून चिडले लोक । त्यांनी दिला त्याला ठोक ।

कशा काय वाटतात या ओळी ? अशोकला चिडवण्यासाठी रचल्यासारख्या वाटतात ना ? अशी चिडवाचिडवीची गाणी जुळवायला तुम्हांलाही आवडेल आणि ते सहज जमूही शकेल. कसे करता येईल पाहा.

वरच्या चार ओळींमध्ये ओळीच्या शेवटी आलेल्या शब्दांकडे लक्ष द्या. 'अशोक' या शब्दांच्या उच्चारासारखाच उच्चार असलेले 'जोक', 'लोक' आणि 'ठोक' असे ते शब्द आहेत. अशा प्रकारच्या शब्दांना 'यमक' साधणारे शब्द असे म्हणतात. असे शब्द सुचणे हादेखील शब्दप्रभुत्वाचाच भाग आहे; पण या वेळी आपण शब्दप्रभुत्वाकडून रचनाप्रभुत्वाकडे वळणार आहोत.

रचनाप्रभुत्व म्हणजे सुचलेल्या शब्दांची अर्थपूर्ण गुंफण करता येणे. वरच्या उदाहरणात 'जोक', 'लोक' आणि 'ठोक' हे तीनही शब्द छोट्या वाक्यांमध्ये गुंफले आहेत आणि त्या चारही वाक्यांमधून सलग अर्थ निघतो आहे.

तुम्हांला ज्या मित्राला/मैत्रिणीला चिडवावेसे वाटत असेल त्याच्या/तिच्या नावाशी किंवा आडनावाशी यमक साधणाऱ्या शब्दांची प्रथम यादी करा. मग प्रत्येक शब्द वापरून एकेक वाक्य तयार करा. यादीतले शब्द वाक्यांच्या शेवटी आले तरीही वाक्य बिघडता कामा नये. मग या वाक्यांच्या गुंफणीतून काही सलग अर्थ सांगायचा प्रयत्न करा. हा अर्थ गमतीदार असला तर जास्त मजा येईल. अशा चिडवाचिडवीच्या छोट्या गाण्याला एक दोन शब्द सुचले तरी चालते; कारण पुढच्या ओळींसाठी वेगळे यमकही जुळवता येते. उदा.-

एक होती केतकी । तिला भेटली चेटकी ।
चेटकी म्हणाली हुप ! केतकी म्हणाली चूप !

आता तुम्हीही अशी गाणी रचा.

तुमच्यासारख्याच मुलामुलींनी रचलेली ही पाहा काही छोटी गाणी -

१) *अनिता गं अनिता, वाच ना गीता*
मी हलवते पेटीचा भाता

(अस्मिता केळकर, इ. ६वी)

२) *ही बघा आली चित्रा, तिच्यामागून आला कुत्रा*
कुत्रा चावला चित्राला, चित्रा लागली रडायला

(सीमा काळे, इ. ६वी)

३) *एक होती शीतल, करत असे ती सर्वांची नक्कल*
म्हणून लढवली लोकांनी शक्कल, शिकवली शीतलला चांगलीच अक्कल

(संदीप सुरपुरिया, ९ वी, नू.म.वि.पुणे)

४) *अमोल रे अमोल, तू आहेस ढोल*
जरा सांभाळ तुझा तोल, नाही तर मी करीन तुझा क्रीमरोल

(सोनाली नगरकर, इ. ७वी, एल.ओ.सी.क्लब)

५) *विशाल रे विशाल, आज दिसतोस खुशाल*
केवढा घाबरला होतास काल, जेव्हा अंगावर पडली होती पाल

(अनघा चाफळकर, जागर)

६) *संदीप रे संदीप, बंद कर तुझी रिपरिप*
बसशील जरा गपचीप, तर देईन तुला सोन्याची चीप

(वर्षा जोग, जागर)

तुम्ही यापूर्वीच्या भागात वाचलेल्या श्लेष व कोटी वगैरेंचा वापर करून रचलेले हे पहा चिडवाचिडवीचे आणखी एक गाणे -

अभिजित कापरे, काप रे काकडी कोवळी
काकडीला कापरे भरेल त्या वेळी
म्हणेल, 'आला कापरे ! बाप रे'
होईल पळापळी !

८) यमक–गाणी

यमक जुळणाऱ्या शब्दांच्या मदतीने आता थोडी मोठी गाणी रचायचा प्रयत्न करा. त्यासाठीच्या पायऱ्या आधीच्या सारख्याच. फक्त चिडवाचिडवीतल्या नावाच्या ऐवजी दुसरी काही अक्षरे ठरवा. मग ही अक्षरेच ज्यांच्या शेवटी येतात अशा शब्दांची यादी करा.

उदा.-१)'दार'अक्षरांनी शेवट होणारे शब्द-मंदार,केदार,फौजदार,सरदार इ.
२) शेवटी 'डी' येणारे शब्द-काडी,माडी,गाडी,जुडी,उडी,काकडी इ.
३) शेवटी 'आस' येणारे शब्द-आस,व्यास,प्रयास,उपास,पास,रास इ.

आता याच शब्दांच्या साहाय्याने ओळी जुळवण्याचा प्रयत्न करा. प्रत्येक ओळीच्या शेवटी आपल्या यादीतलाच एखादा शब्द आला पाहिजे.

आता या ओळींमधून सलग अर्थ असलेले एखाद्या व्यक्तीचे किंवा प्रसंगाचे वर्णन करणारे गाणे जुळवा. पुढे नमुन्यादाखल विद्यार्थ्यांनीच रचलेली काही गाणी दिली आहेत.

१) एक होता सरदार, डोळे त्याचे पाणीदार,
चाले कसा डौलदार, तलवार त्याची धारदार
पोशाख त्याचा घोळदार, मिशा त्याच्या पीळदार

(सुचरिता राळे, ६ वी)

२) एक होती काकडी, ती होती जाडी व वाकडी
तिला भेटली काडी
काकडी म्हणाली, ''किती ग तू लुकडी !
हो जरा जाडी ! उडव जरा फटाकडी !''
असं म्हणून डुलत डुलत गेली काकडी
आणि चालवू लागली आपली गाडी !

(चित्रा केळकर, ६ वी)

३) ऐका ऐका ऋषींचा इतिहास, घेतला होता त्यांनी संन्यास
करीत असत ते उपवास, तरीही होती वाणी मिठ्ठास ।।१।।
करीत असत ते तप तासन् तास, सर्वांचा होता त्यांच्यावर विश्वास
सारे गाव जाई त्यांच्या पास, पडत असे त्यांच्यासमोर पैशांची रास ।।२।।

(देवयानी तुळजापूरकर, ६ वी)

४) शिवाजी महाराज होते थोर, त्यांच्याजवळ होता मराठ्यांचा जोर
बाजी तानाजी होते वीर, जनतेला दिला त्यांनी धीर ।

(भीमाशंकर कांबळे, लातूर)

यमक जुळवण्याची ही करामत गाण्यांबरोबरच काही वेळा भाषणांमध्येही वापरली जाते. प्रा.शिवाजीराव भोसले यांचे एक वाक्य माझ्या लक्षात राहिले आहे, ''त्या फळाची स्थिती, त्या मुलाची मती, त्याने फेकलेल्या दगडाची गती, यांची जेव्हा होते

युती, तेव्हाच फळ येते हाती !" अशा वाक्यांमुळे भाषणाला एक लय प्राप्त होते आणि श्रोते त्या लयीवर डोलू लागतात.

३) घोषणा किंवा जाहिरातींची गाणी

यमक-गाणी लिहिता आल्यानंतर आता काही विशिष्ट अर्थ असलेली छोटी गाणी आपण लिहून पाहू. यातला सगळ्यात सोपा प्रकार म्हणजे **घोषणा किंवा जाहिरातीची गाणी.** सध्या दूरदर्शनमुळे हा प्रकार तुमच्या चांगलाच माहितीचा झालेला आहे; पण पुष्कळदा जाहिरातीतली चित्रे आणि संगीत यांमुळे या गाण्यातल्या शब्दांकडे आपले दुर्लक्ष होते. यापुढे तुम्ही त्या शब्दांकडे आणि त्यांच्या रचनेकडे विशेष लक्ष द्या. शक्य झाले तर ऐकताऐकता ती गाणी वहीत लिहून घ्या.

या गाण्यातला अर्थ साधा असतो. ज्या उपक्रमाचा प्रचार करण्यासाठी घोषणा लिहायची त्या उपक्रमाची माहिती अगदी थोडक्यात आणि आकर्षक शब्दांत सांगितलेली असते. तसेच जाहिरातींचे. एखादी वस्तू आणि त्या वस्तूचे वेगवेगळे गुण यांचे वर्णन जाहिरातीमध्ये असते. सर्व ओळींच्या शेवटी यमक साधलेले असते आणि त्या ओळी एखाद्या ठेक्यावर किंवा चालीवर म्हणता येतील अशा रचलेल्या असतात.

उदा. – १) *जातीपाती जुनाट भिंती, पाडुन टाकू, घडवू क्रांती !*

२) *'झुळझुळ पाणी'*
'आणायचं कोणी ?'
'सांगतो राणी
'फिनोलेक्सनं आणलं पाणी
शेतं पिकली सोन्यावानी ! '

पूर्वी ज्ञान प्रबोधिनीमध्ये 'रसमयी' नावाचा महिला उद्योग होता. त्यात वेगवेगळे टिकाऊ खाद्यपदार्थ तयार केले जात. ज्ञान प्रबोधिनीच्याच शाळेतल्या इ. आठवीतल्या विद्यार्थिनींना या रसमयीच्या उत्पादनांच्या प्रसारासाठी काही घोषणा किंवा गाणी रचायला सांगितली होती. त्यातले काही नमुने पाहा -

१) ***वड्या खा वड्या, रसमयीच्या वड्या***
न खातील त्या मुली होतील लुकड्या ***(माधुरी कुलकर्णी)***

२) ***मुंजीमध्ये गेले असता आशीर्वच द्यावा***
खाऊ म्हणून हातामध्ये जॅमच ठेवावा ! ***(वृषाली श्रोत्री)***

३) ***लग्न-मुंज-समारंभ समयी, धावत येई रसमयी***
घरात आहे कार्यक्रम ? पटकन घ्या हा जॅम

रोज कशाला तिळकुटाची कटकट ?

रसमयीतून आणा पाकिटे फटाफट

हवी तेवढी ऑर्डर द्या, दोन दिवसांत माल घ्या. **(स्वाती शेठ)**

आता याच पद्धतीने तुम्ही पुढे दिलेल्या विषयांवर घोषणा किंवा जाहिरातीची गाणी लिहा.

१) बाल कामगार

२) सर्व मुलांचा विकासाचा हक्क

३) गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत म्हणायच्या घोषणा

४) तुमच्या दलाने किंवा मित्रमैत्रिणींच्या गटाने विकण्यासाठी तयार केलेल्या राख्या, तिळगूळ इ. वस्तू.

४) नावे लपविलेल्या कविता

पहिल्या भागामध्ये श्लेष किंवा कोट्या करताना शब्दांचे भाग पाडायला तुम्ही शिकला आहात. तशाच शब्दांच्या मोडतोडीवर आणि नव्या जुळणीवर, तसेच काही शब्दांच्या दुहेरी अर्थांच्या वापरावर आधारलेली आत्ताची कृती आहे.

नगर-कर भरतात सगळे

सीमेच्या आत राहणारे

या दोन ओळींमध्ये एका मुलीचे नाव आणि आडनाव लपलेले आहे. ते तुम्हांला लगेचच ओळखू येईल - सीमा नगरकर. आता पुढे दिलेल्या छोट्या कवितांमधली लपलेली नावे व आडनावे शोधून काढा.

१) *स्वातीमधले मोती, देव धरतो हाती*

२) *अथांग नीलाचा रवि स्वामी, करीतसे जो शीत निवारण*

३) *गीतामधुनी भटकत जाते, तरल कल्पना कोणाची ?*
गणितामध्ये हरवुन जाते, शोधक प्रज्ञा कोणाची ?

४) *सुषमा विषमा झाली, पाठ कशी तिची दुखली ?*
गोळा आठ किलोचा, दशमीटर फेकुनि आली !

५) *चैतन्याची सुरेल रेखा, चित्त तिचे जणु नितळ तळे*
चांदण्यात मनि उमलुनि येती, भावफुलांचे गंधकळे

आता तुमच्या मित्र-मैत्रिणींची नावे ज्यात लपवलेली आहेत अशा दोन-दोन किंवा चार-चार ओळी जुळवा. त्यासाठी नाव फोडून त्यातली सुरुवातीची अक्षरे आधीच्या शब्दात आणि शेवटची अक्षरे पुढच्या शब्दात मिसळून जायला हवीत. असे शब्द एकदा सापडले की ते वापरून एक ओळ रचायची. दोन शब्द दोन वेगळ्या ओळीत नेता

आले, तर जास्तच चांगले. या ओळींमध्ये आपल्या त्या मित्रमैत्रिणीचे काही वैशिष्ट्य वर्णन करून सांगायचे. मग त्यांचा अर्थ पूर्ण करण्यासाठी आणखी दोन ओळी रचायच्या.

उदा.- लातूरहून, 'छात्र-प्रबोधन'ला कविता पाठवणाऱ्या आपल्या मित्राचे नाव आहे 'भीमाशंकर कांबळे'. यातले 'भीमाशंकर'तोडून 'भीमा' ही नदी आणि 'शंकर' हा देव असे होईल. 'कांबळे' हे 'कां' आणि 'बळे' असे तोडता येईल.

आता हे तोडलेले भाग वेगळ्या शब्दात मिसळून टाकू. 'भीमा' पासून 'बलभीमा' करता येईल. 'शंकर' पासून 'शंकर-पार्वती' करता येईल. 'बळे' पासून 'बळेबळे' करता येईल. 'कां' थोडे अडचणीचे आहे; कारण त्यातल्या अनुस्वाराचा उच्चार व्हायला हवा आहे. तसा उच्चार संस्कृतमध्ये असतो. उदा.-'बालिकां ' (बालिकाम्). पण मराठीत? विचार करताकरता नाकात उच्चार करायची धाटणी असलेली मराठीची एखादी बोली आठवेल. उदा.-मालवणी बोलीत 'माकां' 'तुकां' म्हणजे मला, तुला असे शब्द असतात. म्हणजे बलभीमा, शंकर-पार्वती, माकां/तुकां, बळेबळे या चार शब्दांचा वापर करून दोन-चार ओळी रचायच्या आहेत.

आता ओळी रचायचा प्रयत्न करा. उदा.- 'बलभीमा' म्हणजे 'बलभीमाला' असा अर्थ घेऊन 'अर्जुन म्हणे बलभीमा' अशी ओळ होऊ शकेल. इथे 'बलभीमा'चा अर्थ 'हे बलभीमा'असाही घेता येईल. या पद्धतीने उरलेल्या ओळी तुम्ही पूर्ण करा.

हे जमल्यानंतर तुमच्या कोणत्याही पाच मित्रमैत्रिणींची नावे लपविलेल्या पाच छोट्या कविता रचा.

५) गुप्त–संदेश–कविता

आल्या आल्या मृगधारा । जल घेऊनीया संगे ।
दलदल सारीकडे । लाल तांबडे सारे ।
वरी मेघ गुंतले । रवि हसे त्यामधून ।
भेडसावी बटांना वारा । टप् टप् आल्या जलधारा ।।

(चेतना सरदेशमुख इ.७ वी)

वाचलीत कविता ? या कवितेमध्ये एका मुलीने आपल्या मैत्रिणीला दिलेला निरोप लपलेला आहे. तो सापडला का तुम्हांला ?

वरवर पाहता ही कविता पावसावरची वाटते. तशी ती आहेसुद्धा ! पण तिच्यामधील प्रत्येक ओळीतले पहिले अक्षरे घेतले, तर त्यातून 'आज दलावर भेट' असा निरोप तयार होतो. इतरांच्या नकळत असा काही निरोप किंवा सूचना देणारी कविता म्हणजेच 'गुप्त-संदेश' कविता. इतिहासातली अशी एक प्रसिद्ध 'गुप्त-संदेश-कविता' तुम्हांला माहीत आहे का ? अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी रामदासस्वामींनी

शिवाजी महाराजांना 'विजापूरचा सरदार निघाला आहे' असा संदेश एका पद्यमय पत्रात गुंफून पाठविला होता. ते पत्र तुम्ही मिळवून वाचा.

तुम्हांलासुद्धा अशा कविता रचता येतील. त्यासाठी प्रथम तुमचा गुप्त निरोप सुटसुटीत वाक्यात, शक्यतो जोडाक्षरांशिवाय तयार करा.

उदा.-'परवा नाटकाला जायचं.'

आता या वाक्यातल्या प्रत्येक अक्षरापासून सुरू होणारा त्यातल्या शब्दांशी अजिबात जवळचा नसणारा असा एकेक शब्द लिहा.

उदा.- प - पतंग, पडवी, परात, पळत, पळी इ.
र - रवी, रजा, रघुनाथ, रक्षण, रडका इ.
वा - वारा, वास, वाकडा, वाजव, वापरा, वासू इ.

त्यानंतर त्यातील एकेका शब्दाने सुरू होणारी वेगवेगळी वाक्ये लिहून काढा.

उदा.- पतंग उडवितो राजू ।
रवी धरतो मांजा ।
वारा सुटला जोराचा ।

अशी वाक्ये लिहितालिहिता या सगळ्या वाक्यांमधून एखादा प्रसंग किंवा एखाद्या व्यक्तीचे वर्णन, ठिकाणाचे वर्णन सलगपणे सांगण्याचा प्रयत्न करा. जसे वरच्या तीन वाक्यांतून पतंग उडविण्याच्या प्रसंगाचे वर्णन सुरू झाले आहे. हा प्रसंग नाटकाला जाण्याच्या मूळ निरोपापेक्षा अगदी वेगळा आहे.

या पुढचा टप्पा म्हणजे या वाक्यांच्या रचनेमध्ये सफाई आणणे. म्हणजे त्यांची लांबी साधारणपणे सारखी करणे, निदान दोन-दोन ओळींच्या शेवटी यमक साधणे आणि त्याही पुढे जाऊन त्या ओळींमध्ये काही ठेका, ताल किंवा लय आणायचा प्रयत्न करणे. हे करताना मूळच्या वाक्यातील काही शब्द बदलावे लागतील; काही गाळावे लागतील; पण हे सर्व करताना पहिले अक्षर मात्र बदलणार नाही याकडे लक्ष द्यायचे. थोड्या खटपटीनंतर वर दिलेल्या कवितेसारख्या, 'परवा नाटकाला जायचं' हा निरोप गुप्तपणे सांगणाऱ्या आणि नाटकाला जाण्यापेक्षा अगदी वेगळ्या प्रसंगाचे वर्णन करणाऱ्या दोन/तीन कविता तुम्हांला सहज सुचतील. अशा कविता रचा.

हीच युक्ती वापरून काही वेळा कुणाच्या तरी वाढदिवशी 'अमुक तमुक चिरायू होवोत' अशा प्रकारच्या कविता कधी कधी वर्तमानपत्रात येतात.

आपला संदेश आणखी लपवायचा असला तर निरोपाची अक्षरे आपल्या कवितेमध्ये वेगळ्या क्रमाने (उदा.-पहिल्या ओळीतील पहिले, दुसऱ्यातील दुसरे, तिसऱ्यातले तिसरे इ.) गुंफण्याच्या कल्पना तुम्हांला सुचू शकतील. मात्र ती युक्ती

ज्याला निरोप पाठवायचा त्या मित्राला तरी समजायला हवी !

विद्यार्थ्यांनी रचलेल्या काही गुप्तसंदेश कविता पुढे दिल्या आहेत.

१) शामूचा अभ्यास

आईने मग बोलविले शामूला आणि आई म्हणाली त्याला.
जरा बघू बरं शामू तुझा अभ्यास किती झाला.
सि पर्यंत का रे अभ्यास केला ?
ने बघू हे पेन आणि वही आणि लागलीच लाग ती गणितं करायला
मामाकडे जायचे आहे ना तुला ?
लाज नाही का रे वाटत तुला नुसते लोळायला
जा आता इंग्रजीचा अभ्यास करायला
यडपटासारखी उत्तरे नको देऊ मला.
चल मुकाट्याने लाग अभ्यासाला, नाहीतर आता पिटीन तुला.

(कांचन कुंडलकर, इ.५ वी एल.ओ.सी.क्लब)

२) माझी शाळा

ज्ञान मिळविण्या उच्च प्रतीचे दारी तव आलो
नम्र होऊनी सदा पदाशी लीन आम्ही झालो
प्रकाश मिळुनी विज्ञानाचा जीवन उज्ज्वल करू
बोध घेउनी सत्कार्याचा जनसेवा आचरू
धिक्कारुनिया अंधकल्पना नूतन जग पाहू
नीटनेटके राहुन प्रेमळ प्रसन्नता ही धरू

(कौस्तुभ समुद्र, इ.६वी)

३) तक्रार कशी करू

बाबा मला रागावतात
इकडे तिकडे निघून जातात
ये गं ताई घे हा खाऊ
तर मी हातात घेते माऊ
आईपण धावत येते
हेरगिरी ताई करते
तक्रार मी कशी करू ?

(कविता आठल्ये, इ.७ वी)

४) ज्ञानाचे सार

छाया गर्द मज मिळे ज्ञानाची
त्रय नेत्र जणु लाभे विज्ञानाची
प्रगती होत असे आम्हा छात्रांची
बोधक, मार्मिक अशी वाट या सत्रांची
धडपडत रहा तू ज्ञानार्जनासाठी
न च घे तू माघार निराशेपोटी
अलौकिक ज्ञान भांडाराची द्वारे
भिन्न जरी असती ज्ञानाची घरे
नवल आधुनिक ज्ञान आम्हा मिळे,
वरील ज्ञानसूत्रे जरी मला कळे,
मानव होतील पुरेपूर जाणकार
सिकुनिया हे वाचनीय सार
कळकळीने करते हा पत्रव्यवहार

(सुनेत्रा खेमलापरे, सांगली)

६) वृत्तांमधल्या ओळी रचणे

जी गाणी चालीवर म्हणता येतात ती एका विशिष्ट पद्धतीने रचलेली असतात. त्या रचनेला 'वृत्त' असे म्हणतात. वृत्तांचे वेगवेगळे प्रकार आहेत. त्यात गाणी कशी रचायची ते आता आपण शिकणार आहोत.

क) वृत्तांच्या एका प्रकारात कवितेच्या प्रत्येक ओळीतल्या अक्षरांची संख्या सारखीच असली तरी भागते.

उदा.- श्रीमती पद्मा गोळे यांच्या पुढील ओळी पाहा -

चाफ्याच्या झाडा । चाफ्याच्या झाडा ।
नको ना पाणी । डोळ्यांत आणू ।

येथे प्रत्येक ओळीत पाच-पाच अक्षरे आहेत आणि त्या सगळ्या ओळी एका ठेक्यावर चालीत म्हणता येतात. म्हणून पाहा.

आता याच पद्धतीने पाच-पाच अक्षरांचे शब्द किंवा शब्दगट किंवा छोटी वाक्ये लिहून पाहा. खेळासारखा नेहमीचा विषय जरी मनात धरला तरी भराभरा ओळी सुचू लागतील.

उदा.- कबड्डी आम्हा, आवडणारी । खोखोचा मात्र, कंटाळा भारी ।
क्रिकेट पुरे, टेनिस खेळू । हॉकीच्या काठ्या शोधून काढू ।

किंवा दुसऱ्या एखाद्या विषयावर -

गरिबांनी या, फोडीला टाहो
न्यायाचे राज्य, देशात राहो...

किंवा आणखी एखाद्या विषयावर -

खळाळ धावे, नदीचे पाणी
तशीच सारी, श्रद्धाची गाणी

पाहिलेत किती सोपी युक्ती आहे ? मग हीच युक्ती वापरून तुम्ही काही गाणी रचून पाहा.

ख) वृत्ताचा आणखी एक प्रकार आहे. चालीवर म्हणता येणाऱ्या हल्लीच्या बहुतेक गाण्यांसाठी हा प्रकार वापरला जातो. त्यामध्ये प्रत्येक ओळीतल्या अक्षरांची संख्या सारखी ठेवण्याऐवजी प्रत्येक ओळ म्हणण्यासाठी लागणारे श्रम सारखेच ठेवलेले असतात; पण हे श्रम कसे मोजायचे ? तर ऱ्हस्व किंवा सहज म्हणता येणाऱ्या अक्षरासाठीचे श्रम म्हणजे एक मात्रा आणि दीर्घ किंवा जास्त जोर देऊन म्हणाव्या लागणाऱ्या अक्षरासाठीचे श्रम म्हणजे दोन मात्रा. मात्रा हे श्रम मोजण्याचे परिमाण.

उदा.- साने गुरुजींनी रचलेल्या गीताची ही ओळ पाहा -

बलसागर भारत होवो ।
विश्वात शोभुनी राहो ।

यातल्या पहिल्या ओळीच्या मात्रा मोजून पाहू 'ब'=१, 'ल'=१,

'सा'=२, 'ग'=१, 'र'=१ अशा पद्धतीने सगळी ओळ लिहिल्यास १+१+२+१+१+२+१+१+२+२=१४ म्हणजे पहिल्या ओळीच्या एकूण मात्रा झाल्या १४. आता तशाच दुसऱ्या ओळीच्या मात्रा तुम्ही मोजून पाहा. त्याही चौदाच भरतील.

आता चौदा मात्रांची काही छोटी वाक्ये आपण रचून पाहू. ही सगळी वाक्ये एकाच गोष्टीसंबंधीची असतील. समजा ती गोष्ट आहे. 'पतंग'

मी पतंग उडवत होतो.
जोराचा वारा आला.
दोरा तुटून गेला.
पतंग भरकटत चालला.

आता या ओळींच्या मात्रा मोजून पाहू. पहिल्या ओळीच्या १४, दुसऱ्या ओळीच्या १४, तिसऱ्या ओळीच्या १२ आणि चौथ्या ओळीच्या आहेत १४. म्हणजे तीन ओळी

आपल्याला हव्या तशा चौदा मात्रांच्या झाल्या; पण तिसऱ्या ओळीत २ मात्रांची भर घालावी लागेल. त्यासाठी समजा 'तुटून' हा शब्द आपण 'तुटोनी' असा केला तर एक मात्रा वाढते. आणखी एक मात्रा वाढवण्यासाठी समजा फक्त 'दोरा' म्हणण्याऐवजी 'दोराच' असे केले ; म्हणजे नवी ओळ झाली 'दोराच तुटोनी गेला'. आता या चारी ओळी 'बलसागर भारत होवो, च्या चालीवर म्हणून पाहा. पहिल्या तीन ओळी व्यवस्थित म्हणता येतात असे तुमच्या लक्षात येईल; पण चवथी ओळ मात्र खटकते. म्हणजे एकूण मात्रा चौदा असणे पुरेसे नाही. हीच ओळ बदलून 'चालला पतंग उडोनी' अशी केली तर चाल बरोबर लागते; पण मग गाणे अपुरे राहते; म्हणून त्यात आणखी एखाद्या ओळीची भर घालायला हवी. अशी भर घातल्यावर हे छोटे गाणे असे होऊ शकेल. -

मी पतंग उडवित होतो
जोराचा वारा आला
दोराच तुटोनी गेला
चालला पतंग उडोनी
कोणत्या दूरच्या देशा ?

आता याच पद्धतीने तुम्ही या चालीवरचे तुम्हांला हव्या त्या विषयावरचे गाणे रचून पाहा.

वेगवेगळ्या चालींच्या गाण्याच्या ओळींचा असा मात्रा मोजून अभ्यास केलात, तर त्या त्या चालीवरची गाणी तुम्हांला नक्कीच रचता येतील.

ग) इ. ८वी, ९वी, १०वीच्या मराठीच्या अभ्यासक्रमात तुम्ही वसंततिलका, भुजंगप्रयात, शार्दूलविक्रीडित अशा अवघड नावांचा 'वृत्त' हा प्रकार शिकला असाल आणि एकेका वृत्ताची लक्षणे आणि उदाहरणे पाठ करून परीक्षेत लिहिली असतील. तशा वृत्तांमध्ये काही ओळी रचून दाखवा असे तुम्हांला म्हटले तर तुम्ही म्हणाल,'काहीतरीच काय ?'

पण खरे म्हणजे हा प्रकार तेवढा अवघड नाही. थोड्या प्रयत्नांनी जमतो आणि मुख्य म्हणजे वृत्तातल्या ओळींना सहज चाल लावून त्या म्हणता येतात. त्यामुळे या खेळात फार गंमत येते.

रामदासांचा एखादा तरी 'मनाचा श्लोक' तुमच्या कानावरून गेला असेल.

उदा.- क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।
विचारी मना तूचि शोधोनि पाहे ।।

या ओळी चालीवर म्हणता येतात. या ओळींचे आपण पद्धतशीर निरीक्षण करू. सोयीसाठी तीन-तीन अक्षरांचा एक गट पाडू. पहिल्या ओळीचे चार गट पडतात आणि

दुसऱ्याही ओळीचे चारच गट पडतात. म्हणजे दोन्ही ओळींमध्ये प्रत्येकी बाराच अक्षरे आहेत.

आता समजा ऱ्हस्व किंवा कमी श्रमात येणाऱ्या अक्षरांना आपण लहान अक्षरे म्हणू आणि त्यांची खूण ठरवू 'ल' आणि दीर्घ किंवा जास्त जोर देऊन म्हणाव्या लागणाऱ्या अक्षरांना म्हणू मोठी अक्षरे आणि त्यांची खूण ठरवू 'मो'. आता मघाच्या दोन ओळींमधील अक्षरांच्या जागी या खुणा लिहिल्या तर काय होईल ? 'क्रि'=ल, 'ये'=मो, 'वी'=मो,'ण'=ल इ. असे लिहिल्यावर त्या ओळी कशा दिसतात ?

लमोमो लमोमो लमोमो लमोमो

लमोमो लमोमो लमोमो लमोमो

म्हणजे रसायनशास्त्रातल्याप्रमाणे विश्लेषण करून आपण या ओळींचा मूळ घटकच शोधून काढला ! रामदासांच्या सगळ्या मनाच्या श्लोकांमध्ये हा 'लमोमो' च सापडेल.

मग आता आपल्याला अशा 'लमोमो'चे, म्हणजेच पहिले अक्षर ऱ्हस्व आणि दुसरे व तिसरे अक्षर दीर्घ असलेले शब्द शोधता येतील.

उदा.–	*कुणाला*	*कशाला*	*कळेना*
	बटाटा	*पळावे*	*कळावे*
	सुटेना	*पटेना*	*पटावे*
	सुटावे	*पहाना*	*पहावे*
	पहातो	*पहाते*	*पहाटे*
	फुटाणा	*कुणाची*	*कशाची*
	कुणाचा	*कशाचा*	*शिजेना*
	खडावा	*वहाणा*	*सुगावा*
	सुचित्रा	*विनीता*	*सुजाता*

अशी शब्दांची यादी झाल्यावर पुढची पायरी ओळी जुळवण्याची. आपल्याला एका ओळीत असे चार शब्द हवे आहेत आणि त्या ओळीला काही अर्थही यायला हवा. जुळवून पाहू.

उदा.– *बटाटा शिजेना, फुटाणा फुटेना*
खडावा झिजेना, वहाणा तुटेना

या ओळी अगदी मूळच्या चालीतच म्हणता येतात की नाही ते पाहा !

आता या ओळींपेक्षा जास्त अर्थपूर्ण ओळी लिहून पाहू.

उदा.– *सुजाता पळाली, कुठेही दिसेना*
असावी कुठे ती, सुगावा मिळेना

याच पद्धतीने सुजाताचे हे गाणे तुम्ही आणखी काही ओळी रचून पूर्ण करा.

कधी कधी प्रत्येक शब्द तीनच अक्षरांचा निवडणे त्रासाचे वाटू लागते. अशा वेळी सहा अक्षरांचा एकत्रित विचार करता येतो.

'लमोमोलमोमो' ही सहा अक्षरे 'लमो मोलमोमो' किंवा 'लमो मोल मोमो' किंवा 'लमोमोल मोमो' अशा विविध प्रकारे तोडता जोडता येतील. असे करून इ.८वीतल्या मुलींनी जुळवलेल्या या काही ओळी.

कळेना, कळेना कुणाला ? कशाला ?
सुचित्रा खुणावी उगा अश्विनीला
कळेना परंतु तिला ते कशाला ?

याच पद्धतीने मंगलाष्टकांच्या चालीवर तुम्ही गमतीदार ओळी रचू शकाल.

उदा.- '*गंगा, सिंधु, सरस्वती च यमुना चर्मण्वती नर्मदा*' ही ओळ चालीवर म्हणून पाहा. मग तिचे तीन-तीन अक्षरांचे गट पाडा. अक्षर लहान की मोठे हे ओळखून 'ल', 'मो' च्या खुणा करा. मग ती ओळ अशी दिसेल.

मोमोमो ललमो लमोल ललमो, मोमोल मोमोलमो

आता वरील गटांसारख्या शब्दांच्या याद्या करा. सुरुवातीची सोपी युक्ती म्हणजे मुलामुलींची नावे वापरूनच याद्या करायच्या. उदा.-

मोमोमो	*ललमो*	*लमोल*	*मोमोल*
सोनाली	*सुलभा*	*सुरेश*	*आमोद*
दीपाली	*प्रतिभा*	*विशाल*	*मंगेश*

मूळच्या मंगलाष्टकात जशी नद्यांच्या नावाची यादी होती. तशी या नावांची यादी आपण आता त्याच क्रमाने करू शकू.

सोनाली, सुलभा, सुरेश, प्रतिभा, मंगेश, आमोद हे !

आता ही ओळ मघाच्या मंगलाष्टकाच्या चालीत म्हणता येते की नाही याची खात्री करा. याच पद्धतीने तुम्ही आणखी काही ओळी जुळवू शकाल.

उदा.- *सारे मित्र मिळूनि काय करती, कोणीच सांगू नये !*

या मित्रमंडळाबद्दलची कविता तुम्ही पूर्ण करा.

इ.८वीच्या मुलींनी याच वृत्तात जुळवलेल्या या गमतीदार ओळी पाहा-

संगीता, अनघा, मृणालिनि तशा दीपा नि सीमा कशा ?
काळ्या या, नकट्या, कुरूप, गमती कैदाशिणी चेटक्या !

या ओळी रचणाऱ्या मुलींनी स्वत:चीच नावे वापरलेली असल्यामुळे सुदैवाने भांडणाचा प्रसंग आला नाही !

हा शेवटचा वृत्त-प्रकार हल्ली फारसा वापरला जात नाही; पण आपण तो करून पाहिला तो मुख्यत: आपल्याला हवे तसे शब्द शोधून ओळी रचण्याची क्षमता, म्हणजेच रचनाप्रभुत्व यावे म्हणून. या सर्वच प्रकरणात आपण रचनेची सफाई मिळवण्याचा प्रयत्न करीत आहोत; पण त्याच वेळी आपण हेदेखील लक्षात ठेवणार आहोत की खरा कवी किंवा लेखक फक्त येथेच थांबत नाही. मग त्यासाठी आणखी काय हवे ? ते आपण पुढे पाहणारच आहोत.

७) विडंबन–कविता

विडंबन म्हणजे वेडावून दाखवणे किंवा नक्कल करणे. दुसऱ्या एखाद्या कवीच्या कवितेची, त्याच्या लिहिण्याच्या लकबींची नक्कल करीत; पण वेगळ्याच विषयावर कविता रचणे म्हणजे विडंबन-कविता करणे. आचार्य अत्रे यांनी लिहिलेल्या अशा विडंबन-कविता तुम्हांला त्यांच्या 'झेंडूची फुले' या कवितासंग्रहात वाचायला मिळतील.

तुम्हांला जर शिक्षकांच्या किंवा मित्रांच्या नकला करणे आवडत असले, तर तुम्हाला हा प्रकार नक्कीच आवडेल. तो कसा करायचा ते आता पाहू.

एका प्रसिद्ध भावगीताची ओळ आहे-

घेऊन एकतारी गातो कबीर दोहे ।

या ओळीचे विडंबन असे करता येईल -

घेऊन एक थाळी खातो डबीर पोहे ।

हसू आले ना ? विडंबन करण्यासाठी आपण काय केले ? केवळ काही शब्दांमधली काही अक्षरे बदलली. 'तारी' ची केली 'थाळी'. या थाळीत ठेवण्यासाठी म्हणून 'दोहे' चे केले 'पोहे'. कबिराला पोहे कशाला खायला लावायचे ? म्हणून 'कबीर' चे केले 'डबीर'. त्यामुळे या नवीन ओळीला अगदी भलताच विनोदी अर्थ आला. आपण मूळचे वृत्त किंवा मूळची चाल मात्र तीच ठेवली. त्यामुळे गंमत वाढली. याच प्रकारे सबंध कडवे बदलणे किंवा त्याच्याही पुढे जाऊन संपूर्ण गाणे बदलणे शक्य आहे. करून पाहा.

इ. ८ वीच्या मुलींना एका पद्याची ओळ विडंबनासाठी दिली होती-

मुरारबाजी करि कारंजी पुरंदरावर रुधिराची ।

या ओळीचे त्यांनी असे विडंबन केले -

मुकाट बाजी करी करंजी पुरंदरावर मैद्याची !

तसेच 'युवास्नेह' संस्थेच्या मराठी वर्गाच्या इ.१०वीच्या मुलांना एका भावगीताच्या ओळी दिल्या होत्या -

सखि, मंद झाल्या तारका, आता तरी येशील का ?

या ओळींची मुलांनी केलेली विडंबने अशी होती -

१) सखि, स्वस्त झाल्या खारका, आता तरी देशील का ?

२) सखि, मंद साऱ्या बालिका, त्यांना घरी नेशील का ?

एक प्रकारे असे विडंबनच म्हणता येईल अशी भोंडल्याची नवीन गाणी इ.७वीच्या मुलींनी रचली होती. ती पुढे दिली आहेत.

१) लाल मॅक्सी नेसू कशी ? गळ्यात नेकलेस घालू कशी ?
सिनेमा पहायला जाऊ कशी ? घरी येऊन लोळू कशी ?

२) अश्शी खाण सुरेख बाई ! मला ती मिळावी
अस्सं सोनं सुरेख बाई, त्यातुन ते काढावं
अस्से दागिने सुरेख बाई, सोनाराने घडवावे
अस्से दागिने सुरेख बाई, अंगावर घालावे

३) सासू : पैशाचा वेल लाव ग सुने; लाव न सुने
मग जा सिनेमा बघायला, बघायला
दोन किलो साखर आण ग सुने, आण ग सुने
मग जा सिनेमा बघायला, बघायला
साखरेच्या करंज्या कर ग सुने, कर ग सुने ।। मग जा.. ।।
करंज्याला तूप आण ग सुने, आण ग सुने ।। मग जा.. ।।
स्टोव्हला रॉकेल आण ग सुने, आण ग सुने ।। मग जा.. ।।

सून : साखर, तूप, रॉकेल आणू कशी ?
सिनेमाला मग मी जाऊ कशी ?

सासू : वाण्याच्या पाया पड ग सुने ।
वाण्याला पैसा चार ग सुने, चार ग सुने ।।मग जा ... ।।
पैसा कुठला चारायला, रॉकेल, तूप आणायला
सिनेमाचा बेत रद्दच झाला, महागाईने सुनेचा हिरमोड केला !

याच पद्धतीने तुम्ही पाठ्यपुस्तकातल्या कविता, भावगीते, पोवाडे, लोकप्रिय, गाणी इत्यादींचे विडंबन करून पाहा.

८) समस्या–पूर्ती

कविता रचण्याचा हा प्रकार सुमारे हजार वर्षे जुना आहे. पूर्वी राजांच्या दरबारामध्ये कवींच्या समस्या-पूर्तीच्या स्पर्धा होत, हे कदाचित तुम्हीही वाचले असेल. काही दशके पूर्वीपर्यंत आपल्याकडच्या 'अमृत' किंवा 'नवनीत' सारख्या मासिकांमधून अशा स्पर्धा असत.

यामध्ये कवितेची अर्धी किंवा एक ओळ देतात. तेवढ्या ओळीवरून कवीने ती कविता पूर्ण करायची असते. दिलेली ओळ तुमच्या कवितेच्या सुरुवातीला अथवा शेवटी यायला हवी, अशी अट ठेवलेली असते. संस्कृत भाषेमध्ये श्लोक रचण्यासाठी अजूनही अशा 'समस्या-पूर्ती स्पर्धा' घेतल्या जातात.

'समस्या-पूर्ती' करताना दिलेल्या ओळीची रचना, चाल आणि अर्थ यांचे निरीक्षण करून त्याच रचनेच्या त्याच चालीच्या आणि त्या अर्थाला पुढे घेऊन जाणाऱ्या ओळी रचायच्या असतात. इ.८वीच्या मुलींच्या वर्गात असा प्रयोग केला होता. त्यांना पुढील ओळी दिलेल्या होत्या. पालुपदासाठी -

प्रबोधिनीच्या युवती आम्ही प्रबोधनाच्या दूती

पहिल्या कडव्याच्या शेवटासाठी -

त्रैलोक्यामधि मायभूमिची घुमवू उज्ज्वल कीर्ती

दुसऱ्या कडव्याच्या शेवटासाठी -

नवयुवतींच्या मनामनातुनि नवी उसळवू स्फूर्ती

विद्यार्थिनींनी रचलेल्या दोन कविता पुढे दिल्या आहेत.

१) *'प्रबोधिनीच्या युवती आम्ही प्रबोधनाच्या दूती ।*
साद घालुनी खचित जागवू निद्रित नारी-शक्ती ।।
पूर्वजांच्या पराक्रमाचे गाऊ गौरवगान
चितोडगडच्या पद्मिनीचा जौहार पसरवू जगती
शौर्याचा अभिमान बाळगू मिरवू त्याची शान
त्रैलोक्यामधि मायभूमिची घुमवू उज्ज्वल कीर्ती ।।१।।
निद्रित झाल्या भारतभूमधि उसळवुनी चेतना
भारत विश्वगुरु करण्याचे कार्य घेऊया हाती
स्त्री-मुक्तीची दीक्षा देऊ आम्ही या युवतींना
नवयुवतींच्या मनामनातुनि नवी उसळवू स्फूर्ती ।।२।।

('विशाखा देशपांडे)

२) *प्रबोधिनीच्या युवती आम्ही प्रबोधनाच्या दूती*
पुन्हा आठवू या इतिहास, न्यायाची धरु या हो कास
युक्ती, शक्ती, बुद्धीची जमवू या ही युती
त्रैलोक्यामधि मायभूमिची घुमवू उज्ज्वल कीर्ती ।।१।।
भेदांनी हा केला कहर, हरिजन सारे कष्टती मरमर
ही अस्पृश्य ती स्पृश्य या नकोत जातीपाती
नवयुवतींच्या मनामनातुनि नवी उसळवू स्फूर्ती ।।२।।

(राजश्री कापडी)

आता तुम्हांलाही समस्यापूर्ती करता येते का ते पाहा ! पुढे कवितांच्या पाच ओळी दिलेल्या आहेत. प्रत्येक ओळीपासून एक अशा पाच वेगवेगळ्या कविता रचायच्या आहेत. कविता रचताना मूळच्या ओळीची रचना, चाल आणि तिच्यातून सुचवलेला अर्थ यांच्याकडे लक्ष द्या.

१) चालला पतंग उडोनी, कोणत्या दूरच्या देशा ?
२) क्रिकेट-कौतुक पुरे झाले आता !
३) या देशाचे भविष्य उज्ज्वल ...
४) अशी शिक्षणाची कथा ही कडू !
५) अशा वेळी मला । खूप चीड येते !

९) दिलेल्या विषयावर कविता रचणे

आतापर्यंतचे सगळे पाठ जर तुम्ही सोडवलेले असले तर कोणताही विषय दिल्यावर तुम्हांला निदान चार ओळींची तरी कविता लिहिता आलीच पाहिजे. दिलेल्या विषयाचा विचार करताना त्यासंबंधीची काही दृश्ये तुमच्या डोळ्यांसमोर तरळू लागतील. त्यांचे वर्णन करण्यासाठी काही शब्द सुचू लागतील. त्या विषयाबद्दलच्या तुमच्या भावना व्यक्त करण्यासाठी काही कल्पना सुचू शकतील. एरवीही निबंध लिहिताना हे तुम्ही करीतच असता; पण कविता रचताना कोरड्या विचारांपेक्षा भावना, दृश्यांचे तपशील, नेमके चांगले शब्द आणि ओळींची रचना याकडे तुम्ही जास्त लक्ष द्याल.

'माझी शाळा' या विषयावर तुम्ही आतापर्यंत एक-दोनदा तरी निबंध नक्कीच लिहिला असेल. तोच विषय एकदा 'जागर' संस्थेच्या शिबिरामध्ये मुलींना दिला होता. त्यांनी तिथल्या तिथे रचलेल्या कवितांमधील दोन नमुने पुढे दिले आहेत. कविता लिहिण्यापूर्वी अर्थातच कल्पनाशक्तीला चालना देणारे इतर काही खेळ त्या तासाला घेतलेले होते.

१) आमचे हे आलय विद्येचे
रूप आहे हिमालयाचे
हिलाच म्हणतो आम्ही प्रशाला
पहा एकदा तुम्ही आमची शाळा
शाळा बघताना लावाल हात कपाळा
कारण जातानाच मुले करतील घोटाळा
काही जण म्हणतात इथं आहे एक भूत
पण माझं आणि शाळेचं जमतं चांगलं सूत
आमच्या शाळेत आहे एक वाचनालय
ज्याचं रूपांतर म्हणजे मुलांचं वात्रटालय
शाळेतले शिक्षक आहेत घाबरट
त्यामुळे विद्यार्थी झाले आहेत वात्रट
पण अशी माझी शाळा मला खूप आवडते
तिच्याच कुशीत सतत बसावेसे वाटते

(मीरा सरनाईक)

२) कशाला शाळा, कशाला प्रशाला ?
शाळा आहे एक खूळ मनाला !
पण शाळा आहे ज्ञानाचे आलय
खरंच ती उभी आहे जसा हिमालय
इथे लोटला ज्ञानप्रकाशाचा प्रलय,
खरं रूप त्याचं आहे ग्रंथालय
आमची सुंदर आहे शाळा
स्वागतासाठी सज्ज आहे पुतळा
बागेमध्ये आहे झोपाळा
मुले म्हणतात 'या खेळा !'
पण, जरी आमची शाळा विद्यामंदिर
तरी तिथे धावतात उंदीर !
काही ठिकाणी बदलली आहे आमच्या शाळेची कळा
उदाहरण बाचे म्हणून घ्या आमच्या शाळेचा माळा !

काहीजण म्हणतात आमच्या शाळेला स्कूल,
पण ती तर आहे त्यांची एक भूल
कारण शाळा आहे एक खूळ
जी करते करमणूक गुल
तर अशी आहे आमची शाळा
जी खरे तर आहे गोशाळा

(अनघा चाफळकर)

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या इ. ८ वीच्या मुलामुलींचे वर्षभरात सुमारे वीस-पंचवीस प्रतिभा विकसनाचे तास झाल्यानंतर त्यांची वार्षिक परीक्षा घेतली होती. या परीक्षेत इतर प्रश्नांसोबतच त्यांना 'माझे स्वप्न' या विषयावर कविता लिहायला सांगितली होती. एक विद्यार्थ्याची व एक विद्यार्थिनीची अशा दोन कविता पुढे दिल्या आहेत. या दोन्ही कविता परीक्षेच्या वातावरणात लिहिलेल्या आहेत. हे विशेष लक्षात घेण्याजोगे आहे. (त्यामुळेच उत्तरपत्रिकांवर त्यांची नावे नसून क्रमांक होते; म्हणून कवितांखाली नावे देता आलेली नाहीत.)

१) कधी वाटे कोलंबस व्हावे, मित्र घेऊनी सागरी जावे
नवनवीन भूखंड शोधावे, मुक्तपणे भटकावे.
कधी वाटे हिटलर व्हावे, सांगाती सैन्य घ्यावे
स्वस्तिक धारण करावे, आझादच मरावे.
कधी वाटे महात्मा व्हावे, रंगांनी राष्ट्रचित्र रेखाटावे
सत्याचा जोपासक व्हावे, जनमनी स्थान मिळवावे
कधी वाटे लेनिन व्हावे, साम्यवादासी पसरावे
नव राज्यच निर्मावे, मार्क्सवादासी पूजावे
कधी वाटे सैनिक व्हावे, शस्त्र हाती घ्यावे
शत्रूस ओळखावे, त्यासी शस्त्राने ठेचावे.
कधी वाटते ऋषी व्हावे, शांत आश्रमी रहावे
घोर तपाचरण करावे, ब्रह्मज्ञानचि जाणावे.
कधी वाटे अमुंडसेन व्हावे, बर्फ पायदळी तुडवावे
हिमावर पाऊल उठवावे, ध्रुवावर झेंडे रोवावे

२) *कित्येकदा रात्री मला पडते एकच स्वप्न*
ते पाहताना होऊन जाते मग्न
उंचच उंच चढून गेलेय एका पर्वतावरती
तेथून चढून बसलेय मी एका ढगावरती
ढगांचा रथ ओढताहेत पांढरेशुभ्र ससे चार
त्या सुंदर रथातून करतेय मी मुक्त संचार
जाता जाता कितीतरी पाहिल्या मी चांदण्या
डोलत होत्या, गात होत्या आवाजात किणकिण्या
त्या तोडायला गेले मी केसांमध्ये माळायला
धप्पदिशी पृथ्वीवर रथ मात्र कोसळला
हे स्वप्न पाहताना होतो मला आनंद
तेच सारखे बघण्याचा होऊन बसलाय माझा छंद

आता याच पद्धतीने तुम्ही पुढे दिलेल्या विषयांवर कविता लिहून पाहा.

१) मला भाऊ झाला/बहीण झाली तेव्हा
२) भांडलेल्या मित्राला/मैत्रिणीला उद्देशून
३) रस्त्यात पाहिलेला भिकारी
४) आघाडीवर लढणारा सैनिक
५) शाळेतला शेवटचा दिवस

१०) भावकविता लिहिणे

गीतकार हा दिलेल्या विषयावर किंवा दिलेल्या प्रसंगावर गाणी रचत असतो. कधी कधी कवीसुद्धा तसे करतो; पण मुख्यतः कवीला आपणहून लिहावेसे वाटत असते. कविता लिहिण्याची ही इच्छा बहुतेक वेळा त्याला एखाद्या प्रसंगी त्याच्या भावना उचंबळून आल्यामुळे आणि त्या शब्दांत व्यक्त केल्याशिवाय राहवत नसल्यामुळे होते. अशा कवितेला भावकविता असे म्हणतात. आपण आता भावकविता लिहून पाहणार आहोत.

१) तुमच्या आयुष्यातला एखादा उत्कट भावनात्मक अनुभव आठवून पाहा. राग, चीड, हुरहूर, उत्कंठा, प्रेम, आश्चर्य, शांती, त्वेष, दुःख वगैरेपैकी कोणत्याही भावनेशी तो संबंधित असला तरी चालेल.

२) आता डोळे मिटून काही मिनिटे स्वस्थ बसा आणि तो अनुभव कल्पनेने पुन्हा जगण्याचा प्रयत्न करा. त्या अनुभवातील स्थळ, काळ, व्यक्ती, दृश्ये,

आवाज, वास, स्पर्श, चवी, मनातल्या भावना-कल्पना-आठवणी इ.चे कल्लोळ हे सगळे पुन्हा अनुभवून पाहा.

३) आता डोळे उघडून, मघाशी जे जे अनुभवले ते ते सगळे कागदावर भरभर लिहून काढा. ते आठवेल तसे लिहा. त्यात कोणताही क्रम महत्त्वाचा नाही.

४) लिहून झालेला हा मजकूर मनामध्ये घोळवा, म्हणजेच त्यावर मनन-चिंतन करा. त्या मजकुरातला एखादा शब्द, भावनेची एखादी छटा, एखादी कल्पना यामधून कवितेची एखादी ओळ सुचते आहे का ते पाहा. या वेळी मनामध्ये एखादा ठेका किंवा एखादी चाल एका बाजूने घोळवत ठेवली तर ओळ सुचायला मदत होईल. जितके तन्मय होऊन हे मनन कराल तितक्या लवकर एक ओळ सुचेल. मग तिच्या अवतीभवती इतर ओळी सुचू लागतील. सुचलेली पहिली ओळ ही दर वेळी प्रत्यक्ष कवितेतली क्रमाने पहिलीच ओळ ठरते असे नाही.

५) आता याच पद्धतीने उरलेली कविता पूर्ण करा. तुमचा मूळचा अनुभव पूर्णपणे व्यक्त होऊ द्या.

६) आता सुचलेल्या या ओळीवरून पुन्हा नजर फिरवा. तिच्यामध्ये काही सुधारणा करायला हव्यात का ते पाहा. कधी शब्द बदलावासा वाटेल, तर कधी ओळींचा क्रम. याला कवितेचे 'संपादन करणे' असे म्हणतात. काही वेळा संपादन करताकरता अधिक चांगल्या कल्पनासुद्धा सुचू शकतात.

भावकविता लिहिण्याचा असा प्रयोग पुष्कळ शिबिरांमधून मी केलेला आहे. पुण्यातल्या 'नेतृत्व-वर्धिनी' नावाच्या संस्थेच्या एका शिबिरातल्या प्रयोगाच्या वेळी एका मुलीने वर्गाच्या खिडकीतून दिसणाऱ्या प्राजक्ताच्या झाडावर जणू ते झाडच आपले मनोगत व्यक्त करते आहे अशी कल्पना करून लिहिलेली कविता जशीच्या तशी पुढे दिली आहे -

नाही तुम्ही आता...

अंगणी घालतो । सडा मी पुष्पांचा ।
होऊन आतुर । लाडक्या मित्रांचा ।
पाहून थकलो । वाट तुझी मी ।
नाही का रे तुम्हा । येत सय माझी ?
लाडक्या मित्रांनो । या रे लवकरी ।
वेचायला फुले । या हो झणकरी ।
आठवणी आता । दाटती मनात ।

दृश्य मनोहर । ठाकते पुढ्यात ।
झुंबड व्हायची । वेचायला फुले ।
आठवून सारे । हास्य गाली फुले ।
जरी आता फुले । किती डवरती ।
नाही तुम्ही आता । म्हणून सुकती ।

(उत्पला जोशी, इ. ९ वी)

त्याच संस्थेच्या आणखी एका शिबिरात मुलींनी निवडलेला प्रसंग होता सहलीचा. त्यांच्या सिंहगडच्या सहलीत अचानक वादळी पाऊस आला होता. त्या एकाच प्रसंगावर लिहिलेल्या दोन कविता पुढे दिल्या आहेत. त्या किती भिन्न भावना व्यक्त करीत आहेत ते पाहा -

१) ढगांच्या कोंडीत
मावळत्या सूर्यात
भयाण आवाजात
मुसळधार पावसात
बिलगणाऱ्या मैत्रिणींना
भेटायला आला
वारा ! *(रोहिणी पेंडसे)*

२) वारा बिलगतोय्
पण...
मी दूर पळतीय
आभाळ दाटून आलंय
मेघ गरजतायत
ईश्वराचा कृपाप्रसाद होतोय
वारा घोंगावतोय
पण...
हे निसर्गचमत्कार पहायला
मी दुबळी ठरतीय
कृपाप्रसाद झेलू शकत नाही

घोंगावणाऱ्या वाऱ्यातील संगीत शोधत नाही
दाटलेल्या आभाळातील सौंदर्य पिऊ शकत नाही
फक्त मैत्रिणींचा आधार शोधतीय
भ्याडपणे
हे चमत्कार अनुभवायला
मी खरोखर असमर्थ आहे. *(लीना तक)*

या दोन्ही विद्यार्थिनींनी शिबिरापूर्वी कधी कविता लिहिल्या नव्हत्या; पण शिबिरामध्ये विशिष्ट पद्धतीने विचार केल्यामुळे पहिल्याच प्रयत्नात इतक्या सुंदर कविता त्या रचू शकल्या. मनात आणील त्या कुणालाही हे शक्य आहे.

आता तुम्हीही स्वत:च्या भावनात्मक अनुभवाबद्दल कविता लिहून पाहा.

२. गोष्ट लिहून पाहा

गोष्टी लिहिणाऱ्या लेखकांना त्या सुचतात तरी कशा ? गोष्टीतली माणसे त्यांना कुठे भेटतात ? गोष्टीतले प्रसंग खरोखरच त्यांच्या आयुष्यात घडलेले असतात का ? असे प्रश्न कधी तुमच्या मनात आले आहेत का ?

पण मग प्राण्यांच्या गोष्टींचे काय ? पशुपक्षी तर काही बोलत नाहीत किंवा बोलत असले तरी त्यांचे बोलणे आपल्याला समजत नाही. मग लहान मुलांना आवडणाऱ्या पशुपक्ष्यांच्या गोष्टी लेखकांना कशा काय सुचतात ?

याचे उत्तर आहे कल्पनाशक्ती ! अशी कल्पनाशक्ती लढवून आपण काही गोष्टी लिहून पाहणार आहोत.

१) कल्पना – प्रधान गोष्ट

पुढे दिलेल्यांमध्ये तुम्हांला काही सामायिक बाब किंवा सारखेपणा आढळतो का?

१) गणपती   २) नरसिंह   ३) मत्स्यकन्या   ४) स्फिंक्स   ५) तुंबरू

थोडा विचार केल्यावर तुमच्या लक्षात येईल की यातील कुणीही निसर्गात प्रत्यक्ष आढळत नाही आणि ते सगळे दोन वेगवेगळ्या प्राण्यांच्या मिश्रणातून तयार झालेले आहेत. गणपतीला शरीर माणसाचे तर डोके हत्तीचे. नरसिंहाला डोके व हात सिंहाचे तर उरलेले शरीर माणसाचे. इजिप्तमधल्या स्फिंक्सला डोके माणसाचे तर शरीर सिंहाचे. मत्स्यकन्येला कमरेच्या वरचे शरीर मुलीचे तर उरलेले शरीर माशाचे. पुराणातल्या तुंबरूचे डोके घोड्याचे तर शरीर माणसाचे. या जगावेगळ्या प्राण्यांची किंवा देवतांची निर्मिती केली पुराणकथा लिहिणाऱ्या लेखकांच्या कल्पनाशक्तीने.

मग आपणसुद्धा असे नवे प्राणी निर्माण करायला काय हरकत आहे ? त्यासाठी पुढे दिल्याप्रमाणे विचार करा.

१) वेगवेगळे पशू, पक्षी, कीटक, पाण्यातले प्राणी डोळ्यांसमोर आणा. त्यातले तीन किंवा चार निवडा. निवडताना सगळे एकाच गटातले (म्हणजे सगळेच पशू किंवा सगळेच पक्षी इत्यादी) असे निवडू नका. निवडलेल्या प्राण्यांचे वेगवेगळे अवयव किंवा शरीराचे भाग एकमेकांना जोडून कोणत्या प्रकारचा विचित्र प्राणी तयार होऊ शकेल अशी कल्पना करा. ती कागदावर लिहा.

२) तुमच्या या काल्पनिक प्राण्याचे चित्र काढा. ज्यांची चित्रकला चांगली नसेल त्यांनीसुद्धा कच्चे का होईना; पण चित्र काढावेच. म्हणजे त्या कल्पनेतल्या प्राण्याला दृश्य रूप येईल आणि तो तुमच्या नजरेसमोर बागडू लागेल.

३) आता या अभिनव प्राण्याचे नाव काय ठेवायचे ? पुन्हा तुम्ही मिश्रणाची युक्तीच वापरू शकाल. म्हणजे तुम्ही निवडलेल्या पशुपक्ष्यांच्या नावातले एक एक अक्षर घेऊन त्या अक्षरांच्या मिश्रणातून हे नाव तयार करता येईल. उदा.-'वागमा' नावाचा प्राणी तयार झाला आहे वाघाचे डोके, गरुडाचे पंख आणि माणसाचे शरीर एकमेकांना जोडून !

४) तुमचा हा प्राणी कसा काय जन्माला आला ? गणपतीच्या किंवा नरसिंहाच्या जन्माच्या गोष्टी तुम्हांला माहीत आहेत. खारीच्या पाठीवर पट्टे कसे आले, वगैरेसारख्या गोष्टी तुम्ही वाचल्या असतील. अशा गोष्टी आठवून पाहा. म्हणजे तुम्हांलाही वेगवेगळ्या कल्पना सुचू असतील. त्यातील सगळ्यांत आकर्षक कल्पना निवडा आणि तिचा वापर करून एक छोटीशी गोष्ट लिहा.

५) आता अशी कल्पना करा की तुमचा हा काल्पनिक प्राणी जंगलात गेला तर काय काय होईल ? त्याला अडचणी काय येतील ? त्याच्या विचित्र शरीराचे त्याला काही फायदे होतील की तोटे होतील ? कोणते प्राणी त्याचे शत्रू होतील, कोणते मित्र होतील ? याबाबतच्या कल्पना वापरून मूळच्या गोष्टीत भर घाला.

६) समजा, तुमचा तो प्राणी तुमच्या गावात आला किंवा शाळेत आला तर काय काय होईल ? यावर कल्पना करून तुमची गोष्ट आणखी खुलवा. मिश्रण करण्यासाठी हजारो पशू, पक्षी, कीटक तुम्हांला उपलब्ध आहेत. प्रत्येक जण त्यातील कोणतेही तीन-चार निवडणार. म्हणजे प्रत्येकाचा प्राणी वेगळा होऊ शकेल. अशा हजारो नवीन प्राण्यांच्या कल्पना करणे शक्य आहे. या प्राण्यांच्या जन्मासाठीसुद्धा देव, राक्षस, चेटक्या इत्यादींपासून अपघात आणि शास्त्रीय संशोधन येथपर्यंत शेकडो कल्पना तुम्हांला सुचू शकतील. बसा तर मग चित्र काढायला आणि लिहायला.

तुमच्या वर्गातल्या किंवा दलावरच्या मुलामुलींनी अशा सचित्र गोष्टी लिहिल्या तर त्या एकत्र करून 'विचित्र प्राणीसंग्रहालय' असा सामुदायिक प्रकल्पसुद्धा तुम्ही करू शकाल किंवा मोठ्या कागदावर चित्रे काढून त्यांचे प्रदर्शनही भरवू शकाल.

इ.७ वीतील एक मुलीने लिहिलेली अशी गोष्ट नमुना म्हणून पुढे दिलेली आहे.

कुमपंगा

मित्रांनो, 'कुमपंगा' हे प्राण्याचे नाव तुम्ही कधी ऐकले आहे ? नाही ना ? हा प्राणी कसा आला तेही तुम्हांला माहीत नाही. तर ऐका त्याची गोष्ट.

एका गावात राम व श्याम नावाचे दोन मुलगे होते. बारा वर्षांचे ते होते. एकदा त्यांच्या आईने त्या दोघांना रामपूरच्या जत्रेत पाठविले. जाताजाता रात्र झाली; म्हणून ते एका

झाडाच्या ढोलीत बसले. त्यांच्याबरोबर कुमार नावाचा त्यांचा कुत्रा होता. तो आपली भुंडी शेपटी हलवीत त्यांच्याजवळ बसला; कारण रामने त्याची शेपटी एकदा मजेने कापली होती.

रात्री अचानक त्यांना झगझगीत प्रकाश दिसला. तो त्यांच्याच रोखाने येत होता. जवळ आल्यावर कळले की तो एक देवदूत आहे. देवदूताने त्यांची विचारपूस केली व त्यांना रामपूरच्या अलिकडच्या गावात नेऊन सोडले. जाताना त्याने एक मंत्र दिला. वाटेत ते एकदा मंत्राची उजळणी करून पाहत होते आणि काय आश्चर्य? जवळ पडलेली तीन-चार पिसे व पंख कुत्र्याला येऊन चिकटले.

पुढे एक मोर जवळून जात असता राम-श्यामने मंत्र उच्चारला. त्याबरोबर मोर कुत्र्याला चिकटला. कुत्र्याच्या जोरात धावण्याने मोर फरपटून मेला; पण तो पिसारा मात्र त्याला कायमचा चिकटला. एकदा एक गाय व कुत्रा यांची टक्कर झाली. राम-श्यामने नेमका तेव्हाच मंत्र उच्चारला. कुत्रा इतक्या जोरात पुढे पळाला की गाईचे पाय अडकून ती मागे राहिली व फक्त गाईची शिंगे घेऊन कुमार पुढे सटकला.

अशा रीतीने राम-श्याम जत्रेत पोहोचले. तिथे त्यांना पाहून लोकांची करमणूक झाली. त्यांनी त्यांच्यापुढे खूप पैसे टाकले. ते घेऊन राम-श्याम घरी आले. आता ते खूप श्रीमंत आहेत आणि त्या कुमारला लोक 'कुमपंगा' म्हणू लागले.

कु(कुत्रा), म(मयूर पिसारा), पं(पंख), गा(गाईची शिंगे).

२) निसर्गातल्या घटनांचे गोष्टीतून स्पष्टीकरण

खारीच्या पाठीवर पट्टे का दिसतात ? या प्रश्नाचे जीवशास्त्रातले उत्तर काय असेल ते असो; पण कुणातरी कल्पक माणसाला फार पूर्वी हा प्रश्न पडला. त्यावेळी त्याने स्वत:च कल्पना करून त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून एक गोष्ट रचली. ती अर्थातच तुम्हांला माहीत आहे. रावणाशी लढायला जाताना राम आणि त्याची वानरसेना समुद्रावर सेतू बांधत होती. त्या पवित्र कामात एका खारीनेही आपला वाटा उचलला, मग रामाने तिच्या पाठीवर शाबासकी दिली. त्या शाबासकीची खूण म्हणजे ते पट्टे !

या गोष्टीसारखीच महाभारतातली सोनेरी मुंगसाची गोष्टदेखील तुम्हांला माहीतच असेल. आकाशात दिसणारी नक्षत्रे पाहूनसुद्धा जुन्या काळच्या लेखकांनी अढळ ध्रुव-तारा, सप्तर्षी, व्याध आणि मृग इत्यादी वेगवेगळ्या पुराणकथा रचल्या. डोंगर अचल का झाले, रात्र आणि दिवस कसे निर्माण झाले, चंद्राच्या कला का दिसतात... अशा अनेक घटनांबद्दल गोष्टी रचल्या गेल्या. त्याही तुम्हांला माहीत असतील.

मग तुम्ही अशा गोष्टी का नाही रचू शकणार? त्यासाठी आपण निसर्गाची एखादी घटना घेऊ. समजा सोनचाफ्याचे फूल पिवळेधम्मक आणि सुगंधी असते. ते तसे का झाले असेल? किती तरी कल्पना तुम्हांला सुचू शकतील. मुळामध्ये या फुलाचे रंगरूप कसे असेल? संपूर्ण पिवळा रंग हा शिक्षा म्हणून मिळाला असेल की बक्षीस म्हणून? तसेच घमघमणारा सुवास हा गुण समजायचा की दोष? तो कसा काय आला असेल? शिक्षा किंवा बक्षीस सोनचाफ्याला कशामुळे मिळाले असेल? कोणी दिले असेल? या प्रश्नांची उत्तरे शोधताशोधता तुमच्या मनात गोष्ट आकार घेऊ लागेल. तर ती लिहून काढा. मित्रमैत्रिणींना सांगून पाहा. त्यांच्या सूचनांनुसार तिच्यात बदल करून ती जास्त मनोरंजक करा.

तुमच्यासारख्याच मुलामुलींना सुचलेल्या काही गोष्टी नमुन्याबद्दल पुढे दिलेल्या आहेत.

१) एका गावात एक पुजारी असतो. त्या पुजाऱ्याच्या मागच्या अंगणात चाफ्याचे झाड असते. तो चाफा पुजाऱ्याच्या स्वप्नात येऊन त्याला म्हणाला, "माझ्यावरच्या शेंड्यावर एक मोहक व सुंदर फूल आहे. ते तू तोडून देवाला वाहा." दुसऱ्या दिवशी पुजाऱ्याने ते फूल वाहिले; पण नंतर ते झाड हळूहळू कोमेजू लागले; कारण जे फूल त्याने देवाला वाहिले होते त्यात त्या झाडाचा आत्मा होता. ही गोष्ट विष्णूला कळली. त्याने ती लक्ष्मीला सांगितली. तेव्हा लक्ष्मीला त्याची दया आली. त्याची देवनिष्ठा पाहून तिने सोन्याच्या नाण्यांचा रस करून त्यात कमळाचा सुगंधी रस घालून तो झाडावर ओतला. त्याला एक टवटवीत सोनचाफ्याचे झाड केले.

२) सोनचाफा पहिल्यांदा पांढरा होता. त्याला वासही नव्हता. एक दिवस त्याने देवाची प्रार्थना केली. तेव्हा देवाने प्रसन्न होऊन त्याला औषध दिले. ते म्हणजे झेंडूचे फूल. देवाने त्याला सांगितले की ते फूल (औषध) पहिल्यांदा धुऊन अंगाला घास. सोनचाफ्याने लोभाच्या मोहात ऐकलेच नाही. विसरून गेला व मनोरथ करीत बसला. देव अदृश्य झाला. जेव्हा त्याला जाग आली तेव्हा जेवढे ऐकले होते तेवढे केले. नुसते पाण्यात बुडवून झेंडूचे फूल अंगाला घासले. त्याचा पिवळा रंग लागला. तो सूर्याच्या किरणांत बसला व त्यामुळे रोज चकाकी येत होती. मग त्याला झेंडूचा वास येऊ लागला. तेव्हा त्याने देवाची माफी मागितली. खरे बोलण्याबद्दल देवाला आनंद वाटला. देव म्हणाला, "वास येण्यासाठी तू वास असलेल्या सोन्याच्या खाणीत जाऊन ये."

३) सृष्टी निर्माण करतेवेळी देवाने सर्व फुले पांढरीच केली. हे पाहून फुलांना वाईट वाटले व त्यांनी देवाकडे गाऱ्हाणे नेले. तेव्हा देवाने त्यांना रंग घ्यायला बोलावले. सर्व फुले गेली.

परंतु सोनचाफ्याला रस्त्यात एक म्हातारी भेटली. तिला चाफ्याने मदत केली. तो पुढे निघाला; पण त्याला पोहोचायला उशीर झाला व स्वर्गाचे दरवाजे बंद झाले. वाटेत त्याला म्हातारी भेटली. सोनचाफ्याने तिला सर्व कहाणी सांगितली. तोच म्हातारीच्या जागी पिवळे वस्त्र व सर्व पिवळी अशी स्त्री उभी राहिली. तिने चाफ्यावर आपला पदर टाकला. दोन थेंब पाणी टाकले. ताबडतोब चाफ्याचा रंग पिवळा झाला व तो सुगंधी झाला.

४) सोनचाफा आधी चांदणी होता. एकदा त्या चांदणीला पृथ्वीवर यावेसे वाटले. तेव्हा त्या पिवळ्या चांदणीने पृथ्वीवर उडी मारली व पिवळ्या फुलात तिचे रूपांतर झाले. तेथे जवळच चंदनाची व केवड्याची बने होती. भुंगे केवड्यातील सुगंधी रस शोषून तो सोनचाफ्यावर साठवायचे. त्यामुळे तो रस सर्व फुलांमध्ये पसरला व फुलाला सुगंध प्राप्त झाला. अशा तऱ्हेने सोनचाफ्याचे फूल पिवळे व सुगंधी बनले.

५) पूर्वी फुलांना उडता येई. एकदा फुलांचा राजा गुलाब याने सोनचाफ्याला सांगितले की सूर्याकडे जा. जाईजुईसाठी भोपळा भरून सुगंध आण. सोनचाफा निघाला. उडतउडत जाताना देव काही दिसेना. तेवढ्यात सूर्य दिसला. त्याला वाटले 'सूर्य हाच देव'; म्हणून तो सूर्याकडे गेला. सूर्याच्या प्रचंड उष्णतेने त्याचे पंख निकामी झाले. तेजाने तो पिवळा पडला. त्याच्याकडून सुगंध घेऊन सोनचाफा भरकटत आला गुलाबाकडे ! गुलाबराजाला आनंद झाला. त्याने जाईजुईला सुगंध दिला व उरलेला सगळा सुगंध सोनचाफ्याच्या कामगिरीवर खूष होऊन त्यालाच देऊन टाकला !

याच धर्तीवर पुढे दिलेल्या विषयांवर तुम्ही गोष्टी लिहून बघा

१) काजव्याला उजेड कसा मिळाला ?

२) बेडूक पाण्यात आणि जमिनीवरही असा उभयचर का झाला ?

३) पोपटाचे अंग हिरवे; पण चोच लाल का ?

४) गाईबैलांना वशिंड का असते ?

५) पृथ्वीवरची पाच खंडे एकमेकांपासून दूर का झाली ?

३) अद्‌भुत-कथा

निसर्गात आधीच असलेल्या वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण देण्यासाठी तुम्ही गोष्टी लिहिल्यात. त्या गोष्टींमध्ये तुम्ही कारणांविषयीचे अंदाज बांधले.

त्याचप्रमाणे एखाद्या घटनेच्या परिणामांचे अंदाज बांधणे हेदेखील कल्पनाशक्तीचेच काम आहे. एखादी अद्‌भुत घटना घडली तर तिचे कोणकोणते परिणाम होऊ शकतील, अशा कल्पना करून या गोष्टीच्या रूपात मांडता येतात.

उदा.-झाडे सध्या एकाच जागी स्थिर असतात. समजा, झाडांना चालता येऊ लागले तर... ही घटना अर्थातच प्रत्यक्षात घडू न शकणारी, असंभाव्य आणि म्हणून अद्‌भुत आहे; पण तसे झालेच तर त्याचे काय काय परिणाम होतील ? कल्पना करायला सुरुवात करा.

१) झाडे काय काय करतील ?
२) तुमच्या माहितीचे एखादे विशिष्ट झाड काय करील ?
३) तुम्ही स्वत: काय कराल ?
४) तुमच्या घरचे लोक, मित्रमैत्रिणी काय करतील ?
५) आदिवासी, लाकूडतोडे, शास्त्रज्ञ, प्रवासी इत्यादी वेगवेगळ्या प्रकारचे लोक काय काय करतील ?

या मुद्द्यांच्या अनुरोधाने विचार करताना तुम्हांला पुष्कळ कल्पना सुचतील.

पण नुसते त्या कल्पनांचे वर्णन केले तर तो कल्पनाप्रधान निबंध होईल. गोष्ट होणार नाही. गोष्टीमध्ये एखाद्या माणसाच्या आयुष्यात घडलेल्या घटनांचे वर्णन असायला हवे. त्यासाठी तुमच्या गोष्टीमध्ये काही नेमकी ठिकाणे हवीत आणि त्या त्या ठिकाणी चालणाऱ्या झाडांशी संबंधित काही प्रसंग घडायला हवेत. प्रसंग घडतो म्हणजे काय होते ? गोष्टीतली माणसे, म्हणजेच पात्रे काही कृती करतात. त्या कृतीचे त्यांच्यावर, इतरांवर काही परिणाम होतात. इतरांकडून काही प्रतिक्रिया व्यक्त केल्या जातात. या सगळ्याला मिळून आपण प्रसंग घडला असे म्हणतो. गोष्टीमध्ये अशा प्रसंगांची आपल्याला प्रथम कल्पना करायची असते. नंतर त्यातले मोजके प्रसंग निवडायचे असतात. त्यानंतर त्या प्रसंगांची गुंफण किंवा रचना अशा रीतीने करायची असते की गोष्ट वाचणाऱ्याला सारखे 'मग पुढे काय झाले ?' असे वाटत राहिले पाहिजे.

प्रसंगाचे वर्णन असे करायला हवे की वाचणाऱ्याला वाटावे की तो प्रसंग प्रत्यक्ष आपल्यासमोर घडतो आहे ! हे कशामुळे वाटते ? तर प्रसंगातली स्थळे, पात्रे आणि त्यांच्या क्रिया-प्रतिक्रिया यांच्याबद्दलचे वेचक तपशील सांगितल्यामुळे.

आतापर्यंत सांगितलेल्या माहितीच्या आधारे तुम्ही तुमच्या गोष्टीतील पात्रे प्रथम

ठरवा. या गोष्टीमध्ये अर्थातच माणसे आणि पशुपक्षी यांच्या जोडीने चालणारे एक झाड किंवा अनेक झाडे हीसुद्धा महत्त्वाची पात्रे असणार. कदाचित सगळी गोष्ट तुम्ही स्वत: आणि चालणारे एकच झाड या दोघांमध्येच घडणारी असू शकेल.

पात्र एकदा ठरल्यानंतर ठिकाणे ठरवा. मग प्रसंग ठरवा. सुचलेल्या अनेक प्रसंगांपैकी मोजक्याच चार-सहा प्रसंगांची निवड करा. मग या निवडलेल्या प्रसंगांचे तपशील ठरवा. त्यानंतर गोष्टीची सुरुवात कशी करायची आणि शेवट कसा करायचा हे ठरवा. म्हणजे तुमचा गोष्टीचा आराखडा पूर्ण होईल.

कागदावर लिहिलेला हा आराखडा काही काळ मनात घोळवा. गोष्टीतला प्रत्येक प्रसंग डोळे मिटून कल्पनेच्या पातळीवर जणू काही प्रत्यक्ष घडतो आहे असे डोळ्यांसमोर आणा. म्हणजे त्या प्रसंगांचे अनेक तपशील तुम्हांला सुचू लागतील. प्रसंगांचे कल्पनाचित्रण करता येणे ही कवी आणि लेखक यांच्याजवळची फार महत्त्वाची क्षमता आहे. ती आपण सरावाने वाढवू शकतो.

तुमचे कल्पनाचित्रण चांगले झालेले असले तर पुढचे काम खूपच सोपे होते; कारण आता जणू काही तुम्ही प्रत्यक्ष अनुभवलेल्या प्रसंगाचेच वर्णन करणार असता. शिल्लक राहिलेले काम फक्त हे सगळे लिहून काढण्याचे. बहुतेक गोष्टींमध्ये स्थळांना, पाळीव प्राण्यांना, माणसांना नावे दिल्यामुळे ती ती स्थळे व पात्रे खरी वाटू लागतात; म्हणून वर्णनांमध्ये शक्य तेथे विशेषनामांचाही वापर करा.

आता तुमची लिहून झालेली गोष्ट एक-दोनदा स्वत: वाचा. शक्य झाल्यास ती कुणाला तरी वाचून दाखवा आणि त्याचे मत विचारा. एखादा प्रसंग अनावश्यक वाटतो का ? वर्णन पाल्हाळीक होऊन लांबले आहे का ? उलट एखाद्या प्रसंगाचे वर्णन तो पुरेसा खुलवण्यापूर्वीच तुटले आहे का ? गोष्टीची सुरुवात लक्ष वेधून घेणारी झाली आहे ना ? गोष्टीचा शेवट वाचकाला पटणारा, थोडासा चकित करणारा आणि बराच काळ लक्षात राहणारा झाला आहे ना ? या मुद्द्यांच्या साहाय्याने गोष्टीचे परीक्षण करा आणि आवश्यक तेथे तिच्यात सुधारणा करा. नंतर गोष्टीला चांगलेसे शीर्षक म्हणजे नाव द्या.

निबंधाच्या तासाला तुम्ही फार तर दिलेल्या मुद्द्यांवरून गोष्ट लिहिली असेल; परंतु ही गोष्ट मात्र संपूर्णपणे तुमचीच निर्मिती असेल !

झाडे चालू लागली तर ... याच विषयावर इ.६वीच्या मुलींनी लिहिलेल्या दोन गोष्टी पुढे दिल्या आहेत.

१) एकदा काय झाले, मी बसले असता सगळीकडे मला लोकांची धावपळ गडबड ऐकू आली. मी धावतपळत बाहेर आले. बघते तर काय ? झाडे पळत आहेत आणि त्यांच्यामागे लोक. मी चकित होऊन बघतच राहिले.

मला काय झाले कुणास ठाऊक ? मीसुद्धा झाडांच्या मागे पळू लागले. मी माझ्या नादात झाडांच्या मागे पळत होते. लोक केव्हा निघून गेले हे मला कळलेसुद्धा नाही. एके ठिकाणी ते झाड थांबले आणि त्या झाडाबरोबर मीही थांबले. बघते तर मी आणि झाड एका जंगलात आलो होतो. मी खूप घाबरले आणि रडत बसले.

झाडाला माझी दया आली. त्याने त्याची फळे खाली टाकली. मला आधीच भूक लागली होती. मी हावरटासारखी फळे खाऊन टाकली.

नंतर खूप रात्र झाली. इकडून तिकडून भीतिदायक आवाज ऐकू येऊ लागले. मी घाबरून पुन्हा रडू लागले. झाडाला पुन्हा दया आली आणि त्याने मला त्याच्या मांडीवर झोपायला जागा दिली. मला बरे वाटले.

सकाळी उठल्यावर मी पुन्हा रडू लागले. झाडाने मला विचारले, ''तू का रडतेस?'' मी सांगितले, ''मला माझ्या घरी सोड''. झाडाने मला त्याच्या अंगावर बसवून घरी नेले.

२) एक काळ असा होता की त्या काळात झाडे चालू शकत होती. एक झाड लक्ष्मीरोडवरून जात होते. तेथे जवळच असलेल्या हॉस्पिटलमधील एका बाळाला त्याने उचलले व फांद्यांनी कुरवाळून ठेवून दिले.

गोखले हॉलमध्ये कपड्यांचे प्रदर्शन होते. तिथले दोन-चार कपडे उचलले व आपल्या फांद्यांवर ठेवून दिले. समोरच्या दुकानातून काही साड्या व शालूही घेतले व तेही फांद्यांवर ठेवून दिले. लोक आश्चर्याने पाहत होते.

असे खूप ठिकाणी हिंडून ते जाग्यावर येऊन उभे राहिले. लोकांनी आपापल्या जागांना कुंपणे घातली.

या झाडाबरोबर दोन-चार बागांनी व जंगलाने मिटिंग भरवली. मग सर्वांनी ठरवले की आपले एक नवीन गाव निर्माण करायचे. दूरदूरचे लोक पाहायला येऊ लागले. या गावाचे सर्वांनाच आश्चर्य वाटले.

असेच पाहणीसाठी जपानी पाहुणे येणार होते; पण त्यांची फजिती करण्यासाठी ही झाडे दूरवर निघून गेली. पाहुणे हताश होऊन गेल्यावर ती झाडे परत आली. अशी पाहुण्यांची फजिती केली.

याच विषयावर तुम्ही यापेक्षाही चांगली गोष्ट लिहू शकाल. ती तर लिहाच. शिवाय पूर्वी सांगितलेली संपूर्ण पद्धत वापरून पुढे दिलेल्या विषयांवरही गोष्टी लिहा -

१) एके दिवशी सकाळीच तुमच्या अंगणात जिवंत कांगारू आढळला...

२) तुमच्या गावाजवळचे तळे अंधारात चमकू लागले...

३) घरच्यांबरोबर अंदमानच्या सहलीला गेलेले असताना तुम्ही चुकून मागेच राहिलात...

४) विज्ञान-कथा

अद्‌भुत कथेचाच पुढचा भाग म्हणजेच विज्ञानकथा. दोन्हींतील फरक इतका कमी आहे की यापूर्वी ज्या विषयावर आपण अद्‌भुत कथा लिहिली त्याच, 'झाडे चालू लागली तर...' या विषयावर इंग्रजीमध्ये 'द डे ऑफ द ट्रिफिड्स' नावाची विज्ञानकादंबरी लिहिली गेलेली आहे.

जो फरक आहे तो इतकाच की विज्ञानकथेमध्ये अद्‌भुत घटना शोधण्यासाठी विज्ञानाचा आधार घेतलेला असतो. जे शोध आता लागलेले नाहीत; पण आणखी काही काळानंतर लागण्याची शक्यता आहे, असे शोध लागले आहेत अशी कल्पना करून, मग त्या शोधांचे काय काय परिणाम होतील असा विचार करून कथानक (अर्थात प्रसंगाचा आराखडा) रचत जाणे म्हणजे विज्ञानकथा लिहिणे.

तुमच्यापैकी काहीजणांनी डॉ.जयंत नारळीकर यांनी लिहिलेल्या 'यक्षांची देणगी' 'उजव्या सोंडेचा गणपती', इ. सुंदर विज्ञानकथा वाचल्या असतील किंवा 'ईटी', 'बॅक टू फ्यूचर', 'जुरॅसिक पार्क' असे काही विज्ञानकथांवर आधारित चित्रपट पाहिले असतील. अशा विज्ञानकथांच्या लेखनाची सुरुवात सुमारे दीडशे वर्षांपूर्वी 'ज्यूल व्हर्न' (इ.स.१८२८-१९०५) या फ्रेंच कादंबरीकाराने केली. पाणबुडी आणि अग्निबाण (रॉकेट) यांचा प्रत्यक्ष शोध लागण्यापूर्वी पन्नास वर्षे आणि माणूस चंद्रावर उतरण्यापूर्वी शंभर वर्षे तसे शोध लागतील अशा कल्पना त्याने केल्या होत्या. त्या कल्पनांवर कादंबऱ्या लिहिल्या होत्या. त्याच्या आणि इतरही काही परदेशी लेखकांच्या विज्ञानकथांचे मराठी अनुवाद झालेले आहेत. ते मिळवून तुम्ही वाचू शकाल.

कथेची रचना कशी करायची हे तुम्ही आधी पाहिलेलेच आहे. आता विज्ञानकथेचा प्राण असलेल्या अद्‌भुत शोधांच्या कल्पना कशा शोधायच्या ते पाहू.

कोणकोणते शोध लागावेत असे तुम्हांला वाटते ? तुमच्या कल्पनाशक्तीला स्वैर सोडा आणि अशा शोधांची यादी करा.

उदा.- *१) माणसाला हवे तेव्हा अदृश्य होता यावे.*
२) भूतकाळातल्या हव्या त्या कालखंडात जाता यावे.
३) भविष्यातल्या घटना आधीच समजाव्यात.
४) पाण्याखाली घर बांधून राहता यावे.
५) मत्स्यकन्येशी दोस्ती व्हावी.
६) परग्रहावरच्या जीवसृष्टीशी बोलता यावे.
७) हुबेहूब माणसासारखा दिसणारा यंत्रमानव (रोबो) करता यावा.
८) नुसत्या नजरेने वस्तू इकडून तिकडे हलवता याव्यात.
९) दोनशे वर्षे जगता यावे.
१०) माणसाच्या एका पेशीपासून संपूर्ण माणूस तयार करता यावा.

या यादीत तुमच्या निदान १५ कल्पनांची भर घाला. नंतर त्यातली तुम्हांला आवडणारी कोणतीही कल्पना निवडा. तो शोध प्रत्यक्ष लागलेला असला तर त्याचे इतर परिणाम काय काय होतील असा विचार करा. त्यातून पात्रे आणि प्रसंग ठरवा. प्रसंगाचा क्रम नीट लक्षात ठेवा. एकेका प्रसंगाचे मनातल्या मनात कल्पनाचित्रण करून तपशील निश्चित करा. आता तुमची गोष्ट लिहून काढा. कोणाला तरी ती वाचून दाखवा. आवश्यक तेथे सुधारणा करा.

हे सगळे करणे सुरुवातीला अवघड वाटले तर सरावासाठी पुढे दिलेल्या आराखड्यावरून विज्ञानकथा लिहा.

१) अँड्रोमिडा आकाशागंगेतल्या एका ग्रहाचा रहिवासी तुम्हांला भेटतो.
२) पृथ्वीच्या विनाशाचे भविष्य तो सांगतो.
३) हा विनाश टाळण्याचा उपायही तो सुचवतो.
४) तुम्ही तो उपाय अमलात आणता.

५) गोष्ट लिहिण्याची आणखी एक युक्ती

'संयोगातून नवनिर्मिती' ही युक्ती नव्या गोष्टी रचण्यासाठी वापरता येते. कशी ते पाहू. एखादी गोष्ट म्हटली की तिच्यात काय काय असते? काही पात्रे असतात. काही जागा असतात. या जागी त्या पात्रांच्यामध्ये काही महत्त्वाचे प्रसंग घडतात. पुढे काही पात्रे, जागा आणि प्रसंग यांची सुचेल तशी यादी केली आहे.

पात्रे	जागा	प्रसंग
चलाख कुत्रा	डोंगराळ भाग	छळ
दुष्ट म्हातारी	वाळवंट	लढाई
चित्रकार	समुद्रकिनारा	समझोता
शास्त्रज्ञ	पडका किल्ला	सुटका
पाळलेले कबूतर	पाणबुडी	पाठलाग
अपंग मुलगा	विमानतळ	हृदय परिवर्तन

तुम्हीही हवे तर अशी वेगळी यादी करू शकाल. आता, या यादीतील पात्रांपैकी कोणतेही एक पात्र, जागांपैकी कुठलीही एक जागा आणि प्रसंगांपैकी कोणताही एक प्रसंग निवडा. उदा.-

कुत्रा	वाळवंट	समझोता
अपंग मुलगा	विमानतळ	लढाई
शास्त्रज्ञ	पडका किल्ला	हृदय परिवर्तन

आता या शब्दांवर एकत्रितपणे विचार करा. तसे करताकरता, जेथे हे शब्द एकत्र येऊ शकतील अशा घटना तुमच्या डोळ्यांसमोर उभ्या राहू लागतील. त्या घटनांची नीट गुंफण केली असता एखाद्या गोष्टीचा, कथेचा सांगाडा तयार होईल.

उदा. - शास्त्रज्ञ वाळवंटी प्रदेशातील पडक्या किल्ल्यात कैदेत, जवळच्या वस्तीत अपंग मुलगा, त्याने पाळलेला कुत्रा, लढाई चालू, जवळच्या विमानतळावर शत्रूचा अधिकारी, अपंग मुलगा त्याचे हृदय परिवर्तन करून समझोता घडवतो, शास्त्रज्ञाची सुटका.

गोष्टीचा हा सांगाडा तुमच्यासारख्याच एका विद्यार्थ्याला दोन मिनिटांत सुचलेला आहे. या पद्धतीने वर दिलेल्या यादीतूनच शेकडो घटनांची गुंफण करून पाहू शकाल आणि त्यातूनच तयार होतील तुमच्या स्वतःला सुचलेल्या नव्या कोऱ्या गोष्टी. सांगाड्याच्या आधाराने, मुद्द्यांवरून गोष्ट लिहिण्याची सवय तुम्हांला असेलच. त्यासाठी प्रत्येक घटना खुलवून विस्ताराने लिहिणे, जागांची आणि माणसांची तपशीलवार वर्णने करणे, मधूनमधून संवाद घालणे इत्यादी तुम्हांला आता माहीत झालेले आहेच.

या पद्धतीने तुम्ही गोष्टी रचा आणि लिहा.

*** *** ***

३. संवाद-लेखन

गोष्टी कशा सुचू शकतात हे आत्तापर्यंत आपण पाहिले. एखाद्या गोष्टीचा सांगाडा सुचला की, ती गोष्ट दोन प्रकारांनी लिहिता येते. पहिला प्रकार म्हणजे ती सरळ गद्यात लिहिणे. यावेळी लेखकाने वर्णन करणाऱ्याची भूमिका घेतलेली असते. जणू काही गोष्टीतल्या प्रत्येक घटनेचा तो एक अदृश्य साक्षीदार असतो ! काही वेळेला लेखक गोष्टीतल्या एखाद्या पात्राच्या तोंडून ती सर्व गोष्ट सांगतो. उदा.-'शास्त्रज्ञाची सुटका' ही गोष्ट शास्त्रज्ञच आपल्या मित्रांना सांगतो आहे किंवा तो अपंग मुलगा सांगतो आहे किंवा शत्रूचा अधिकारी सांगतो आहे अशा तीन प्रकारे लिहिता येणे शक्य आहे.

हीच गोष्ट केवळ संवादाच्या माध्यमातून लिहिता येईल का ? म्हणजेच त्या गोष्टीचे नाटुकले किंवा एकांकिका करता येईल का ? असे करताना काही फायदे होतील का? किंवा काही अडचणी येतील ?

गोष्ट लिहिताना पडक्या किल्ल्याचे आपल्याला वर्णन करावे लागते. एकांकिका लिहिताना या वर्णनातील फक्त मुख्य ठळक गोष्टी कंसात लिहिल्या तरी पुरतात; कारण वाचक त्या पडक्या किल्ल्याची कल्पना करू शकतो. जेव्हा एकांकिकेचा रंगमंचावर प्रयोग करायचा असेल तेव्हा दिग्दर्शक त्याच वर्णनाच्या आधारे पडक्या किल्ल्याचे नेपथ्य (सेट) उभारू शकतो. हाच प्रकार गोष्टीतल्या इतर जागांची वर्णने आणि शास्त्रज्ञ, मुलगा इत्यादी पात्रांच्या दिसण्याची, कपड्यांची, हावभावांची, हालचालींची वर्णने यांच्या बाबतीत होते. त्यामुळे एकांकिकेतला किंवा नाटुकल्यातला सगळ्यात महत्त्वाचा भाग उरतो तो म्हणजे संवाद. म्हणजेच पात्रांचे एकमेकांशी होणारे बोलणे! पात्रांच्या मनात येणारे विचार किंवा भावना यांचे वर्णन गोष्ट लिहिताना किती तरी शब्द वापरून करता येते; पण एकांकिकेत मात्र ते सगळे शब्द संवादातून व्यक्त व्हावे लागतात. असे प्रभावी संवाद लिहिता येणे तुम्हांलाही हळूहळू जमू शकेल.

त्याची सुरुवात तुम्ही निरीक्षणानेच करू शकाल. आपल्याच घरामध्ये आपली आई कशी बोलते, एकच गोष्ट बाबांना सांगताना, मावशीला सांगताना, आपल्या धाकट्या बहिणीला सांगताना आणि आपल्याला सांगताना कसा कसा फरक करते याकडे लक्ष द्या. हा फरक, वापरलेले शब्द, वाक्याची लांबी, वाक्य पूर्ण करणे अथवा अपूर्णच ठेवणे इत्यादी अनेक बाबतीत असेल. समोरच्या व्यक्तीशी असलेले नाते, सांगताना मनात असलेल्या भावना, सांगण्यासाठी उपलब्ध असलेला वेळ, त्यावेळी तिसरी व्यक्ती तिथे असणे किंवा नसणे अशा अनेक बाबींचा परिणाम आईच्या सांगण्यावर होत असेल. अशाच पद्धतीने घराबाहेरही भेटणाऱ्या किंवा दिसणाऱ्या व्यक्तींच्या आपापसातल्या बोलण्याचे निरीक्षण करा. ते वापरत असलेले शब्द, भाषा,

बोलतानाच्या त्यांच्या लकबी, म्हणजे विशिष्ट शब्दांवर जोर देणे, काही शब्दांची पुनरावृत्ती, चुकीच्या इंग्रजी शब्दांचा वापर इत्यादींकडे लक्ष द्या. लक्षात येणाऱ्या महत्त्वाच्या बाबी टिपून ठेवा.

असे निरीक्षण झाल्यानंतर 'शास्त्रज्ञाची सुटका' या आपल्या गोष्टीकडे पुन्हा वळा. गोष्टीतला अपंग मुलगा कुत्र्याबरोबर रानात भटकत असताना पडक्या किल्ल्यापाशी आलेला आहे. सहज झरोक्यातून बघताना त्याला बांधून ठेवलेला माणूस (तो माणूस शास्त्रज्ञ आहे, हे त्याला अजून कळलेले नसणार) दिसतो. यानंतर तो मुलगा आणि शास्त्रज्ञ किंबहुना प्रथम मुलगा आणि कुत्रा आणि नंतर मुलगा आणि शास्त्रज्ञ, यांच्यात काय काय संवाद होईल अशी कल्पना करून तो लिहून काढा. एकदम कल्पना करणे अवघड वाटले तर दोन-चार मित्र जमवून, त्यांच्याबरोबर या प्रसंगाचे नाटक करून बघा. तसे करताना आपण होऊन उत्स्फूर्तपणे जसे सुचेल तसे बोला आणि नंतर ते संवाद लिहून काढा.

आता हे संवाद तुम्हीच तपासून पाहा. मुलाची भाषा मुलाला शोभणारीच आहे ना ? प्रारंभी तो थोडा घाबरलेला असेल; पण त्याला उत्सुकताही वाटत असेल. नंतर त्याला शास्त्रज्ञाबद्दल सहानुभूती आणि अभिमान किंवा आदर वाटू शकेल. या सर्व भावना त्याच्या बोलण्यातून व्यक्त होत आहेत ना, तसेच शास्त्रज्ञाचे बोलणे, त्याने वापरलेले शब्द, त्याच्या वाक्यांची लांबी हे शास्त्रज्ञाला शोभेलसे आहे ना, त्याच्या मनात शत्रूविषयीची चीड, स्वदेशाविषयीचा अभिमान, सुटका करून घेण्याचा निश्चय, मुलाविषयीचे कौतुक, सुटकेची योजना आखतानाचा शांतपणा आणि चिकित्सकपणा इत्यादी भावभावना असू शकतील. त्या सर्व त्याच्या बोलण्यातून व्यक्त होत आहेत ना, त्यांचा हा संवाद विशिष्ट प्रसंगांच्या संदर्भातलाच वाटतो आहे ना, की शाळेला भेट द्यायला आलेल्या शास्त्रज्ञाशी विद्यार्थ्याने बोलावे तसासुद्धा वाटतो आहे ? अशा विविध दृष्टिकोनांतून तुम्ही लिहिलेला संवाद तपासून पाहा. मित्राशीही चर्चा करा. आवश्यक तेथे फेरफार करा.

याच पद्धतीने 'शास्त्रज्ञाची सुटका' ही संपूर्ण गोष्ट किंवा तुम्हांला सुचलेली दुसरी एखादी गोष्ट संवादरूपाने लिहा.

*** *** ***

४. विनोद-निर्मिती

विनोद ऐकून किंवा वाचून, व्यंगचित्र पाहून किंवा दूरदर्शनवरील विनोदी कार्यक्रम अथवा चित्रपट पाहून आतापर्यंत कधीच हसू आले नाही असे तुमच्यापैकी कोणी तरी आहे काय ? अशी पुस्तके, चित्रे किंवा चित्रपट आठवून पाहा. पु.ल.देशपांडे यांची अनेक पुस्तके किंवा त्यावरच्या ध्वनिफिती (कॅसेट), नियतकालिकांमधले विनोद, वर्तमानपत्रातली व्यंगचित्रे, शि.द.फडणीस यांचा 'हसरी गॅलरी' हा व्यगंचित्रांचा संग्रह, दूरदर्शनवरचे 'उलटापुलटा ' सारखे कार्यक्रम, 'जाड्या रड्या' किंवा 'चार्ली चॅप्लिन'चे चित्रपट... वैयक्तिक आवडीनुसार ही यादी वाढतच जाईल.

त्या त्या लेखकांना किंवा व्यंगचित्रकारांना या विनोदी कल्पना कशा काय सुचतात? आपल्यालाही त्या सुचू शकतील का ? असा विचार आता करायचा आहे.

सुरुवात आपण आपल्या अनुभवातूनच करू. प्रत्यक्ष व्यवहारात तुम्हांला केव्हा केव्हा हसू येते ? अशा प्रसंगांची यादी करा. पुस्तकातले, नाटक-सिनेमातले प्रसंग लिहू नका. केवळ तुम्ही अनुभवलेले प्रसंगच लिहा.

उदा.– १) खूप लठ्ठ माणूस वजनाच्या यंत्रावर उभा असताना.
२) छोटा भाऊ किंवा बहीण आजोबांचा चष्मा,काठी हाती घेऊन त्यांची नक्कल करीत असताना.
३) ऐकायला कमी येणाऱ्या आत्याशी बोलताना.
४) पुरुष फुटाबॉलपटूने केस वाढवून त्यांची वेणी घातलेली पाहून.
५) तांब्या पाण्याने भरलेला असेल असे समजून तो जोर लावून उचलावा, तर तो रिकामाच असल्याने जास्तच वर उचलला जाऊन फसगत होते तेव्हा.
६) जोराच्या वाऱ्याने उडून चाललेली हॅट पकडण्याचा प्रयत्न करणारा माणूस बघून.

या यादीत तुमच्या अनुभवांची भर टाका.

या प्रत्येक प्रसंगी आपल्याला हसू का येते ? असा विचार करा. अशा प्रसंगांचाच वापर विनोदी लेखक खुबीने करून घेत असतो. त्याची निरीक्षणशक्ती चांगली असल्याने हसू आणणारे प्रसंग तो शोधून काढतो. यालाच काहीजण 'घडलेला विनोद टिपणे' असे म्हणतात. 'एकदा काय मजा झाली' अशी सुरुवात करून तुम्ही जर शाळेतले, घरचे, सहलीतले किंवा क्रीडांगणावरचे गमतीदार प्रसंग सांगून मित्रमंडळींना हसवू शकत असलात तर ही विनोददृष्टी तुमच्याकडे आहेच. शिवाय घडलेल्या विनोदी प्रसंगाचे शब्दात वर्णन करण्याची क्षमताही तुमच्याकडे आहे.

'तुम्हांला एक जोक सांगू का ?'...असे म्हणून एका पाठोपाठ एक पुष्कळ चुटके किंवा किस्से सांगून हसवणारी मुले प्रत्येक वर्गात असतातच; पण ती फक्त इतरांनी लिहिलेले विनोद पाठ करून सांगत असतात. त्यातून त्यांचे वक्तृत्वाचे गुण दिसतात. ते चांगलेच आहे; पण आपण आता त्यांचा विचार करीत नाही. आपण विचार करीत आहोत तो आपल्या स्वत:च्या अनुभवातले गमतीदार प्रसंग वेगळे काढून त्यांचे वर्णन करता येण्याचा.

पण विनोदी लेखक येथेच थांबत नाही. कथालेखक ज्याप्रमाणे फक्त प्रत्यक्ष घडलेले प्रसंग सांगून थांबत नाही, तर आपल्या कल्पनाशक्तीने नवीन प्रसंगांची रचना करतो, त्याचप्रमाणे विनोदी लेखकही आपल्या कल्पनाशक्तीने लोकांना हसवणारे नवे काल्पनिक प्रसंग रचतो. अशा प्रसंगांबद्दलच्या कल्पना म्हणजेच विनोदी कल्पना त्याला सतत सुचत असतात. अशा विनोदांना काही जण 'केवळ विनोद' असे म्हणतात. वेगळ्या शब्दांमध्ये सांगायचे तर 'घडलेला विनोद' ही विनोदाची 'डिस्कव्हरी' आहे, तर 'केवळ विनोद' हे विनोदाचे 'इन्व्हेन्शन' आहे !

माणसे केव्हा हसतात, याचा अभ्यास करून विनोदी लेखकांनी काही तंत्रे शोधून काढलेली असतात. एकदा तुमच्याकडे मजेशीर प्रसंगांमधली गंमत मोकळेपणाने अनुभवण्याचा स्वभाव आणि असे प्रसंग हेरण्याची विनोददृष्टी असली आणि त्यानंतर विनोदी लेखकांची ही तंत्रे जर तुम्ही शिकलात, तर तुम्हांलाही नवीन विनोद रचता येतील. ते निबंधामध्ये किंवा भाषणामध्ये वापरता येतील. पुढे जाऊन संपूर्ण विनोदी लेख अथवा गोष्ट किंवा विनोदी व्यक्तिचित्रसुद्धा लिहिता येईल. चित्रकलेची आवड असली तर तुम्ही व्यंगचित्रकारही होऊ शकाल.

साधारणपणे आपल्या अपेक्षेपेक्षा काही वेगळे घडले आणि जर ते त्रासदायक असले तर आपल्याला दु:ख होते. उलट, एखादी गोष्ट अपेक्षेपेक्षा वेगळी घडली आणि ती जर त्रासदायक नसली, तर आपल्याला हसू येते. हे विनोदाचे मुख्य सूत्र आहे. विनोदकार याचाच वापर करीत असतो.

श्लेष, कोट्या किंवा विडंबन-कविता हे विनोदाचे प्रकार आपण आधीच वेगळ्या संदर्भात पाहिले आहेत. तेथेही हे अपेक्षाभंगाचेच सूत्र असते. 'डोळे आलेत' हे सांगणाऱ्या माणसाच्या मनात 'डोळे' नावाचे गृहस्थ आले आहेत असा अर्थ असल्यामुळे त्या गृहस्थांच्या येण्याबद्दल काही उत्तर मिळेल अशी त्याची अपेक्षा असते; पण त्या अपेक्षेला धक्का देऊन 'मग औषध आणू का ?' हे उत्तर समोरच्या व्यक्तीकडून येते. आपल्या सांगण्यातूनच 'डोळे येणे' हा नेत्रविकारसुद्धा सूचित होतो, हे त्याला नंतर जाणवते आणि हसू येते; पण त्याच ठिकाणी ती व्यक्ती जर श्री.डोळे यांच्या येण्यामुळे काळजीत पडलेली असली किंवा पुढच्या विचारांनी व्यग्र झालेली असली तर 'मग

औषध आणू का ?' या उत्तरातल्या अपेक्षाभंगाचा तिला त्रास होईल. हसू येण्याऐवजी तिला राग येईल आणि 'फाजिलपणा पुरे' असले काही तरी ती म्हणेल. अपेक्षाभंगावर आधारलेली इतर काही तंत्रेही विनोदी साहित्यात आढळतात. ती आता पाहू.

१) विसंगती

एखादी गोष्ट अमुक एका प्रकारची असावी अशा अपेक्षेपेक्षा ती वेगळीच असणे म्हणजे विसंगती. लहान मुलासमोर एखादे नवे काका आले तर ते मोठ्या माणसासारखे बोलतील अशी त्याची अपेक्षा असते; पण त्यांनी एकदम मांजराचा आवाज काढला तर त्याला ते विसंगत वाटते आणि तो हसतो. उलट लहान मुलाने आजोबांचा चष्मा लावून त्यांच्यासारखे हातवारे केले की आपल्याला ते त्याच्या वयाशी विसंगत वाटते आणि आपण हसतो. या दोन्ही ठिकाणी आढळलेली विसंगती खटकणारी किंवा अनुचित नसते. 'हसरी गॅलरी' मध्ये विसंगतीवर आधारलेली काही सुंदर व्यंगचित्रे आहेत.

उदा.– १) *भाववाढ निषेध सभेमध्ये व्यासपीठावरील महिला एकमेकींच्या भारी साड्यांची किंमत विचारीत असतात.*

२) *फळीवर ठेवलेली प्रथमोपचार पेटी अंगावर पडते आणि तिच्यामुळेच जखम होते.*

विसंगतीची अशी कितीतरी उदाहरणे आपल्याला अवतीभवती आढळत असतात. अशा विसंगतींची तुम्ही यादी करा. उदा.-

१) *ऐन रहदारीच्या शहरी रस्त्यावरून ऐतिहासिक पोशाख घातलेला तरुण घोड्यावर बसून चालला आहे.*

२) *शहरी वक्ता खेड्यातल्या सभेत ग्रामीण ढंगाने बोलण्याचा चुकीचा प्रयत्न करतो आहे.*

३) *अशिक्षित माणूस इंग्रजी शब्द चुकीच्या अर्थाने वापरत आहे.*

४) *भारी दागदागिने घातलेल्या बाई काटकसरीचा उपदेश करीत आहेत.*

५) *कोकणातल्या सहलीला एक मुलगी लोकरीचे कपडे घेऊन आली आहे.*

६) *चट्ट्यापट्ट्याचा नाइट पायजमा घालून भर दिवसा एक माणूस घाईघाईने चालला आहे.*

७) *किडकिडीत माणूस छाती पुढे काढून पैलवानी थाटात चालला आहे.*

८) *बेडकाचं डिसेक्शन शिकविणाऱ्या बाई झुरळाला पाहून घाबरत आहेत.*

९) *म्हाताऱ्या बाई पुन:पुन्हा पर्समधल्या आरशात बघून विरळ झालेले केस ठाकठीक करत आहेत.*

१०) *'स्मरणशक्ती कशी वाढवावी ' या विषयावर व्याख्यान देणारे वक्ते मुद्दा विसरून 'त त प प' करीत टिपण शोधायला लागताहेत.*

या यादीत तुम्ही आणखी भर घाला. वय आणि वागणे, वय आणि पोशाख, हवामान आणि पोशाख, बोलणे आणि वागणे, स्थळ आणि वागणे, प्रसंग आणि वर्तन, नाते आणि वर्तन, हेतू आणि परिणाम इ. अनेक प्रकारच्या विसंगती तुम्हांला सापडतील.

या पुढचा टप्पा म्हणजे विनोदी कल्पनेचे संवादात, गोष्टीत किंवा चित्रात रूपांतर करणे. इ.८वीच्या विद्यार्थ्यांनी त्यांना सुचलेल्या कल्पनांवर पुढीलप्रमाणे विनोद रचले-

१) एकदा सर मुलाच्या वहीवर शेरा लिहितात. तर तो मुलगा विचारतो, ''सर, काय शेरा दिला आहे ?'' सर म्हणतात, ''अरे, एवढेही कळत नाही ? ' अक्षर सुवाच्य काढावे' असा शेरा आहे.''

२) बाई मुलांना सांगत असतात, ''मुलांनो, योग्य आहार आणि व्यायाम करा म्हणजे बांधा सुडौल होतो आणि शरीर काटक राहते,'' एक मुलगा हात वर करून प्रश्न विचारतो, ''बाई तुमचं वजन किती हो ?'' कारण बाई खूप लठ्ठ असतात.

३) रावसाहेब आपल्या शहरी चश्मिस नातवाला हिणवत असतात,''काय तुम्ही आजकालची मुलं, एवढ्या लहान वयात चष्मा ! नाहीतर आम्ही पहा.'' एवढं म्हणताम्हणताच उंबऱ्याला अडखळून रावसाहेब खाली पडतात.

याशिवाय व्यंगचित्रासाठी म्हणून सुचवलेल्या दोन कल्पना अशा होत्या-

१) 'परदेशी कपडे वापरू नयेत ' असे सांगणारा माणूस स्वत: शर्ट पँट घातलेला. पँटच्या खिशावर 'मेड इन यू.एस्.ए.' असा ठळक छाप.

२) स्वत: मोठी हेअर स्टाईल केलेल्या एक शिक्षिका विद्यार्थिनींना बाह्य सौंदर्यापेक्षा आंतरिक सौंदर्याचे महत्त्व पटवून देत असतात. त्यावेळी त्यांचा मेकअप चकाकत असतो.

याच पद्धतीने तुम्हांला सुचलेल्या विनोदी कल्पनांमधून चुटके रचा. विनोद प्रभावी होण्यासाठी तो कमीत कमी शब्दांत लिहिता यायला हवा. तुम्ही लिहिलेला चुटका किंवा संवाद या दृष्टीने तपासून पाहा आणि आवश्यकतेनुसार त्यात सुधारणा करा.

२) अतिसंगती

एखादी गोष्ट विशिष्ट प्रकारे घडत असताना ठराविक टप्प्यापर्यंत ठीक वाटते, तर्कसंगत वाटते; पण तोच तर्क त्या टप्प्याच्या पलीकडे ताणला तर मात्र हसू येते. 'अति झालं अन् हसू आलं' असे होते. यालाच 'अतिसंगती' असे म्हणतात. हे तंत्रही विनोदकार बऱ्याच वेळा वापरतात. 'हसरी गॅलरी'मध्ये अतिसंगतीवर आधारित किती तरी व्यंगचित्रे आहेत.

उदा. –

१) पुतळ्याची सफाई करणारी बाई पुतळ्याचे दात घासण्यासाठी टूथ ब्रश वापरते.

२) दोघांना बक्षीस विभागून मिळाले असल्यामुळे अध्यक्ष एका स्पर्धकाला नुसता चषक व दुसऱ्याला त्याची लाकडी बैठक असे विभागून देतात.

३) सर्कशीतली बाई कपडे वाळत घालताना त्या दोरीवरून चालत पुढे जाते.

४) सुताराच्या घरच्या कोंबडीची पिल्ले अंड्यातून बाहेर येताना अंड्याला चौकोनी दरवाजा करून त्यातून बाहेर पडतात.

हे तंत्र वापरण्यासाठी लोकांच्या वेगवेगळ्या प्रवृत्ती, सवयी किंवा स्वभावातले दोष आणि समाजातल्या चालीरीती किंवा शिष्टाचाराचे नियम यांचे निरीक्षण लागते. यांपैकी प्रत्येक गोष्ट अपेक्षेबाहेर ताणली की हास्यास्पद ठरते. याला काही जण 'अतिशयोक्ती' असे म्हणतात ; पण अतिशयोक्ती म्हणजे नुसतेच फुगवून सांगणे अथवा मोठे करून सांगणे असा अर्थ बऱ्याचदा घेतला जातो; म्हणून मी 'अतिसंगती' असा नवा शब्द सुचवितो आहे. तर प्रथम आपण वृत्ती, प्रवृत्ती इ. ची यादी करू.

उदा.-१) **शारीरिक व्यंगे** : काळा रंग, गोरा रंग, लठ्ठपणा, किडकिडीतपणा, तिरळे बघणे, तोतरेपणा, बोबडेपणा, कर्कशपणा.

साधारणपणे शारीरिक व्यंगे ही त्या त्या व्यक्तीवर निर्सगाने लादलेली असतात. त्यामुळे अशा व्यंगांवर विनोद झाले तर त्या माणसांना वाईट वाटते ; म्हणून असे विनोद करू नयेत. तथापि काळ्या रंगावर राम गणेश गडकरी यांनी, तर लठ्ठपणावर पु.लं.नी विनोद केलेले आहेत.

२) **स्वभावातील दोष** : कंजूषपणा, विसरभोळेपणा, बावळटपणा, धांदरटपणा, निलाजरेपणा, बेरकीपणा, बढाईखोरपणा, मिजासखोरपणा, लंपटपणा, हावरटपणा, गळेपडूपणा, फटकळपणा, अरेरावी, चिडखोरपणा, भित्रेपणा, घुमेपणा इ.

चिं.वि.जोशी, पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यात अशा दोषांची काही अतिशयोक्त वर्णने आढळतात.

३) **प्रवृत्ती, चालीरीती इ.** : वरिष्ठांसमोर लाचारी करणे, पाश्चात्यांचे अंधानुकरण करणे, आरोग्याबाबत फाजील दक्ष असणे, ऐतिहासिक व्यक्तींबद्दलचा पराकोटीचा भक्तिभाव, स्त्रियांनी असेच वागले पाहिजे, तसेच वागले पाहिजे असे नियम, बारीकसारीक गोष्टीत चिकित्सा करीत बसणे इ.

आता या तिसऱ्या यादीतील मुद्द्यांवर रचलेले काही विनोद पाहा -

१) साहेबांचा फोन आला तरी ते उभे राहून कमरेत वाकून फोनवर बोलतात.

२) त्यांना इंग्रजीची दांडगी हौस ! थोरल्या बेबीला त्यांनी मम्मी, डॅडी म्हणायला शिकवलं. धाकट्या बॉबला सध्या ते इंग्रजीत रडायला शिकवत आहेत.

३) तिथली माणसं आरोग्याबाबत अतिदक्ष ! बुटावर ओरखडा उठला म्हणून टिटॅनसचं इंजेक्शन घेताना मी एकाला पाहिलं !

४) महाराज नेहमी घोडी वापरायचे हे कळल्यापासून श्रीयुत शिवभक्त टांग्यात बसण्यापूर्वी ''घोडा की घोडी ?'' असे विचारतात आणि घोडी असली तरच त्या टांग्यात बसतात.

५) तिकडे पडदा पद्धती फार कडक, जेवायला वाढताना पुलाव उघडा आणला तरी चालतो. बिर्याणी मात्र झाकूनच आणली पाहिजे असा नियम आहे म्हणतात!

६) ती माणसं अतिशय चिकित्सक ! एकदा शिंक आली असता ''शिंकावं की शिंकू नये''असा विचार करताकरता एकाचे प्राण गेल्याची गोष्ट ऐकायला मिळाली.

आता याच पद्धतीने तुम्ही काही स्वभावदोषांबद्दल विनोद रचा.

१) एखादी **धांदरट व्यक्ती** कशी वागत असते ? तिच्या हातून कशा प्रकारच्या चुका होतात ? धांदरट नोकरामुळे पाहुण्यांची कशी फजिती होते हे नाटुकले तुमच्यापैकी पुष्कळांनी वाचले असेल, पाहिले असेल किंवा त्यात कामही केले असेल. फरशीवरचे साबणाचे पाणी पुसायचे राहून जाते; म्हणून पाहुणे घसरून पडतात. चहात रॉकेल पडलेले असते आणि खुर्ची पुसण्याऐवजी तिला डिंक लावल्याने पाहुणे खुर्चीला चिकटून बसतात ! तसा समजा, एखादा धांदरट मुलगा जर तुमच्या वर्गात असला तर तो कसा वागेल ? प्रथम त्याची कंपासपेटी खाली पडते. ती उचलायला तो खाली वाकतो तर वरच्या खिशात ठेवलेले सुटे पैसे आवाज करीत खाली पडतात आणि घरंगळत दूर जातात. ते घेण्यासाठी तो उठतो तर मागच्या बाकावरील मुलाचे दप्तर त्याच्या धक्क्याने खाली पडते. तसाच तो पैशांपर्यंत जातो आणि पैसे गोळा करायला खाली वाकतो तर चष्मा खाली पडून फुटतो. ते सगळे मेटाकुटीने गोळा करून तो कसाबसा आपल्या जागेपर्यंत येतो तर खिडकीतून जोराचा वारा येतो आणि त्याचे चित्रकलेचे कागद इतस्तत: उडून जातात...

तुमच्या डोळ्यांसमोर ही दृश्ये उभी राहिली का ? मग हा प्रसंग खुलवून लिहून पूर्ण करा.

तुम्ही बसने जात आहात. बसमध्ये तुम्हांला असाच एक धांदरट माणूस दिसतो. त्याच्या बाबतीत काय काय प्रसंग घडतील ? छोट्या दहा-बारा प्रसंगांची मालिका रचून तिचे वर्णन लिहा.

आता समजा एखादी बाई धांदरट आहे. तर तिच्या घरकामात काय काय प्रकारचे गमतीदार घोटाळे होतील ? कल्पना करून वर्णन लिहा.

२) हल्ली पुष्कळ कुटुंबांमध्ये **'फॉरेन'च्या म्हणजे परदेशात तयार झालेल्या वस्तू वापरण्याची हौस** असते. तिचा अतिरेक झाला तर ती हास्यास्पद ठरते. अशी कल्पना करा की अशा एखाद्या कुटुंबात तुम्ही पाहुणे म्हणून गेला. त्या घरातली माणसे वेगवेगळ्या वस्तूंची आणि उपकरणांची (अर्थात फॉरेनच्या !) माहिती तुम्हांला सांगताहेत. तुम्ही भोळेपणाचा आव आणून वेगवेगळे प्रश्न विचारून त्यांच्या फिरक्या घेत आहात. या सगळ्या प्रसंगाचे वर्णन लिहून काढा. ज्या वस्तू परदेशी असल्या तर फार विशेष नाही अशांचे (उदा.-घड्याळ) वर्णन हे फक्त पार्श्वभूमी म्हणून उपयोगी पडेल; पण त्यातून विनोद उत्पन्न होणार नाही. विसंगती कुठे उपयोगी पडू शकेल? जेव्हा ते लोक एखाद्या परदेशी वस्तूचे खूप गुणगान करतील; पण त्या वस्तूत काही ढोबळ उणिवा असतील आणि त्या तुमच्या लक्षात आल्यावर जेव्हा ते सारवासारव करू लागतील, तेव्हा. उदा.- त्यांनी आणलेले कपडे आपल्या इथल्या हवामानात निरुपयोगी ठरले म्हणून किंवा बटण तुटून हरवले आणि तसे बटण पुन्हा मिळाले नाही म्हणून किंवा पहिल्याच धुण्यामध्ये ते आटले म्हणून ते सध्या वापरात नाहीत. व्ही.सी.आर.आणलेला आहे; पण आपल्याकडच्या व्ही.डी.ओ. कॅसेट त्याला चालत नाहीत; म्हणून तो नुसताच पडून आहे. एखादे सयामी मांजर आणले आहे; पण त्याची बडदास्त ठेवण्याकरिता आवाक्याबाहेर खर्च करावा लागत आहे आणि ते ऐदी मांजर घरातील उंदरांना अजिबात पकडत नाही, वगैरे. अशा जास्तीत जास्त विसंगतींच्या कल्पना तुमच्या लेखात वापरा.

अतिसंगतीतून विनोद कसा निर्माण करता येईल ? ज्या वस्तू भारतातही तयार होतात त्या परदेशातून आणल्या; कारण त्यांचा दर्जा चांगला असेल असे वाटले. येथपर्यंत तर्कसंगत वाटते; पण ज्या गोष्टी खास भारतीयच असतात अशा गोष्टींसाठीही जर ही मंडळी परदेशी पर्याय वापरत असली, तर ती अतिसंगती होईल. उदा.-देवघर आणि देवपूजेच्या वस्तू. म्हणजे जपानमध्ये तयार झालेली त्रिमितीचा आभास देणारी गणपतीची तसबीर किंवा मेक्सिकोतल्या 'एलेफंट गॉड'ची तसबीर, वातीसाठीचा कापूस इजिप्तमधला इ. जेथे अतिरेक झाल्यासारखे वाटेल अशा आणखी वस्तूंची कल्पना करा आणि तुमच्या लेखातले विनोद चढवीत चढवीत न्या. मग ते मित्रांना वाचून दाखवा. त्यांनाही हसू आले तर त्या प्रसंगातला विनोद त्यांच्यापर्यंत पोचवण्यात तुम्ही यशस्वी झालात. जर तसे झाले नाही तर तुमचा लेख दोनतीनदा वाचून त्यात सुधारणा करा. अनावश्यक वर्णनाचा फापटपसारा असेल तर विनोदाचा प्रभाव कमी होतो. त्यामुळे ते टाळा.

३) आपल्या **मुलांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास** झालाच पाहिजे अशा कल्पनेने झपाटलेले आईवडील, त्यांची शाळेत जाणारी मुले- एक मुलगा व एक मुलगी.

उन्हाळ्याच्या सुट्टीत आईवडील आपल्या मुलांना वेगवेगळ्या क्लासेसमध्ये गुंतवून टाकतात. या अतिरेकामुळे त्यांच्या घरात एकच गोंधळ उडालेला असतो. त्या गोंधळाचे वर्णन विनोदी पद्धतीने लिहून काढा.

धांदरटपणा, 'फॉरेन'चे वेड आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा अतिरेक हे तिन्ही लेख लिहिताना विसंगत आणि अतिसंगत प्रसंगांची कल्पना करता येणे आणि वर्णनामध्ये शाब्दिक विनोद म्हणजे श्लेष आणि कोट्या करता येणे हे पुरेसे असते.

याशिवाय विनोदी चुटक्यांचा आणखी एक प्रकार असतो.

3) कलाटणी

या प्रकारामध्ये कलाटणी हे तंत्र वापरलेले असते. चुटक्याच्या पहिल्या अर्ध्या भागात वाचणाऱ्याला एका विशिष्ट दिशेने टप्प्याटप्प्याने नेले जाते. पुढचा टप्पा याच दिशेने असेल अशी अपेक्षा मुद्दाम उत्पन्न केली जाते आणि मग दुसऱ्या अर्ध्या भागात झटकन दिशा बदलली जाते. एखादा अनपेक्षित मुद्दा समोर येतो. यालाच 'प्रसंगाला कलाटणी देणे' असे म्हणतात.

उदा.– *''माफ करा हं; पण येथे एखादा पोलीस दिसला का तुम्हांला ? आणि आसपास कुठे पोलीसचौकी तरी आहे का ?''*

''चौकी तर खूपच दूर आहे आणि पोलीस कधी इकडे येतच नाही.''

''असं का. मग मुकाट्याने पैशाचे पाकिट काढा पाहू.''

या चुटक्यामध्ये पहिल्या व्यक्तीच्या प्रश्न विचारण्यावरून ती व्यक्ती अडचणीत असावी आणि पोलीसचौकी शोधीत असावी असा दुसऱ्या व्यक्तीचा आणि वाचकांचाही समज होतो. त्यामुळे ही दुसरी व्यक्ती तत्परतेने माहिती पुरवते. येथपर्यंत एका दिशेने चाललेला प्रसंग शेवटच्या वाक्यात एकदम दिशा बदलतो. पहिली व्यक्ती अडचणीत सापडलेली नसून चोर आहे, हे दुसऱ्या व्यक्तीला कळते आणि वाचकांनाही. दुसरी व्यक्ती अर्थातच हसण्याच्या अवस्थेत असणार नाही ; पण वाचकांना मात्र या कलाटणीने हसू फुटते.

याच प्रकारचे आणखी काही चुटके पाहा -

एक शेजारी – ''कृपया तुमचा तंबोरा, पेटी आणि तबला आज मला द्याल ?''

दुसरा (उत्साहाने) – ''का ? आज तुमच्याकडे मैफल आहे वाटते ?''

पहिला – ''नाही ! एक दिवस सुखाने झोपायचे आहे !''

काही वेळेला पहिल्या कलाटणीनंतर दुसरी कलाटणी साधून विनोद आणखी वाढवला जातो.

उदा.– *वकीलसाहेबांच्या घरी त्यांच्या शेजारचा हलवाई येऊन म्हणाला, ''एखाद्या*

कुत्र्याने जर आमच्या दुकानातले पदार्थ पळवले, तर त्याची भरपाई मला त्या कुत्र्याच्या मालकाकडून कायदेशीरपणे वसूल करता येईल का ?"

"हो हो" वकीलसाहेब म्हणाले.

"हो ना ! मग तुमच्या कुत्र्याने माझ्या दुकानातली चाळीस रुपयांची आंबा बर्फी खाल्ली त्याचे पैसे द्या."

"पण माझी फी पन्नास रुपये आहे. तेव्हा अजून दहा रुपये तुम्हीच मला द्या. म्हणजे भरपाई होईल !"

असे बरेच चुटके तुम्हांला वर्तमानपत्रात, मासिकात किंवा पुस्तकात वाचायला मिळतील. ते काळजीपूर्वक वाचा आणि विशेषत: शेवटची कलाटणी कशी दिली आहे याचा अभ्यास करा.

आता या प्रकारे कलाटणीवर आधारित विनोद तुम्हांला रचता येतात का ? असा प्रयत्न करून पाहा. त्यासाठी वेगवेगळे प्रसंग निवडा.

उदा.- *१) शिक्षक आणि विद्यार्थी*
२) आई आणि मुलगा
३) वडील आणि मुलगी
४) मित्र-मित्र यांचे संवाद इ.

समजा यांपैकी शिक्षक-विद्यार्थी संवाद घेतला तर त्यात अपेक्षा आणि अपेक्षाभंग असे प्रसंग कोणकोणते असू शकतील? शिक्षक गृहपाठ देणार नाहीत असे वाटते;पण अपेक्षाभंग होतो.आता या प्रसंगाबद्दल जर चुटका रचायचा असला तर प्रथम ज्यामुळे शिक्षक गृहपाठ देणार नाहीत असा विद्यार्थ्यांचा समज होईल असा संवाद रचायला हवा.

उदा.- शिक्षक - "मुलांनो उद्या काय आहे ?"
"रविवार !" मुले एका सुरात ओरडतात.
शिक्षक - "आणि परवा ?"
"रंगपंचमी !" मुले आणखी जोरात म्हणतात.
शिक्षक - "आणि तेरवा ?"
"शाळेचा वाढदिवस !"
शिक्षक- "सलग तीन दिवसांच्या या सुट्टीत भरपूर मजा करा"...
"हुईऽऽऽ" मुले आनंदाने ओरडतात.-
शिक्षक- "आणि बुधवारी येताना 'मी मजा कशी केली' या विषयावर २५ ओळींचा निबंध लिहून आणा."

आता आई आणि मुलगा यांच्या संवादाची कल्पना करा. त्यात अपेक्षा आणि

अपेक्षाभंग कसा असू शकेल ? उदा.-मुलगा आपण उद्यापासून अगदी शहाणपणाने वागणार असे आईला सांगून तिच्या मनात अपेक्षा उत्पन्न करतो आणि आज नेमकी उलटी सवलत मागतो. हा संवाद लिहून पाहू.

मुलगा – *(गंभीर चेहऱ्याने)''आई गं, मी उद्यापासून रोज पहाटे उठणार आहे.''*

आई – *''हो का ?''*

मुलगा – *''आणि रोज दोन तास अभ्यास करणार आहे. आमच्या बाईंनी तसं वेळापत्रकच आखून दिलंय.''*

आई – *''शहाणं माझं बाळ ते.''*

मुलगा – *''मग आता मी चिंटूकडे खेळायला जाऊ ?''*

आता असे चुटके तुम्ही रचून पाहा; पण चुटक्यांचा उपयोग मर्यादितच असतो. नियतकलिकांमध्ये पानपूरके म्हणून किंवा गप्पा मारताना एकमेकांना सांगण्यासाठी. एखादा लेख, व्यक्तिचित्रण किंवा एकांकिका यांच्या कोंदणामध्ये जर असे चुटके किंवा किस्से बसवता आले तर खरे !

मुळामध्ये लेखक विनोदी वाङ्मय का लिहितो ? आपल्याला कळलेली गंमत इतरांना सांगून त्यांना हसवण्यासाठी किंवा कोणाची तरी फिरकी घेण्यासाठी, टिंगल-टवाळी करण्यासाठी, दुसऱ्यांच्या वागण्यातल्या एखाद्या विसंगतीकडे किंवा दोषाकडे लक्ष वेधण्यासाठी. तुमच्या मनातही ही इच्छा प्रबळ झाली की तुम्हांला विनोदी कल्पना सुचू लागतील.

* * *

५. वर्णनातली सूचकता

लेखकाला चांगले वर्णन करता आले पाहिजे. चांगले वर्णन करताना चांगले शब्द, चांगली विशेषणे, चांगली क्रियाविशेषणे सुचली पाहिजेत. असे शब्द वापरून वर्णन करणे म्हणजे थेट वर्णन करणे; पण वर्णन करताना अप्रत्यक्षपणे किंवा सूचकपणे करणे असा दुसरा प्रकार असतो. या प्रकारात लेखकाच्या कल्पनाशक्तीची खरी कसोटी असते. अशा पद्धतीने केलेले वर्णन वाचणाऱ्यालाही जास्त आनंद देते; कारण ते वाचत असताना वाचकालासुद्धा आपली कल्पनाशक्ती वापरावी लागते. त्यामुळे तो जास्त सक्रिय बनतो.

सूचक पद्धतीने वर्णन करण्याच्या काही युक्त्या आपण पाहू.

१) उपमा देणे

ही युक्ती कवी आणि लेखक मंडळी अगदी रामायणकाळापासून वापरीत आली आहेत. उपमा म्हणजे तुलना किंवा दोन वेगवेगळ्या गोष्टींमधला सारखेपणा ! चांगल्या उपमा सुचण्यासाठी असा सारखेपणा शोधता आला पाहिजे. इतरांच्या लक्षात न आलेले साम्य दाखवून देणे म्हणजे नवीन उपमा सुचणे. हे साम्य गमतीदार बाबतीत असले तर तीच उपमा विनोदी ठरते.

वरच्या वर्गातल्या विद्यार्थ्यांनी कदाचित अभ्यासक्रमातला एक भाग म्हणून उपमेचा, तिच्या प्रकारांचा आणि उदाहरणांचा अभ्यास केला असेल. इथे आपण तसा अभ्यास करणार नाही तर आपल्याला नवीन उपमा कशा सुचतील याचा विचार करणार आहोत.

१) तुमच्या पाठ्यपुस्तकातील कविता आणि धडे यांमध्ये आलेल्या उपमांपैकी तुम्हांला आवडलेल्या दहा उपमा घ्या. त्या तुम्हांला का आवडल्या याचा विचार करा. उदा.-बालकवींच्या कवितेत इंद्रधनुष्याला 'दुहेरी गोफ' किंवा 'मंगल तोरण' आणि हिरवळीला'गालिचा' अशा उपमा आढळतील. त्या वाचून तुम्हांला काय वाटते ?

२) आता समजा, मी म्हटले की, 'शाळा ही एखाद्या शेतासारखीच असते.' तर तुम्ही या उपमेचा विस्तार कसा कराल ? कोणकोणत्या बाबतीत, कशा प्रकारे तुम्हांला शाळा ही शेतासारखी वाटते ?

३) पुढील गोष्टींची उपमा कशाकशाला किंवा कुणाकुणाला देता येईल ?

(क) लोहचुंबक (ख) हिरा (ग) पाऊस

४) वेगवेगळ्या उपमा वापरून पुढील घटनांचे वर्णन करा -

(क) शाळा सुटली आणि मुले बाहेर पडली.

(ख) क्रिकेटमध्ये भारताने श्रीलंकेचा पराभव केला.

उपमांचा वापर भाषेत आणि साहित्यातच होतो, असे मात्र नाही. विज्ञानातसुद्धा 'डोळा कॅमेऱ्यासारखा असतो' किंवा 'हृदय पंपासारखे असते.' असे म्हटले की

समजायला सोपे जाते. नवीन शोध लावतानाही काही वेळा उपमा उपयोगी पडतात. लाकूड पोखरणारा किडा पाहून एका स्थापत्यशास्त्रज्ञाला त्याचप्रमाणे बोगदा खणण्याची युक्ती सुचली. सध्या मेंदू आणि संगणक यांच्या कार्यातल्या साम्याचा अभ्यास शास्त्रज्ञ करताहेत आणि त्यामुळे त्यांना नवीननवीन गोष्टी कळताहेत आणि सुचताहेत.

मग - सुचताहेत का तुम्हांला काही छानदार उपमा ?

२) प्रतिमांचा वापर

भावनांचे वर्णन सूचक पद्धतीने करण्यासाठी अवतीभवती घडणाऱ्या घटनांमधील काही दृश्ये किंवा आवाज यांचे वर्णन करणे म्हणजे प्रतिमांचा वापर करणे. प्रतिमा म्हणजे डोळे, कान इ. ज्ञानेंद्रियांनी पाठविलेली आणि मनावर ठसलेली विशिष्ट माहिती. कधी स्वत:च्या भावना व्यक्त करण्यासाठी किंवा कथा-लेखक गोष्टीतल्या पात्रांच्या मनातल्या भावना व्यक्त करण्यासाठी दृश्यांच्या किंवा आवाजांच्या प्रतिमांचा वापर करतात.

उपमा देत असताना 'पोते फुटून बटाटे इकडेतिकडे घरंगळावेत त्याप्रमाणे मुले वर्गातून बाहेर पडली.' किंवा 'वाघ पाठीमागे लागल्यासारखी ती धावत होती.' याप्रमाणे ही गोष्ट त्या गोष्टीसारखी आहे अशी प्रत्यक्ष तुलना केलेली असते. प्रतिमा वापरताना मात्र अशी प्रत्यक्ष तुलना नसते.

उदा. - 'त्याने पत्र वाचून संपविले आणि खिडकीतून बाहेर पाहिले . सारे आकाश काळवंडलेले होते. अमावास्येची अंधारी रात्र होती. दूरवर एक कुत्रे केकाटत होते.' या वर्णनात काळवंडलेले आकाश, अंधारी रात्र, कुत्र्याचे केकाटणे यातून कोणती मन:स्थिती किंवा भावना सुचवलेली आहे ? ते वाचकानेच समजून घ्यायचे असते. तेथे ती भावना निराशेची आहे. हे तुम्ही ओळखलेच असेल. आता पुढील काही वर्णने वाचा आणि त्यातील प्रतिमांमधून सुचवलेली भावना ओळखा.

१) सोनाली वसतिगृहातून घरी चालली होती. गाडी आज किती हळू चालली आहे असे तिला राहूनराहून वाटत होते.

२) वातावरण धुंद झाले होते. आकाशात ढगांची दाटी झाली होती. वारा थांबला होता. कोणत्याही क्षणी पाऊस सुरू होईल असे वाटत होते.

३) खडी चढण चढून तो वर आला व बोगद्यात शिरला.उजेडाचा प्रदेश मागे पडला.तो चालतच होता. हा बोगदा कधी संपणारच नाही असे त्याला वाटत होते.

४) रोहितने वर मान करून समोर पाहिले. पाण्याचा तो प्रचंड प्रवाह गर्जत, फुसांडत दरीत झेप घेत होता. त्याची गर्जना सगळ्या दरीत भरून राहिली होती.

५) आणि आज एकदम गाणे थांबले. कॅसेट अडकून तिचा गुंता झाला आणि विचित्र आवाजात चरचरत रेकॉर्डरची नुसतीच मोटर फिरत राहिली.

वरील प्रतिमांमधील भावना जर तुम्हांला ओळखता आल्या असल्या तर आता

पुढे दिलेल्या भावना सूचित करण्यासाठी प्रत्येकी तीन वेगवेगळ्या प्रतिमा शोधा आणि लिहा. १) निराशा २) आशा ३) उत्साह ४) प्रेम ५) राग ६) त्वेष ७) उत्कंठा

३) प्रतीके

प्रतीक म्हणजे चिन्ह किंवा खूण. चार सिंहांची मुद्रा हे आपले राष्ट्रीय चिन्ह आहे. किंवा पंख पसरलेला गरुड हे अमेरिकेचे चिन्ह आहे. निळे धर्मचक्र असलेला तिरंगी झेंडा हेसुद्धा एक प्रकारचे चिन्ह झाले. अशा चिन्हांमधून काही अर्थ सुचवलेला असतो. जसे आपण लहानपणी शिकतो की झेंड्यामधला केशरी रंग त्यागाचा, पांढरा रंग त्यागाचा, शांततेचा, तर हिरवा रंग समृद्धीचा. असा मोठा अर्थ ज्या चिन्हांमध्ये साठवलेला असतो त्याला **प्रतीक** असे म्हणतात. सूचक पद्धतीने वर्णन करण्यासाठी, मोठा आशय सूचित करण्यासाठी कवी आणि लेखक नवी नवी प्रतीके शोधून काढतात आणि ती साहित्यात वापरतात. उदा.- कविवर्य कुसुमाग्रजांच्या 'आगगाडी आणि जमीन' या कवितेमध्ये आगगाडी हे उन्मत्त सत्ताधाऱ्यांचे प्रतीक आहे तर जमीन हे दुबळ्या; परंतु चिडल्यावर बंड करून उठणाऱ्या सामान्य जनतेचे प्रतीक आहे. असाच आशय व्यक्त करण्यासाठी कुसुमाग्रजांनीच 'अहि-नकुल' या कवितेत साप आणि मुंगूस ही प्रतीके वापरली आहेत.

आता काही प्रतीके आणि त्यातून सूचित होणारा आशय आपण पाहू.

पांढरे कबूतर – शांतता
उडणारा पक्षी – स्वातंत्र्य, मुक्तता
पिंजऱ्यातील पक्षी – गुलामगिरी

आता याच पद्धतीने पुढे दिलेल्या प्रतीकांमधला आशय तुम्ही ओळखा.

१) वठलेले झाड २) पारंब्यांच्या साहाय्याने पसरलेले वडाचे झाड
३) वाहती नदी ४) समुद्र आणि होडी ५) आकाश ६) स्वर्ग

आता पुढील आशयासाठी तुम्ही कोणती प्रतीके सुचवाल ?

१) माणसांची निसर्गाबद्दलची कृतघ्नता २) बेसुमार गर्दीचे शहर
३) उज्ज्वल भविष्यकाळ ४) समृद्धी आणि भरभराट
५) आयुष्यात एकमेकांच्या पुढे जाण्यासाठी चालणारी जीवघेणी स्पर्धा

४) रूपक-कथा

'आगगाडी आणि जमीन' किंवा 'अहि-नकुल' या दोन्ही कवितांमध्ये संपूर्ण कविताभर प्रतीके म्हणून वापरलेल्या त्याच दोन गोष्टींसंबंधीचे वर्णन आहे. सत्ताधीश, जनता, जुलूम, बंड हे शब्द तेथे कुठेही आलेले नाहीत. तरी तो अर्थ मात्र कळतो.

अशा संपूर्ण कविताभर व्यापून राहिलेल्या कवितांना 'रूपक' असे म्हणतात. त्या दृष्टीने 'आगगाडी आणि जमीन' व 'अहि-नकुल' या 'रूपक-कविता' आहेत. असेच जेव्हा गोष्टींमध्ये असते तेव्हा त्या गोष्टीला 'रूपक-कथा' असे म्हणतात. वि.स.खांडेकर यांनी अशा पुष्कळ 'रूपक-कथा' लिहिलेल्या आहेत. उदा.-'दोन मेघ' या कथेत दिसायला काळा आणि कुरूप पण पाऊस पाडून लोकांच्या उपयोगी पडणारा एक ढग आणि एरवी पांढराशुभ्र तर संध्याकाळी रंगीबेरंगी होणारा आणि चपळपणे इकडून तिकडे जाणारा पण पाऊस पाडू न शकणारा दुसरा ढग यांची कथा आहे. या गोष्टीतून सूचित होणारा आशय तुमच्या लक्षात येतो आहे काय ? अलीकडे गाजलेली आणि जिचा मराठी अनुवाद तुम्ही बहुधा वाचलेला असेल अशी इंग्रजी कादंबरी 'जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगल' ही एका जिद्दी पक्ष्याच्या जीवनाचे वर्णन करते; पण प्रत्यक्षात तिच्यातून सुचवलेला आशय जास्त व्यापक आहे. काफ्का नावाच्या लेखकाच्या 'मेटॅमॉरफॉसिस' (रूपांतर) या कथेत एका तरुणाचे रूपांतर मोठ्या कीटकामध्ये होते आणि मग त्याच्या घरच्यांची आणि इतरांची त्याच्याशी असलेली वागणूक कशी बदलते त्याचे वर्णन केलेले आहे; पण तिच्यातून समाज अपंगांना किंवा व्यंग असणाऱ्यांना किती दुष्टपणे वागवतो ते सूचित केले आहे. या 'रूपक-कथा' मिळवून तुम्ही वाचा. आता पुढे दिलेल्या विषयांवर रूपक-कथा लिहा.

१) सध्याची शिक्षणपद्धती ही विद्यार्थ्यांना ठराविक चाकोरीतून जायला लावते. विद्यार्थ्यांमधल्या स्पर्धेला जास्त उत्तेजन देते आणि त्यांच्यातल्या कल्पनाशक्तीला दडपून टाकते. यासाठी कोणकोणती रूपके तुम्हांला सुचतात ?

उदा.- *१) वनस्पती-जंगलात मुक्तपणे वाढणाऱ्या आणि बागेमध्ये आखून दिलेल्या पद्धतीने वाढवलेल्या*

२) जपानी 'बोन्साय' म्हणजे वाढून मोठ्या होऊ शकणाऱ्या वृक्षांना मुद्दाम खुरटवून कुंडीमध्ये वाढवून हवा तसा आकार देण्याची 'कला'

३) मुंग्यांच्या वारुळातील शिक्षणपद्धती

४) मधमाश्यांच्या पोळ्यामधली शिक्षणपद्धती

५) माकडांच्या कळपामधली शिक्षणपद्धती इ.

प्रथम तुमचे रूपक निश्चित करा. नंतर कथारचनेच्या पूर्वी पाहिलेल्या पद्धतीनुसार पुढे जा. म्हणजे पात्रे ठरवा. प्रसंग ठरवा. प्रसंगाचा क्रम निश्चित करा. कथानकाचा आराखडा लिहून काढा. कल्पनाचित्रण करा आणि कथा लिहून काढा. तुमची ही कथा मित्रांना वाचून दाखवा. त्यांना जर ती मुळात पशुपक्षी इ.ची गोष्ट म्हणून आवडली व त्यानंतर तुमच्या मनातला सध्याच्या आपल्या शिक्षणपद्धतीबद्दलच्या नापसंतीचा आशय त्यांच्या लक्षात आला तर तुमची रूपक-कथा यशस्वी झाली.

भाग ३ : रचण्याकडून सुचण्याकडे

शब्दांशी दोस्ती कशी वाढवायची ते आपण पाहिले. त्यानंतर शब्दांच्या साहाय्याने गाणी, कविता, गोष्टी, संवाद, विनोद यांची रचना कशी करायची हेदेखील आपण पाहिले. चांगल्या शब्दांची आकर्षण रचना हा फक्त सांगाडा आहे; पण त्या सांगाड्यातला प्राण म्हणजे त्या रचनेतून सांगितला जाणारा अर्थ किंवा आशय.

आशय म्हणजे काय काय ? आशय म्हणजे अनुभवांचे वर्णन. या वर्णनाच्या केंद्रस्थानी असतो आपल्या लेखनाचा विषय. आतापर्यंत आपण दिलेल्या विषयावर वेगवेगळ्या पद्धतींनी कसे लिहायचे ते पाहिले. कवी-लेखकांपैकी फक्त काही जणांनाच दुसरे कोणीतरी विषय देत असते. नाटकातली किंवा चित्रपटातली गाणी किंवा एखाद्या विशिष्ट प्रसंगासाठी तयार केलेली गाणी किंवा संघटनेसाठी लिहिलेली देशभक्तिपर पद्ये, प्रार्थना, स्फूर्तिगीते, संचलन गीते इ. लिहिणारे गीतकार किंवा जाहिरातींचा मजकूर लिहिणारे 'कॉपी रायटर्स' किंवा दुसऱ्या लेखकाच्या कथेवरून चित्रपट किंवा दूरदर्शनसाठी संवाद लिहिणारे पटकथा लेखक, वगैरेंना असे दुसऱ्याने सुचविलेल्या विषयांवर लिहावे लागते. ते जर प्रतिभावंत असले तर त्यांचे हे लेखनसुद्धा दर्जेदार असते. ग.दि.माडगूळकर किंवा 'सैनिक गीते' आणि 'बिजली' लिहिणारे वसंत बापट ही या प्रकारची उत्तम उदाहरणे आहेत.

मग बाकीच्या कवी-लेखकांचे कसे असते ? त्यांना विषय जर दुसऱ्या कोणी सुचविला नाही तर कसा सुचतो ? या प्रश्नाचे उत्तर त्यांच्या अनुभव घेण्याच्या पद्धतीत आणि आपला अनुभव शब्दांमधून इतरांपर्यंत पोहोचविण्याच्या तीव्र इच्छेत सामावलेले आहे.

१. लिहिण्याची इच्छा

कवी-लेखक चारचौघांपेक्षा अधिक संवेदनशीलतेने अनुभव घेत असतात. (या संवेदनशीलतेचा जास्त विचार आपण लगेचच करणार आहोत.) त्यामुळे आपल्याला आलेला अनुभव अतिशय वेगळा आहे असे त्यांना वाटते. तो अनुभव इतरांना सांगितलाच पाहिजे असे त्यांना वाटते. किंबहुना सांगता आले नाही तर ते अस्वस्थ होतात. दूरच्या काकाच्या गावी जाऊन तुम्ही जे जे नवीन पाहिले असेल किंवा ऐकले असेल ते परत आल्यावर आपल्या मित्रमैत्रिणींना सांगण्यासाठी तुम्ही जसे उतावळे झालेले असता तसेच हे आहे. तुमच्या वर्गातली चार-पाच मुले-मुली पहिल्यांदाच मुंबईला जाऊन परत गावी आल्यावर आपापले मुंबईतले अनुभव सांगतात. त्या वेळी प्रत्येकाच्या सांगण्यामध्ये वेगळेपणा असतो. कधी त्याने काय पाहिले त्यामुळे आलेला

असतो. म्हणजे कोणी राणीच्या बागेबद्दल बोलतो, तर कोणी लोकलमधल्या गर्दीबद्दल. तसेच लोकलमधल्या गर्दीबद्दलच दोघेजण बोलले, तरी एकजण चढताना उतरताना आपली कशी फजिती झाली हे सांगून तुम्हांला हसवतो; तर दुसरा तिथल्या गर्दीत एका माणसाचे पाकीट मारले गेल्यामुळे तो कसा हमसाहमशी रडायला लागला याचे प्रथम वर्णन करतो. ते ऐकून तुम्हांलाही वाईट वाटते आणि मग लोकांनी खिसेकापूला पकडून कसे चोपले याचे वर्णन तो अशा चटकदारपणे करतो की तुम्हांला सारखे पुढे काय झाले असेल असे वाटत राहते. आणखी एखादा मुलगा किंवा मुलगी मुंबईतला समुद्र पाहून, तिथली संध्याकाळ पाहून तिला कशी हुरहूर वाटली हे एखाद्याच मैत्रिणीला एकीकडे घेऊन हळूच सांगते. या तिघांनी जर आपापली वर्णने लिहून काढली, तर पहिल्या मुलाची विनोदी गोष्ट होईल, दुसऱ्या मुलाची रहस्यकथा होईल, तर तिसऱ्या मुलाची किंवा मुलीची कविता होईल.

तुम्ही तुमचे अनुभव वर्गातल्या किंवा दलातल्या मित्र-मैत्रिणींनी ते वाचावेत म्हणून लिहून काढाल. तसे मोठे लेखक किंवा कवी कुणासाठी लिहीत असतात ? त्यांच्या डोळ्यांपुढे कोणते वाचक असतात ? बहुतेक नाटककारांच्या बाबतीत त्यांच्या अवतीभवती असणारा समाजच त्यांची नाटके पाहणार असतो. तसेच दूरदर्शनवरच्या पटकथालेखकांचेही असते. कथालेखक किंवा कादंबरीकार यांच्या डोळ्यांपुढे ती भाषा वाचू शकणाऱ्या कमी जास्त समज असलेल्या आणि वाचायची कमी-जास्त चिकाटी असलेल्या व्यक्ती असतात; कारण गोष्टी किंवा कादंबऱ्या माणूस एकएकट्याने वाचत असतो; पण या वाचक व्यक्ती सुरुवातीच्या काळात तरी लेखकाला अगदी नक्कीच माहीत असत नाहीत. त्याला केवळ अंदाज बांधावा लागतो. कवींच्या बाबतीत मात्र कोणी वाचक असतील की नाही याचीही खात्री नसते. भवभूती नावाच्या संस्कृत कवीने म्हटले आहे,"माझे काव्य समजून घेणारा माझ्यासारख्याच स्वभावाचा वाचक आहे की नाही? मला माहीत नाही; पण मला आशा वाटते की आज तो नसला तरी कधी ना कधी तरी लाभेल; कारण काळ अनंत आहे. कुठेना कुठे तरी तो असेल; कारण पृथ्वी विशाल आहे !" असे असतानासुद्धा कवीला का लिहावेसे वाटते ? एखाद्या अनुभवामुळे आलेली अस्वस्थता लिहून काढली, शब्दांमध्ये व्यक्त केली की त्याला बरे वाटते. काहीवेळा शब्द आणि अर्थ यांच्या वेगवेगळ्या शक्यता पडताळून पाहण्यामध्ये त्याला गंमत वाटते. पुढे पुढे, मुद्दाम कसलाही हेतू मनात नसतानासुद्धा वेळी अवेळी त्याला कवितांच्या ओळी किंवा प्रतिमा सुचायला लागतात. त्या तो लिहून काढतो आणि त्याचीच कविता होते. तिची मुद्दाम रचना अशी केलेली नसते.

हे झाले लेखनाच्या इच्छेबद्दल. तुमच्याही मनात अशी इच्छा निर्माण झाली तर तुम्हांला काय लिहायचे ते सुचायला लागेल.

२. संवेदनशीलता

आता अनुभव घेण्याच्या पद्धतीचा विचार करू. कवी-लेखक संवेदनशीलतेने अनुभव घेतात म्हणजे काय ? त्याच्याही आधी मुळात अनुभव घेणे म्हणजे काय? अनुभव येणे किंवा अनुभव घेणे म्हणजे डोळ्यांना काही दिसणे, कानांना ऐकू येणे,नाकाने हुंगणे, जिभेने चाखणे, त्वचेने जाणणे आणि याच वेळी मनामध्ये काही भावना, कल्पना किंवा विचार उमटणे. या अनुभवांच्या बाबतीतली संवेदनशीलता म्हणजे काय? तर इतरांना न जाणवणारे अनुभव जाणवणे. संवेदनशील माणसाला इतरांच्या लक्षात न येणारे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध जाणवतात. इतरांच्या मनात न उमटणाऱ्या भावना त्याच्या मनात उमटतात. इतरांना न सुचलेल्या कल्पना किंवा विचार त्याच्या मनात उमटतात. त्यामुळेच त्याचे लिहिणे इतरांना नवीन वाटते.'आपल्याला हे दिसलेच नव्हते !' असे वाचकांना वाटत राहते आणि त्यामुळे वाचकांना ते लिहिणे वाचत राहावेसे वाटते.

संवेदनशीलतेचे तीन प्रकार आहेत. पहिली ज्ञानेंद्रियांच्या वापरातली, दुसरी भावनांच्या बाबतीतली आणि तिसरी इतर माणसांबद्दलची. या तिन्ही प्रकारची संवेदनशीलता आपण प्रयत्न करून जास्त तल्लख बनवू शकतो.

१) ज्ञानेंद्रियांच्या वापरातली संवेदनशीलता

ही संवेदनशीलता निरीक्षण करून तुम्ही वाढवू शकता. त्यासाठी पुढील प्रयोग करून पाहा.

निसर्गातील दृश्यांचे निरीक्षण. उदा.- एखाद्या दिवशी अगदी पहाटे उठा आणि घराबाहेर अंगणात किंवा रस्त्यावर जाऊन आकाश, शेते, झाडे, पक्षी, पशू, रस्ते इ. चे निवांत मनाने निरीक्षण करा. आकार, रंग, हालचाली, आवाज, वास अशा सगळ्यांची नोंद घ्या. नेहमीपेक्षा वेगळे काय काय आढळते आहे याकडे लक्ष द्या. ही सगळी निरीक्षणे वहीत टिपून ठेवा. नंतर हेच ठिकाण भर दुपारी, संध्याकाळी, चांदण्या रात्री, काळोख्या रात्री कसे दिसते ते पाहा आणि फरक लिहून ठेवा.

असे निरीक्षण करत असताना, नुसत्या कॅमेऱ्याने, टेपरेकॉर्डरने किंवा तापमापकाने नोंद करावी अशा पद्धतीने शक्य तिथे आकडेवारी, मोजमापे वापरून निरीक्षण करणे हा झाला वैज्ञानिक मार्ग. सगळ्या अनुभवामध्ये रंगून जाऊन त्यांचे आपल्या मनावर ठसे उमटू देणे ही झाली कलावंताची वाट.

एकेका ज्ञानेंद्रियाची संवेदनशीलता वाढवणेसुद्धा शक्य असते.

फेनमन नावाच्या नोबेल पारितोषिक विजेत्या भौतिकशास्त्रज्ञाने आपली वास घेण्याची क्षमता कशी वाढवली ते आपल्या आत्मचरित्रपर पुस्तकात लिहून ठेवले

आहे. एका खोलीत तीन माणसे जाणार. त्यावेळी फेनमन खोलीच्या बाहेर लांब उभा असणार. आत गेलेल्या तिघांपैकी कोणत्याही एका माणसाने कपाटातल्या पुस्तकांपैकी कोणतेही एक पुस्तक बाहेर काढून पाच मिनिटे हाताळायचे आणि परत जागेवर ठेवून द्यायचे. मग फेनमनला आत बोलवायचे. फेनमन कपाट हुंगून त्यातले हाताळलेले पुस्तक नेमके बाहेर काढायचा आणि तिन्ही माणसांचे हात हुंगून पुस्तक हाताळणाराही बरोबर हुडकून काढायचा. हे कुणालाही प्रयत्नाने जमू शकेल असे त्याचे म्हणणे होते.

हे कसे करता येईल ? स्वयंपाकघरात जाऊन डोळे मिटून बसा आणि कोणकोणते वास जाणवत आहेत त्याची नोंद घ्या. तसेच बागेत, रस्त्यात किंवा शेतात जाऊन करा. आतापर्यंत न जाणवलेले कितीतरी वास तुम्हांला जाणवतील. या पुढच्या टप्प्यात भावाबहिणीची किंवा मित्राची मदत घ्या. तुम्ही डोळे मिटलेले असताना वेगवेगळ्या वस्तू त्याला तुमच्याजवळ आणायला सांगा. नुसत्या वासाने यातल्या किती वस्तू तुम्ही ओळखू शकता ? हाच प्रयोग ओळीने काही दिवस केला तर हे प्रमाण वाढते का? करून बघा.

असाच प्रयोग वेगवेगळ्या पदार्थांच्या चवी आणि स्पर्श तसेच वेगवेगळे आवाज यांच्याही बाबतीत करून बघा. डोळ्यांचा वापर तर आपण पुष्कळच करीत असतो; पण याही बाबतीत प्रकाशाच्या आणि रंगांच्या वेगवेगळ्या छटा, झाडांचे आकार, पाण्यातील प्रतिबिंबे, उन्हाचे कवडसे, इ. गोष्टींचे निरीक्षण करा.

नेहमीपेक्षा वेगळी वाटणारी निरीक्षणे लिहून ठेवा.

आता ज्ञानेंद्रियांच्या जास्तीत जास्त संवेदनांचे म्हणजे आकार, रंग, रूप, हालचाली, आवाज, वास, स्पर्श आणि चवी यांचे तपशीलवार वर्णन करीत पुढे दिलेल्या विषयांवर २५-३० ओळी लिहा.

१) मी मनसोक्त जेवलो ! २) मला निसर्ग, जंगल वगैरे खूप आवडतं.
३) मे महिना-वर्षातला सगळ्यात आनंदाचा ! ४) ती विचित्रच पोशाख करते !
५) मारामारीनंतर विराजचा अवतार अगदी बघण्यासारखा झाला होता.

२) भावनांबद्दलची संवेदनशीलता

अनुभवाची दुसरी बाजू आहे मनाला जाणवणारी. नाही तरी मनाला सहावे ज्ञानेंद्रिय म्हटले जातेच.

मनाला काय जाणवते ? भावना आणि इच्छा जाणवतात. भावना म्हणजे जणू कवितेचा प्राणच. लिहिणाऱ्याच्या कसल्याच भावना गुंतलेल्या नसल्या तर नुसत्या शब्द-स्पर्श-रूप-रस-गंध संवेदनांचे वर्णन, मग ते कितीही कल्पक किंवा रंजक पद्धतीने

केलेले असो, ते निर्जीव वाटते. 'अचानक उचंबळून आलेल्या भावनांचे' प्रसंग घडून गेल्यानंतर शांतपणाने केलेले संकलन म्हणजेच ' काव्य ' असे म्हटले जाते.

तुम्हांला कोणकोणत्या भावना जाणवतात ? आनंद, दु:ख, राग, चिंता, द्वेष, भीती, आदर, प्रेम... सगळ्यांनाच कधी ना कधी तरी अशा भावना जाणवतात. सर्वसाधारण माणूस मनात भावना आली की काहीतरी कृती करून मोकळा होतो. तो आनंदाने हसतो, दु:खाने रडतो, रागाने धावून जातो, भीतीने पळून जातो; पण ज्या वेळी अशी कृती करणे शक्य नसते, त्या वेळी त्याचा कोंडमारा होतो. ही कोंडी फोडण्याचे काम शब्द करतात. कल्पनाशक्तीची जोड असली की, भावना व्यक्त करणारे हे शब्द प्रभावी बनतात. ऐकणाऱ्याच्या किंवा वाचणाऱ्याच्या मनात तशीच भावना ते उत्पन्न करू शकतात. अशा शब्दांचेच वाङ्मय बनते.

तुम्हांला आलेले वेगवेगळ्या भावनांचे अनुभव आठवून पाहा. खूप आनंद झाला; पण ओरडता किंवा नाचता येत नव्हते. अशा वेळी मनात काय काय येऊन गेले ? खूप वाईट वाटले होते; पण रडता येत नव्हते, अशा वेळी तुम्हांला काय काय वाटत होते ? खूप राग आला होता; पण भांडता येत नव्हते किंवा मारामारी करता येत नव्हती, अशा वेळी मनात काय काय वाटले ?

आता मनात येऊन गेलेले हे सगळे लिहून काढा. आनंदाच्या प्रसंगाबद्दल लिहीत असताना 'आनंद' हा शब्द न वापरता लिहा. तसेच दु:खाच्या प्रसंगाबद्दल, रागाच्या प्रसंगाबद्दल किंवा भीतीच्या प्रसंगाबद्दल ! आता लिहून झालेली वाक्ये वाचा. त्या त्या भावनेचे नाव वापरलेले नसले तरी ती ती भावना कोणती ते ओळखू येते आहे ना?

या वर्णनामध्ये त्या त्या भावनेमुळे तुमच्या शरीराची काय अवस्था किंवा हालचाल झाली ते असू शकेल. उदा.-हृदय जोरात धडधडू लागले, डोळ्यांच्या कडा पाणावल्या, नाकपुड्या थरथरू लागल्या, मुठी आवळल्या गेल्या, अंगाचा थरकाप झाला इ. त्या वेळी तुमच्या मनाची काय अवस्था झाली याचेही वर्णन असू शकेल. उदा. गलबलून आले, अस्वस्थ वाटले, उलघाल झाली इ. कदाचित मनात आलेल्या कल्पनाही त्यात असू शकतील. उदा.- भर दिवसा अंधारून आल्यासारखे वाटले, सगळ्या वस्तूंचे रंग जास्त तजेलदार झाल्यासारखे वाटले. लख्‌कन वीज चमकून गेल्यासारखे वाटले. इ. ती भावना व्यक्त करण्यासाठी अमुकतमुक करावेसे वाटले असाही भाग त्या वर्णनात असू शकेल. उदा.- उडतउडत जाऊन कोणाला तरी ती वार्ता सांगावीशी वाटली, धरणीच्या पोटात गडप व्हावेसे वाटले, चाबकाने फोडून काढावेसे वाटले, ढग होऊन बरसात करावीशी वाटली. पृथ्वीच्या गोलाचा बास्केटबॉल करावासा वाटला, इ. आता दिलेली उदाहरणे ढोबळ आहेत. तुम्ही जेव्हा एखाद्या विशिष्ट प्रसंगाचे वर्णन कराल तेव्हा त्या प्रसंगातील इतर माणसे, तो प्रसंग घडला ती जागा, वेळ व भोवतालची

परिस्थिती यांचे तपशील अर्थातच त्या वर्णनामध्ये येतील.

आता ज्ञानेंद्रियांच्या संवेदना आणि भावनांच्या वेगवेगळ्या छटा या दोन्हींचे तपशीलवार वर्णन येईल अशा रीतीने पुढे दिलेल्या विषयांवर प्रत्येकी २५-३० ओळी लिहा.

१) तुमच्या लहानपणची जुन्यात जुनी आठवण.
२) तुमचे लहानपणचे खेळणे किंवा बाहुली.
३) लक्षात राहिलेला एखादा सुखद प्रसंग.
४) एखादा उत्कट प्रसंग जेथे घडला ते ठिकाण.
५) लहानपणच्या महत्त्वाच्या घटनेतली तीन दृश्ये.
६) आत्तापर्यंतच्या आयुष्यातली सर्वांत महत्त्वाची भावनात्मक घटना.
७) शाळेकडून घराकडे जायचा रस्ता.
८) मैदानावरचा एखादा खेळाचा सामना प्रत्यक्ष चालू असताना.
९) सामन्याच्या सर्वांत चुरशीच्या एका मिनिटात घडलेल्या बारीक-सारीक घटना
१०) रुग्णालयातला अनुभव-स्वत:च्या आजारपणामुळे आलेला किंवा दुसऱ्या आजारी माणसाला भेटायला तुम्ही गेलेला असतानाचा.

३) माणसांबद्दलची संवेदनशीलता

भावनांबद्दलची संवेदनशीलता म्हणजे काय आणि ती कशी वाढवायची हे आपण पाहिले. शब्दांवर हुकमत आली, तल्लख ज्ञानेंद्रियांनी सूक्ष्म निरीक्षण करता आले आणि भावनांच्या सूक्ष्म छटासुद्धा जाणवू लागल्या की बऱ्यापैकी लेखन जमायला हरकत नाही; पण हे सगळे लेखन 'आत्मपर' म्हणजे फक्त स्वत:ला दिसलेल्या गोष्टी, भेटलेली माणसे आणि त्यामुळे आपल्या मनात आलेल्या भावना एवढ्याबद्दलचेच लेखन होईल. पुष्कळशा कविता आणि लघुनिबंध हे या प्रकारचे असतात.

पण कथा-कादंबऱ्यांमध्ये आणि काही कवितांमध्ये स्वत: सोडून इतर कितीतरी माणसांच्या मनात आलेल्या भावना, विचार, इतकेच काय पण त्यांना पडलेली स्वप्ने, यांचेसुद्धा वर्णन असते. काही काही वेळा तर फुले, झाडे, नदी, समुद्र, ग्रह, तारे वगैरे निसर्गातल्या गोष्टींच्या भावनांचेदेखील वर्णन वाचायला मिळते. 'फूल के नि:श्वास को भी अनसुनी करता नहीं वह' असे एका हिंदी कवीबद्दल म्हटलेले आहे ! कवीला किंवा लेखकाला हे असे दुसऱ्या माणसांच्या मनातले किंवा इतर सजीव-निर्जीवांच्याही मनातले त्यांनी न सांगताच कसे कळते ?

हे कळण्याची शक्ती म्हणजेच संवेदनशीलतेचे आणखी एक रूप ! ही संवेदनशीलता ज्याच्यामुळे साधते त्याला म्हणतात 'परकाया-प्रवेश'. म्हणजेच दुसऱ्याच्या शरीरात (खरे म्हणजे मनात) कल्पनेने शिरकाव करणे. मीच जर त्याच्या जागी आत्ता असतो तर

मला काय वाटले असते, असा विचार केला की परकाया-प्रवेश जमू लागतो; पण असा विचार करणे सोपे मात्र नसते; कारण आपल्याला नेहमी आपल्याच दृष्टिकोनातून जगाकडे बघण्याची आणि तिथून दिसेल तेवढेच खरे मानण्याची पक्की सवय लागलेली असते. आपल्याला घरी आई रागावली किंवा शाळेत बाई रागावल्या तर आपल्याला झालेले दु:ख आणि आलेला राग एवढाच फक्त आपल्याला जाणवत असतो. आई किंवा बाई यांच्या मनातल्या भावनांची किंवा विचारांची आपल्याला जाणीवच होऊ शकत नाही. असा अनुभव तुम्ही सर्वांनीच घेतलेला असेल. ही 'आत्मकेंद्री' दृष्टी बाजूला ठेवता आली, तर आपल्याला दुसऱ्यांची सुखदु:खे जाणवू लागतात. मग ती सुखदु:खे जणू आपलीच आहेत अशा प्रकारे आपण ती आपल्या शब्दांत व्यक्त करू शकतो. 'शेतकऱ्याचा आसूड', 'उपेक्षितांचे अंतरंग', 'कळ्यांचे नि:श्वास','बळी' अशी पुस्तके त्यातूनच निर्माण होतात. 'चाबूक उडो कोठेही ! वळ पाठीवर अमुच्या !' अशी ही सहवेदना असते.

पण पुष्कळदा लेखक-कवींच्या अशा संवेदनशीलतेलासुद्धा 'परदु:ख शीतल' मानणारी आपपरभावाची मर्यादा पडलेली दिसते ; म्हणूनच ज्यांना वाऱ्याच्या आणि ताऱ्यांच्या भावनासुद्धा जाणवत होत्या अशा लेखकांचे लक्षसुद्धा स्त्रिया, दलित, वंचित, पतित, पंगू अशांच्या सुखदु:खाकडे जाऊ शकले नाही. ती सुखदु:खे त्या त्या वर्गातल्या व्यक्तींनाच लिहून दाखवावी लागली. कवयित्री हिरा बनसोडे यांची 'सखी' ही 'छात्र प्रबोधन' मध्येच वाचलेली कविता हेच दाखवीत नाही का ?

दुसऱ्या माणसांच्या भावनांबद्दलची ही संवेदनशीलता सच्ची मात्र असायलाच हवी. त्यात नाटकीपणा किंवा ढोंग नसावे, सहानुभूतीचे उसने कढ नसावेत. खोटा ऊरबडवेपणा नसावा. म्हणजे जे लेखन होईल ते चांगलेच होईल.

ही संवेदनशीलता कशी वाढवता येईल ?

१. काही गोष्टींचा स्वत: प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. उदा.- एक दिवस खराखुरा उपास करायचा, काहीही खायचे नाही, दिवसभर आपल्या मनात काय विचार देतात याची फक्त मनातल्या मनात नोंद घ्यायची. मग दिवसाच्या शेवटी ध्यानात येईल की आपल्या देशातल्या ज्या गरीब लोकांना वेळच्या वेळी जेवायला मिळत नाही त्यांच्या मनात काय काय येत असेल !

डोळ्यांवर रुमालाची पट्टी बांधून १५ मिनिटे घरात हिंडून पाहा म्हणजे अंधांना कोणकोणत्या अडचणी येत असतील याची थोडीशी चुणूक कळेल.

२. काही वेळेला आपल्याला आलेल्या अनुभवाचा मनातल्या मनात गुणाकार करून आपल्याला दुसऱ्यांच्या तशाच तीव्र अनुभवाची कल्पना येते. उदा.- प्रत्येकालाच कधी ना कधी तरी चटका बसलेला असतो किंवा भाजलेले-पोळलेले असते. या

अनुभवाला हजाराने गुणले तर तुम्हांला सक्तीने सती जायला लावलेल्या रूपकुंवरच्या वेदना जाणवतात का ?

कधी तरी कुणी तरी तुमचा अपमान केला असेल, हिडीसफिडीस केले असेल, बसमधून उतरवून दिले असेल किंवा वर्गातून हाकलून दिले असेल. तुमच्या याच अनुभवाला हजाराने गुणले तर तुम्हांला दलितांच्या अपमानाची किंवा कुष्ठरुग्णांना मिळत असलेल्या वागणुकीची जाणीव होऊ शकेल का ?

३. सगळ्याच गोष्टींचा असा साक्षात अनुभव घेता येणे व्यावहारिकदृष्ट्या शक्य नाही. अशा वेळी प्रत्यक्ष जाऊन बघणे, निरीक्षण करणे आणि त्या जागी आपणच आहोत अशी कल्पना करणे हे शक्य आहे. तुम्ही अनाथाश्रम, रिमांड होम, झोपडपट्टी, गावाबाहेरची भटक्या लोकांची पाले अशा ठिकाणी जाऊन तुमच्या एवढ्याच मुलामुलींचे निरीक्षण करा. त्यांच्या जागी तुम्ही स्वत: असता तर तुमच्या मनात काय काय आले असते ? वर सुचवल्याप्रमाणे प्रत्यक्ष अनुभव, प्रत्यक्ष अनुभवाचा मनोमन गुणाकार आणि जागेवर जाऊन केलेले निरीक्षण अधिक कल्पनाशक्ती यांच्या साहाय्याने काही प्रयोग करून पाहा आणि त्या त्या वेळी तुमच्या मनात आलेल्या भावना गद्यात किंवा कवितेत लिहून ठेवा.

असे वेगवेगळे प्रयोग केल्यानंतर तुम्ही अधिक संवेदनशीलतेने रोजच्या आयुष्यातले अनुभव घेऊ लागाल. जेव्हा एखाद्या अनुभवाने तुम्ही अस्वस्थ व्हाल तेव्हा तो अनुभव शब्दांमधून इतरांपर्यंत पोचवावा असे तुम्हांला उत्कटतेने वाटू लागेल. मग तुम्हांला शब्द, प्रतिमा, कल्पना, पात्रे, प्रसंग हे सारे आपोआप सुचू लागेल. त्यांची गुंफण किंवा रचना कशी करायची याचा सराव तुम्ही आधीच केलेला असल्यामुळे ती रचनाही सफाईदार होईल. तुमच्या मित्र-मैत्रिणी, आई-वडील, नातेवाईक, शिक्षक आणि अनोळखी वाचकसुद्धा तुमचे लेखन वाचून म्हणतील 'किती छान लिहिलंय!'

तुमचा प्रतिभेच्या प्रांतातला प्रवास सुरू झालेला असेल !

*** *** ***

पुढच्या प्रवासासाठी शुभेच्छा

प्रतिभेच्या विश्वामधल्या 'ललित लेखन' या प्रांताच्या प्रवासाला तुम्ही प्रारंभ केलेला आहे. तुमचा हा प्रवास म्हणजे केवळ सुट्टीतली एक छोटीशी सहल ठरू नये; कारण हा प्रांत अद्भुतरम्य आहे. अनंत आहे. या प्रवासातून तुम्ही स्वत:ला शोधत आणि घडवत जाल. त्यातच निरंतरचा विकास असेल.

हा प्रवास शेवटी ज्याचा त्यानेच करायचा असतो. मी फक्त लांबून वाट दाखवणारा वाटाड्या होतो. माझे काम संपत आले. जाता जाता या प्रवासातल्या काही अडचणी आणि धोके यांच्याबद्दल चार सूचना.

१) कंटाळा : कोणतीही वेगळी गोष्ट करण्याच्या हमखास आड येणारा जुन्या ओळखीचा शत्रू ! तो येऊ नये म्हणून रामदास स्वामींनी पूर्वीच सुचवून ठेवले आहे- 'दिसामाजि काही तरी ते लिहावे !' एखादी छान वही किंवा दैनंदिनी (डायरी) घ्या. ही केवळ तुमची खासगी लेखनवही. या वहीत रोज काहीतरी लिहा. शक्य झाल्यास ठराविक जागी आणि ठराविक वेळी लिहायला बसा. कोणाच्या बाबतीत ही जागा म्हणजे टेबल-खुर्ची असेल, कुणाच्या बाबतीत ती बांधावरच्या झाडाखाली असेल, तर कुणाच्या बाबतीत ती नगरपालिकेच्या दिव्याखालीसुद्धा असेल !

काय लिहायचे ? कधी या पुस्तकात सुचवलेल्या वेगवेगळ्या विषयातला एक विषय घ्या. कधी तुमच्या मनातला एक विषय घ्या. अगदी काहीही लिहा; पण लिहा. काहीच सुचत नसेल आणि समोरचा कोरा कागद आपल्याला खिजवतो आहे असे वाटले, तर समोर दिसत असलेल्या दृश्याचे वर्णन लिहा किंवा प्रसंगी मनात तरळून जाणारे असंबद्ध विचारसुद्धा लिहा. हे सारे भरभर लिहा, म्हणजे त्या वेगामुळे कंटाळा जाऊन उत्साह येईल.

हे सुरुवाती-सुरुवातीला कदाचित जास्त वेळा घडेल. नंतरही क्वचित क्वचित घडेल; पण उलट एकदा सुचायला लागले की केव्हाही आणि कोणत्याही जागी सुचत राहते असा मोठ्या लेखकांचा अनुभव आहे; तो तुम्हांलाही येईल. अशा अचानक तरळून जाणाऱ्या चमकदार कल्पना लगेच लिहून ठेवल्या नाहीत तर विसरून जातात, असाही सगळ्यांचा अनुभव आहे; म्हणून काही ना काही लेखनसाहित्य नेहमी हाताशी असू द्या व सुचलेली कल्पना लगेच दिनांकासह टिपून ठेवण्याची सवय लावून घ्या.

२) अल्पसंतुष्टपणा : म्हणजे थोडक्यात समाधान मानण्याची वृत्ती. काही ना काही लिहिणे चालू आहे एवढ्यावरच खूष राहू नका. लिहिण्याचा दर्जा

वाढवण्याकडेही लक्ष द्या. मात्र या बाबतीत दुसऱ्या कोणा मित्रमैत्रिणीशी स्पर्धा करू नका; कारण त्यातून स्वत:च्या लेखनाच्या गुणवत्तेबाबत सतत धास्ती वाटत राहणे आणि आपल्यापेक्षा चांगले लिहिणाऱ्याबद्दल मत्सर वाटू लागणे असे तोटे होतात. स्पर्धा करायची ती स्वत:शीच ! म्हणजे गेल्या महिन्यातल्या लेखनापेक्षा या महिन्यातले लेखन सुधारले आहे ना ? हे बघणे आणि तसा प्रयत्न करणे. एकदा लिहून झालेली कविता किंवा गोष्ट पुन:पुन्हा वाचून तिच्यात सुधारणा करीत राहा. लेखनातला चांगला-वाईटपणा कसा ठरवायचा हे त्या त्या प्रकरणात सांगितलेले आहेच. फापटपसारा किंवा पाल्हाळ नसावे. शब्द नेमके, सुंदर आणि तरीही वाचकांना कळतील असे असावे. विषयांमध्ये विविधता असावी. कल्पना, प्रतिमा, कथानक यांमध्ये नावीन्य असावे. याशिवाय तुमचे लेखन तुम्ही एखाद्या शिक्षकांकडून किंवा साहित्य रसिकाकडून तपासूनही घेऊ शकाल.

३) टीकाकार : म्हणजे तुमच्या लेखनावर अभिप्राय व्यक्त करणारी कोणतीही व्यक्ती, पालक, शिक्षक, मित्रमैत्रिणी वगैरे. या सगळ्या व्यक्ती सहृदय असतातच असे नाही. तुम्ही ललितलेखन करणे म्हणजे परीक्षेतल्या गुणांसाठी थेट उपयोगी न पडणारा नस्ता उपद्‌व्याप करणे आहे असे त्यांच्यातल्या काहींना वाटू शकते; म्हणून तसे टोमणेदेखील मारले जातील. काही वेळा कविता वगैरे लिहिणाऱ्याची टिंगलटवाळी करण्याची 'फॅशन' काही मित्रमैत्रिणींच्या कंपूमध्ये असते ! त्यातूनही कोणी लेखन वाचायची तसदी घेतलीच तर ती व्यक्ती तुमच्या लेखनात चांगले काय आहे हे न सांगता फक्त चुकाच दाखवून देण्याचा सपाटा लावते. अशा कुऱ्हाड हाती घेतलेल्या सगळ्या टीकाकारांपासून आपल्या प्रतिभेच्या कोवळ्या रोपट्याचे संरक्षण आपणच करायला हवे.

पण त्यामुळे आपले लेखन कुणालाच दाखवायचे नाही असेही करून चालणार नाही; कारण आपल्या मनातल्या भाव-भावना आणि कल्पना दुसऱ्यांना सांगून मिळणाऱ्या आनंदासाठीच तर आपण लिहीत असतो !

म्हणून सुरुवातीच्या काळात आपल्या पहिल्या वाचकाची निवड काळजीपूर्वक करा. ज्या व्यक्तीला आपल्याबद्दल आपुलकी वाटते आणि आपल्या लेखनाबद्दल कौतुक वाटते अशी ती व्यक्ती असावी. त्या व्यक्तीच्या प्रोत्साहनाने हुरूप वाढल्यानंतर हळूहळू लेखन इतरांना दाखवायला सुरुवात करा. एकदम सरसकट सगळ्यांना दाखवू नका. नाहीतर या वाचकातले पुष्कळ जण न मागताच अभिप्राय देतील. त्यांनी काही दोष दाखवले तरी नाउमेद होऊ नका. त्यांच्या म्हणण्यावर विचार करा आणि तुम्हांला जी सूचना पटेल तीच स्वीकारा; कारण साहित्यामध्ये विज्ञानाप्रमाणे अमक्याचे मत म्हणजे ते खरेच असणार असे असत नाही.

आणखी आत्मविश्वास वाढल्यावर इतरांनाही आपले लेखन दाखवा आणि 'कसे वाटते आहे ? तुमच्या काही सूचना आहेत का ?' असे स्वत:हून विचारा. पटेल ते घ्या, न पटलेले सोडून द्या.

याच्याही पुढच्या टप्प्यात टीकाकारांना मुळीच न जुमानणारे, किंबहुना 'त्यांना काही कळत नाही' असे म्हणणारे कवी-लेखकही असतात.

४) अनुकरणाचा मोह : होतकरू लेखकाने जसे वेगवेगळे अनुभव घ्यायला हवेत. तसेच खूप वाचनसुद्धा करायला हवे; म्हणून चांगल्या आणि वेगवेगळ्या प्रकारच्या कवींची आणि लेखकांची पुस्तके मिळवून वाचत राहा. त्यातून आपली शब्दसंपत्ती वाढते, प्रत्यक्ष घेता न येणारा अनुभव अप्रत्यक्षपणे कळतो आणि आपल्याला कल्पना सुचायला मदत होते.

मात्र यातूनच एक धोका संभवतो आणि तो म्हणजे अंधानुकरणाचा. म्हणजे आवडलेल्या लेखकाच्या लेखनाची आंधळेपणाने नक्कल करण्याचा. तीही ज्यांना साधत नाही त्यांना मग 'वाङ्मयचौर्य' करण्याचा, म्हणजे दुसऱ्या लेखकांच्या कविता, गोष्टी वगैरे चोरून जशाच्या तशा किंवा किरकोळ नावे इत्यादी बदलून आपल्या नावाने छापवून आणण्याचा मोह होतो. तो तर गुन्हाच होय; म्हणून जे वाचन करायचे ते डोळसपणे करा म्हणजे प्रसिद्ध लेखकांच्या लेखनाचे चिकित्सक रसग्रहण करा. त्यांच्या लेखनपद्धतीचा, तंत्रांचा अभ्यास करा. एखादे वर्णन त्यांनी कसे केले आहे ? ते करताना कोणते मुद्दे घेतले आहेत आणि कोणते वगळले आहेत ? शब्द कोणते वापरले आहेत? कथानकाची गुंफण कशी केली आहे ? त्यामुळे वाचकावर काय परिणाम होतो आहे? या गोष्टीचा शेवट वेगळ्या प्रकारे केला तर काय होईल? ती गोष्ट अमुक एका पात्राच्या तोंडून सांगितली तर काय होईल ? एखादे पात्र किंवा प्रसंग यांची नवीन भर घातली तर काय होईल ? एखादे पात्र किंवा प्रसंग वगळला तर काय होईल ? असा विचार करा. लेखकाच्या मनात शिरून अशा तऱ्हेने त्याची निर्मिती पूर्णपणे समजून घेणे हेसुद्धा प्रतिभेचेच काम आहे. त्या प्रतिभेला संस्कृतभाषेत 'भावयित्री प्रतिभा' असे म्हटलेले आहे.

असा अभ्यास केल्यानंतर त्या प्रसिद्ध लेखकाच्या एखाद्या युक्तीचा सराव करण्यासाठी तुम्ही तसलेच काही लिहून पाहिले तरी हरकत नाही; पण ते फक्त सरावापुरतेच असावे. शेवटी तुमचे लेखन हे फक्त तुम्हांला सुचलेलेच असले पाहिजे. तरच ते नवीन ठरेल; कारण कोणत्याही दोन व्यक्ती एकसारख्या असत नाहीत. या तुमच्या वेगळेपणातच तुम्हांला सुचलेल्या लेखनाचे ताजेपण दडलेले असेल.

५) अव्यवस्थितपणा : तुमचे पक्के लेखन नीट लिहून ठेवा, सांभाळून ठेवा; कारण ती तुमची खूप महत्त्वाची संपत्ती आहे. ती हरवून चालणार नाही. अनेक वर्षांच्या

साठलेल्या लेखनातून आपला एक लेखक म्हणून कसकसा विकास होत गेला हे मोठेपणी पाहताना तुम्हांला खूप मजा वाटेल आणि स्वत:बद्दलचे ज्ञानही वाढेल.

आत्मविश्वास वाढल्यानंतर आपले लेखन प्रसिद्धीसाठी पाठवायला हळूहळू सुरुवात करा. वर्गाचे हस्तलिखित, शाळेचे नियतकालिक, मुलांसाठीची मासिके, वर्तमानपत्रांच्या साप्ताहिक आवृत्त्या वगैरे ठिकाणी तुम्ही प्रयत्न करू शकाल. छापून आले तर आनंदच आहे; पण समजा नाही आले तरी निराश होऊ नका. यापूर्वी सांगितलेले भवभूतीचे वाक्य लक्षात ठेवा.

तुमचे लेखन वाचायला मलासुद्धा अर्थातच आवडेल. या पुस्तकाच्या प्रकाशकांच्या पत्त्यावर तुम्ही ते पाठवले तर ते मला मिळू शकेल. त्यातून हे पुस्तक तुम्हांला उपयोगी पडते आहे हे मला कळेल व आनंद होईल.

तुमच्या या प्रवासाला हार्दिक शुभेच्छा ! लक्षात ठेवा की हा प्रवास न संपणारा आहे. याला शेवटचा असा मुक्काम नाही. या प्रवासातले एक श्रेष्ठ यात्रिक कविवर्य कुसुमाग्रज यांनीच लिहिले आहे -

चालण्याचे श्रेय आहे अन्य धर्माचार नाही
चाललो कोठे ? कशाला ? ही हि आता खंत नाही
चालण्याला अंत नाही !

*** *** ***

शिक्षकांसाठी

वर्गात साहित्य–निर्मिती

या पुस्तकाचे शीर्षक वाचताच साहित्यप्रेमी शिक्षक कदाचित नाके मुरडतील. साहित्य-निर्मितीच्याच काय; पण प्रतिभा-विकसनाच्या कोणत्याही प्रयोगाच्या वाट्याला सकृत्‌दर्शनी तरी हेटाळणीच येते; कारण प्रतिभा ही पूर्वपुण्याईने एखाद्यालाच लाभणारी उपजत देणगी आहे, अशी आपली ठाम समजूत असते. विशेषत: काव्याच्या क्षेत्रात तर कवींनी आपल्या काव्यनिर्मितीच्या शक्तीभोवती आणि स्फूर्तीभोवती गूढतेचे विशेष वलयच उत्पन्न करून ठेवले आहे. मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरते कशी ! कवी-लोक 'देवाचे लाडके' असून ते जन्मावे लागतात, तयार करून होत नसतात, असे बजावले जाते आणि अशा कवींना कविता अचानक स्फुरणे ही एकच कविता-निर्मितीची खरीखुरी प्रक्रिया मानली जाते. त्यामुळे अर्थातच कोठेही कविता 'तयार केली जात' असल्याचा संशय जरी आला तरी ती क्षुद्र कविता ठरवून तिच्यात आणि तिच्या निर्मात्यावर हे कवी, समीक्षक तुटून पडतात ! 'हठादाकृष्टानां कतिपयपदानां रचयिता' अशा संस्कृत शालजोडीपासून 'ट-ला ट, री-ला री ! जन म्हणती काव्य करणारी ।।' अशा प्राकृत फटक्यापर्यंत अनेक प्रकारचे आहेर त्यांना दिले जातात. बाळकरामांनी तर आपल्या उपरोधिक शैलीने 'कवींचा कारखाना' च उघडून दाखवला आहे. तिकडे साहेबाच्या प्रांतातही कीट्सने "...ye, taught a school of dolts to smooth, inlay, and clip, and fit...' असे म्हणून 'शब्दसुतारांची शाळा' चालवल्याबद्दल पूर्वसूरींची हजेरी घेतलेली आहे.

पण.... काय हरकत आहे ?

अशा प्रकारच्या आक्षेपात खरोखरच किती तथ्य आहे? तर मुळात 'प्रतिभा म्हणजे उपजत देणगी' हे गृहीतच संपूर्णपणे खरे नाही. प्रतिभा जशी 'सहज' म्हणजे जन्मजात असते, तशीच ती 'उत्पाद्य' देखील असते असे संस्कृत काव्य-शास्त्रज्ञांनीही मान्य केलेले आहे. 'काव्यज्ञशिक्षयाऽभ्यास:' म्हणजे काव्य जाणणाऱ्या गुरूकडे शिक्षण घेऊन केलेला अभ्यास हासुद्धा काव्यनिर्मितीला अर्थात व्यापक अर्थाने ललित साहित्याच्या निर्मितीला कारणीभूत ठरतो, असे मम्मट म्हणतो. अकराव्या शतकातच क्षेमेंद्र नावाच्या काव्यशास्त्रज्ञाने 'कवि-शिक्षा-प्रकरणम्' हा ग्रंथ लिहून कवी होऊ इच्छिणाऱ्यांना पद्धतशीर मार्गदर्शन केले होते आणि विशिष्ट प्रशिक्षणाने प्रतिभेचा विकास होऊ शकतो असा आधुनिक मानसशास्त्रीय संशोधनाचाही निर्वाळा आहे.

काव्यनिर्मितीमधील उत्स्फूर्ततेचा निकषही दुराग्रही आहे. विशिष्ट हेतू किंवा मागणी पूर्ण करण्यासाठी स्व.'गदिमां'नी लिहिलेली गीतेही काव्यगुणसंपन्न आहेत, हे समीक्षकांनाही मान्य करावे लागले. इतकेच नव्हे, तर हुकमी प्रतिभेचे सिद्धहस्त कवी म्हणून त्यांचा गौरव झाला ! खरे तर, "The first line is given by God and I compose the rest of the poem" हे एका कवीचे आत्मनिवेदन अधिक प्रामाणिक वाटते आणि त्यातल्या 'God' च्या जागी 'अबोध मनातील चिंतना 'ची (Unconscious Incubation) स्थापना मानसशास्त्रज्ञांनी केलेली आहे. तेव्हा अहेतुक उत्स्फूर्तता आणि सहेतुक प्रयास यांच्यात प्रकारभेद नसून प्रमाणभेद आहे, असेच म्हटले पाहिजे. कलेमध्ये उत्स्फूर्तता अधिक असेल, तर विज्ञानामध्ये "One percent inspiration and ninety nine percent perspiration" अशी स्थिती असेल. असे जर आहे, तर भाषेच्या अध्यापनात ललित-साहित्य निर्मिती शिकवण्याचा समावेश असावा की नसावा ? निबंधलेखन चालते, मुद्द्यांवरून कथा-रचनाही चालते. परदेशात Language Arts,Creative Writing असे पाठ्यक्रम असतात. मग आपल्याकडच्या शालेय वर्गांतून साहित्य-निर्मितीचे प्रयोग करायलाच हरकत का असावी ?

अधिक विचार केल्यास साहित्य निर्मितीच्या अध्यापनाचे शैक्षणिक फायदे लक्षात येतील. तुलनेसाठी चित्रकलेचे अध्यापन घ्या. वर्गात चित्रकला शिकवताना प्रत्येक मुलगा मोठेपणी चित्रकार व्हावा, अशी काही आपली अपेक्षा नसते. चित्रे काढताना मुलांची निर्मितीची नैसर्गिक हौस भागावी; पुढच्या आयुष्यात सुशोभन, रंगसंगती इत्यादींच्या रूपात मुलांनी चित्रकलेचा वापर करावा आणि निर्मितीचा अनुभव घेतल्यामुळे त्यांच्यातील रसिकता सुजाण, डोळस बनावी, एवढीच आपली माफक उद्दिष्टे असतात. अशीच उद्दिष्टे साहित्य निर्मितीच्या अध्यापनातूनही साध्य करता येतील. यामुळे मुले दैनंदिन जीवनात भाषेचा अधिक सर्जनशील उपयोग करू लागतील. संभाषण, भाषण, पत्रलेखन, शुभेच्छा देणे, शीर्षके, घोषणा, आरोळ्या, विडंबन, जाहिराती, मंगलाष्टके आणि संचलनगीते यांसारखी प्रासंगिक पद्यरचना अशा अनेक माध्यमांतून हा आविष्कार होऊ शकेल. वसंत बापटांनी आपण लहानपणी असे करीत असल्याचे लिहून ठेवले आहे. याशिवाय अशा निर्मितीच्या अनुभवामुळे साहित्याचा आस्वाद घेण्याची क्षमता किंवा राजशेखराच्या शब्दात 'भावयित्री प्रतिभा' वाढेल आणि वर्गातील एकूण काव्यानुकूल वातावरणामुळे काही लाजरे बुजरे बालसाहित्यिक धीट बनतील आणि त्यांच्यातूनच उद्याचे साहित्यिक तयार होतील.

प्रायोगिक संशोधन

अशा विचारातूनच मी एकोणीसशे बहात्तरपासून प्रतिभेच्या विकासाच्या विविध पैलूंबाबत प्रायोगिक संशोधन करतो आहे. पहिल्या पाच वर्षांचे संशोधन पीएच.डी.साठी

होते आणि त्यांनतर त्या प्रयोगांच्या व्यापक उपयोजनासाठी पुण्यातील ज्ञान प्रबोधिनी प्रशालेच्या मुलामुलींच्या वर्गांमध्ये दर आठवड्याची एक तासिका यासाठी राखून ठेवलेली असे. प्रारंभी इ.५वी ते इ.९वीसाठी आणि नंतर इ.५वी ते इ.८वीसाठी या तासिका चार-पाच वर्षे मी स्वत: आणि नंतर माझ्या काही सहकाऱ्यांनी घेतल्या. त्यातल्या साधारण निम्म्या तासिका भाषेशी आणि साहित्याशी संबंधित अशा होत्या.

त्यानंतरच्या काळात 'नेतृत्व वर्धिनी', 'जागर', 'युवास्नेह', 'स्व-रूपवर्धिनी'इ. संस्थांच्या शिबिरांमधून मी ललित साहित्य निर्मितीचे असेच प्रयोग केले.

त्यानंतर शिक्षकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांसमवेत प्रयोग करणे, शिक्षकांनी त्याचे निरीक्षण करणे आणि नंतर फक्त शिक्षकांबरोबर पुढची चर्चा करणे,अशा स्वरूपाची शिबिरे घेतली. नाशिकचे 'सारडा कन्या विद्यालय'आणि इंदूरच्या 'देवी अहिल्या विश्वाविद्यालयाचा शिक्षणशास्त्र विभाग' यांनी अशी शिबिरे योजली. 'राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान प्रशिक्षण परिषद' (एन.सी.ई.आर.टी.मध्यप्रदेश) यांच्या विद्यमाने मध्यप्रदेशातील निवडक शिक्षकांसाठी 'पंचमढी' येथील 'सर्जनशील लेखन' शिबिर तर पूर्ण दहा दिवसांचे होते.

नंतरही आजपर्यंत अनेक शाळांनी आपापल्या शिक्षकांसाठी योजलेल्या दहा-पंधरा शिबिरांमध्ये मी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांतून या विषयाची सप्रयोग मांडणी केलेली आहे. प्रायोगिक संशोधनाचे निष्कर्ष वेळोवेळी विविध चर्चासत्रांमध्ये मांडून तावून सुलाखून घेतले आहेत. एन.सी.ई.आर.टी.ने पंचमढी शिबिराचा सविस्तर वृत्तान्त 'रुबरु' या नावाने हिंदीतून छापून प्रकाशित केलेला आहे.

कुण्डेश्वर (जि.टीकमगढ) हून या शिबिराला आलेले शिक्षक श्री.गुणसागर शर्मा यांनी, शिबिरात दिलेल्या विषयावर तिथेच रचलेली दीर्घ कविता नंतर 'चौकोर दुनिया' या नावाने पुस्तकरूपात प्रसिद्ध झाली.

हे सगळे सांगण्याचा हेतू इतकाच की या पुस्तकात सांगितलेले प्रयोग-पाठ आणि उपक्रम मी स्वत: आणि नंतर इतर अनेक शिक्षकांनी शालेय विद्यार्थ्यांसमवेत विविध भाषांतून घेऊन पाहिलेले आहेत. **शिक्षकांचा पुढाकार आणि प्रोत्साहन असेल तर ते यशस्वी होतात हे मी पाहिलेले आहे.** अशा सर्जनशील उपक्रमांमध्ये सहभागी झालेल्या मुलामुलींचा उत्साह आणि आनंद तर केवळ अवर्णनीय असतो. असा माझा सगळ्या ठिकाणचा अनुभव आहे.

प्रसिद्ध साहित्यिक श्री.दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी १९७६-७७ या दोन वर्षांत, वय वर्षे साडेतीन ते अकरा-बारापर्यंतच्या सुमारे दोन हजार अमेरिकन मुलामुलींसाठी 'सर्जनशील वाङ्मयाचे गुरुकुल' चालवण्याचा प्रयोग केला होता. हा अनुभव त्यांना 'समृद्ध आणि साक्षात्कारी स्वरूपाचा' वाटला ! म्हणून त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, '*आश्चर्याची गोष्ट हीच की ज्या मानवी मुलांची उपजत प्रतिभा*

वयाच्या चौथ्या वर्षापर्यंत शाळेत जाण्यापूर्वीच मातृभाषेची संपूर्ण जटिल आणि नियमा–अपवादांची बनलेली व्यवस्था समजून वापरू शकते, त्याच मुलांना वयात येईपर्यंत 'वाङ्मयाचं'व्याकरण समजता येणं इतकं कठीण का मानलं जावं?'

या प्रश्नाचं उत्तरही त्यांनीच पुढे दिलंय. *'माझ्या मते, मुलांना भाषा शिकवण्यात चुकीच्या वयात चुकीच्या गोष्टींवर भर दिला गेल्यामुळे, त्यांच्या उपजत भाषिक क्षमतेचा विकास होण्याऐवजी ती खुंटवली जाते. तसंच फार लहान वयात 'वाङ्मयीन' रूपांचा आणि रचनांचा बागुलबोवा त्यांना दाखवला जातो. ज्यांना चालता येतं त्यांच्या अंगी नाचण्याचीसुद्धा उपजत क्षमता असतेच !'* (वाङ्मय आणि नैसर्गिक प्रतिभा'- दिलीप पुरुषोत्तम चित्रे, रविवार सकाळमधील 'तिरकस आणि चौकस' या सदरातील लेख, २४ जुलै १९८८).

श्री.दि.पु.चित्रे यांच्या या निरीक्षणाचा सर्व भाषा-शिक्षकांनी अंतर्मुख होऊन विचार करायला हवा. ते निरीक्षण पटले आणि काही बदल करावासा वाटला, तर काय काय करता येणे शक्य आहे याची अनुभवसिद्ध मांडणी मी प्रस्तुतच्या पुस्तकात केलेली आहे.

असे प्रयोग इतर शाळांतूनही करता येतील, असे खात्रीने वाटते. वर्गातील विद्यार्थिसंख्या मोठी असल्यास खास कृतिसंशोधन प्रकल्प म्हणून किंवा सुट्टीतील शिबिरांमधून किंवा वाङ्मय-चर्चा-मंडळांतून निवडक विद्यार्थ्यांसमवेत ते योजता येतील. साहित्य-निर्मितीचा किंचित स्वानुभव असलेले अध्यापक ते योजू शकतील. समस्यापूर्ती व इतर साहित्य प्रकारांच्या स्पर्धा योजून या निर्मितीला प्रोत्साहन देता येईल. हस्तलिखिते, भित्तिपत्रके, शालेय नियतकालिके यांच्यामधून विद्यार्थ्यांचे साहित्य प्रकाशित झाल्यास या बाल साहित्यिकांना उत्तेजन मिळत राहील. अध्यापकांनी विद्यार्थ्यांसह इतर प्रसिद्ध साहित्यिकांची पुस्तके वाचली,कविसंमेलने ऐकली आणि नंतर त्यांचे मर्मग्राही रसग्रहण केले, तर विद्यार्थ्यांच्या साहित्याचा दर्जाही सुधारत जाईल.

ज्या शिक्षकांना या विषयाची मानसशास्त्रीय पार्श्वभूमी समजावून घ्यायची असेल ते 'सर्जनशीलता' हे डॉ.म.बा.कुंडले यांनी लिहिलेले आणि पुण्याच्या नूतन प्रकाशनाने प्रकाशित केलेले पुस्तक आणि 'अ टेस्ट ऑफ लिटररी क्रिएटिव्हिटी इन मराठी' ही त्यांनीच तयार केलेली कसोटी पाहू शकतील.

तेव्हा मराठी भाषिक शिक्षकांना माझे असे आवाहन आहे की त्यांनी ललितलेखन या 'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवासा'स विद्यार्थ्यांना उद्युक्त करावे. त्यासाठी तुम्हांला हे पुस्तक उपयोगी पडू शकेल. या पुस्तकातल्या सूचनांनुसार तुम्ही स्वतंत्र पाठसुद्धा तयार करू शकाल. शेवटी, तुमच्या प्रतिक्रियांचे आणि सूचनांचे स्वागतच असेल.

*** *** ***

परिशिष्ट

प्रतिभा आणि कल्पकता

'प्रतिभावंत व्यक्ती' असे म्हटले की तुमच्या डोळ्यांसमोर कोणकोण उभे राहतील? रवींद्रनाथ ठाकूर किंवा कुसुमाग्रज यांच्यासारखे कवी किंवा लेखक, राजा रविवर्मा किंवा मक्बूल फिदा हुसेन यांच्यासारखे चित्रकार, कुमार गंधर्व किंवा पंडित रविशंकर यांच्यासारखे संगीतकार, आर.के.लक्ष्मण किंवा पु.ल.देशपांडे यांच्यासारखे विनोदकार, सत्यजित राय किंवा मणिरत्नम् यांच्यासारखे चित्रपट दिग्दर्शक, बिरजू महाराज किंवा उदय शंकर यांच्यासारखे नर्तक, संजीवकुमार किंवा कमलहासन यांच्यासारखे नट, ... काही शिल्पकार, काही वास्तुशिल्पी...

पुष्कळदा कलेच्या या विविध क्षेत्रांत काहीतरी नवीन, मौलिक (ओरिजिनल) आणि मोलाची भर घालणाऱ्यांनाच प्रतिभावंत म्हटले जाते आणि त्यामुळे 'प्रतिभा' म्हणजे साहित्याच्या, कलेच्या क्षेत्रात नवीन भर घालण्याची क्षमता असाच अर्थ लावला जातो. काहीजण आणखी पुढे जाऊन जगदीशचंद्र बसू किंवा जयंत नारळीकर अशा, विज्ञानाच्या क्षेत्रात नवीन भर घालणाऱ्या शास्त्रज्ञांनाही प्रतिभावंत म्हणतात. ते बरोबरच आहे ; कारण प्रतिभा म्हणजे काहीतरी नवीन किंवा अपूर्व निर्माण करण्याची क्षमता, मग क्षेत्र कोणतेही असो.

एखादी अभिनव साहित्यकृती, कलाकृती किंवा वैज्ञानिक शोध कुठून आणि कसा जन्माला येतो ? अर्थातच त्या प्रतिभावंताच्या मनातून आणि म्हणून प्रत्यक्ष कलाकृतीची रचना करताना चित्रे काढणे व रंगवणे, दगड कोरणे, वाद्य वाजवणे इत्यादींसारखी शारीरिक कौशल्ये आवश्यक असली तरी मुळात प्रतिभा म्हणजे ही कौशल्ये नव्हेत, तर ती वापरण्याला सुरुवात करण्यापूर्वीची बुद्धीची क्षमता होय. आधुनिक मानसशास्त्रज्ञांप्रमाणेच प्राचीन भारतीय काव्यशास्त्रज्ञांनीही तसेच म्हटलेले आहे. इसवी सनाच्या दहाव्या शतकात होऊन गेलेल्या भट्टतौत नावाच्या काश्मिरी पंडिताने आपल्या 'काव्यकौतुक' या ग्रंथात प्रतिभेची व्याख्याच अशी केली आहे-

प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता ।

अर्थात जिला नित्य नवीन धुमारे फुटत असतात अशी बुद्धी म्हणजे प्रतिभा. हे धुमारे अर्थातच नवीन विचार, नवीन कल्पना किंवा नवीन प्रतिमा यांचे असतात. म्हणजेच साहित्य, कला किंवा विज्ञान यांच्यातल्या एखाद्या क्षेत्रात सतत नवीन कल्पना सुचत असणे आणि त्या कल्पनांचे रूपांतर साहित्यकृती, कलाकृती किंवा शास्त्रीय शोध यांच्यामध्ये करता येणे म्हणजे प्रतिभा.

प्रतिभेचे समीकरण

या प्रतिभेचे वर्णन एका समीकरणाच्या रूपात केले जाते. ते असे -

प्रतिभा = ज्ञान X कल्पनाशक्ती X चिकित्सक विचार

ज्या क्षेत्रात नवीन भर घालायची त्या क्षेत्रातील मूलभूत माहिती आणि कौशल्ये हा प्रतिभेचा पहिला घटक, तो म्हणजे जणू नवनिर्मितीचा कच्चा माल किंवा नवरचनेचा पाया. दुर्दैवाने पुष्कळदा शिक्षण या पायापाशीच थबकते. माहितीचे साठे डोक्यात कोंबले जातात आणि कौशल्ये घटवून घेतली जातात. त्यातून फक्त पढीक पंडित तयार होतात.

प्रतिभेचा तिसरा घटक म्हणजे चिकित्सक विचार, चिकित्सा करणे म्हणजे चांगले किंवा वाईट, सुंदर किंवा विद्रुप, खरे किंवा खोटे हे ठरवणे आणि त्यातून योग्य त्याची निवड करणे. त्यासाठीचा विचार हासुद्धा सर्वसाधारणपणे आपल्या ओळखीचा असतो. ही विचारशक्ती काही वेळा अनुभवातून तयार होते, तर काही वेळा अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शनातून. ज्ञान आणि चिकित्सकपणा हे दोन्ही असेल तर माणूस रसिक किंवा समीक्षक होऊ शकतो; पण तो स्वत: नवनिर्मिती करू शकत नाही. एखाद्या कलावंताने नवनिर्मिती केल्यावरच तो त्या कलाकृतीबद्दल आपला अभिप्राय देऊ शकतो.

समीकरणातला प्रतिभेचा दुसरा घटक कल्पनाशक्ती हा खरोखरी गाभ्याचा घटक आहे. कल्पनाशक्ती म्हणजे कल्पना सुचण्याची शक्ती. ज्ञानाचा पाया असला तर अर्थपूर्ण कल्पना सुचतील. तो नसला तर नुसत्याच कल्पनाशक्तीमुळे सुचणाऱ्या कल्पना असंबद्ध किंवा निरर्थक असतील. नशेत असलेल्या माणसाच्या कल्पनाशक्तीला असला बहर आलेला असतो ! अशा कल्पनांबद्दलच लोकमान्य टिळक एकदा म्हणाले होते, ''*कल्पना, कल्पना काय ? दिडकीची अफू घेतली की हव्या तितक्या कल्पना!*''

पण फक्त ज्ञान आणि कल्पनाशक्ती एवढ्यानेही भागत नाही. स्वत:लाच सुचलेल्या असंख्य कल्पनांमधून पुढे विकास करण्यासाठी योग्य अशा कल्पना निवडण्यासाठी कलावंताकडे चिकित्सकपणासुद्धा हवा; म्हणूनच समीकरणात तिन्ही घटकांचा गुणाकार दाखवलेला आहे. एक घटक जरी शून्य असला तरी फलित शून्यच !

काही वेळा विशिष्ट कलागुण किंवा क्रीडागुण (टॅलंट) यांना उद्देशूनही 'प्रतिभा' असा शब्द वापरतात. म्हणजे एखादा मुलगा लहानपणीच तबला वाजवू लागला किंवा एखादी मुलगी लहानपणीच वेगात पोहू लागली तर त्यांचा उल्लेख प्रतिभाशाली मुले असा केला जातो; पण ते बरोबर नाही. केवळ असे एखादे उत्तम कौशल्य म्हणजे त्या क्षेत्रातली प्रतिभा नव्हे. फार तर त्याला प्रतिभेचे मूळ भांडवल म्हणता येईल; पण जोपर्यंत त्या क्षेत्रात नवनिर्मिती केली जात नाही, तोपर्यंत प्रतिभा हा शब्द वापरता येणार नाही.

नवीन कल्पना कशा सुचतात ?

संजीवनी मराठे यांनी एका कवितेत असे म्हटले आहे -

मी न कुणाला सांगायाची कविता स्फुरते कशी
कशी अचानक जनी प्रकटते मनातली ऊर्वशी ।।

बहुतेक प्रतिभावंतांचे म्हणणे असेच असते की नवीन कल्पना कुठेही, कशाही अचानक स्फुरतात. हे कसे होते ते सांगता येत नाही. 'प्रतिभा' या शब्दाची फोडसुद्धा त्याच अर्थाची आहे. 'भा' म्हणजे तेज आणि प्रतिभा म्हणजे अचानक प्रकटलेले किंवा अचानक चमकून जाणारे तेज.

काही लेखक, कलावंत किंवा शास्त्रज्ञ आपल्या नवनिर्मितीची प्रक्रिया उलगडून सांगू शकतातही. तरीसुद्धा या अचानक स्फुरण्यामुळे प्रतिभेभोवती एक गूढतेचे वलय उत्पन्न झाले. मग स्फूर्तीचा झटका, सत्याचे किंवा सौंदर्याचे क्षणात चमकून जाणारे दर्शन, 'झटिति-प्रत्यय' हेच जणू प्रतिभेचे एकमेव किंवा सगळ्यांत मुख्य लक्षण मानले जाऊ लागले. त्यामुळे प्रतिभा ही दैवी देणगी मानली जाऊ लागली आणि प्रतिभावंत स्वत:ला 'देवाचे लाडके' मानू लागले. त्यातूनच असाही समज रूढ झाला की स्फूर्तीने झपाटलेल्या अवस्थेत हातून जणू काही आपोआप झालेली नवनिर्मिती ही श्रेष्ठ दर्जाची आणि जाणीवपूर्वक, प्रयत्नपूर्वक केलेली नवनिर्मिती ही दुय्यम दर्जाची.

शुद्ध प्रतिभा आणि उपयोजित प्रतिभा

उत्स्फूर्त नवनिर्मिती केली जाण्याच्या शक्तीला 'शुद्ध प्रतिभा' असे म्हटले जाऊ लागले. शुद्ध प्रतिभेमुळे होणारी निर्मिती नेणिवेच्या पातळीवर होणारी,त्यामुळे तिच्यासाठी कोणताही व्यावहारिक हेतू किंवा प्रयोजन नाही. साहित्यिकांच्या आणि कलावंतांच्या बाबतीत 'आत्माविष्कार' म्हणजेच स्वत:ला घडलेले सौंदर्याचे दर्शन किंवा आपल्या मनातली भावभावनांची खळबळ शब्दांत, रंगरेषांत किंवा सुरांत व्यक्त करणे एवढाच त्यांच्या निर्मितीचा हेतू. तर वैज्ञानिकांच्या बाबतीत निसर्गातल्या सत्याबद्दलचे आणि तत्त्वज्ञांच्या बाबतीत सृष्टीच्या गूढ अर्थाबद्दलचे कुतूहल एवढीच त्यांच्या निर्मितीची प्रेरणा. ते सौंदर्य, ते सत्य किंवा तो अर्थ जिच्या आधाराने पाहता येईल अशी रचना मुळात असतेच. प्रतिभावंत फक्त ती शोधून काढतो, 'डिस्कव्हर' करतो ! त्यामुळे त्याला होणारा उच्च प्रतीचा आनंद हेच त्याचे मुख्य बक्षीस !

या उलट उपयोजित प्रतिभेच्या बाबतीत काही तरी हेतू किंवा प्रयोजन प्रतिभावंतांच्या मनात आधीपासूनच असते असे मानले जाते. साहित्याच्या क्षेत्रात वाचकांच्या मनोरंजनासाठी विशिष्ट रसाची निर्मिती करणे, रचनेचे वेगवेगळे प्रयोग जाणीवपूर्वक करणे किंवा एखाद्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करणे आणि विरोधी तत्त्वज्ञानावर टीका करणे किंवा

त्याची टवाळी करणे असे हेतू असू शकतात. त्यातून प्रचारकी वाङ्मय, स्फूर्तिगीते, भावगीते, भक्तिगीते, विडंबन-कविता, विशिष्ट प्रकारच्या माणसांबद्दलच्या विशिष्ट दृष्टिकोनातून लिहिलेल्या कथा किंवा कादंबऱ्या, मुद्दाम ठरवून गझल किंवा हायकू असे रचनाप्रकार वगैरे साहित्य लिहिले जाते.अगदी व्यावहारिक पातळीवर लग्नातली मंगलाष्टके किंवा एखाद्या उत्पादनाच्या जाहिरातीसाठीची गीते आणि चित्रपटगीते यांची रचना केली जाते. कलांच्या क्षेत्रामध्ये कलावस्तू विकत घेणाऱ्या ग्राहकाचा कल किंवा अपेक्षा लक्षात घेऊन सजावटीच्या किंवा शोभेच्या कलावस्तूंची निर्मिती केली जाते. वास्तू बांधल्या जातात किंवा संगीत-दिग्दर्शन केले जाते. साहित्याप्रमाणेच कलासुद्धा प्रचारासाठी वापरली जाते. कधी तो प्रचार कलावंताने स्वत:हून पत्करलेल्या तत्त्वज्ञानाचा असेल, तर कधी ती एखाद्या कारखानदाराच्या मालाची जाहिरात असेल. ललित वाङ्मयाचे एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतर करणे किंवा रूपांतर करणे किंवा कादंबरीचे नाटकांत 'प्रकारान्तर' करणे हीदेखील उपयोजित प्रतिभेचीच कामे म्हटली पाहिजेत; म्हणून तर चांगल्या अनुवादाला 'ट्रान्सलेशन' ऐवजी 'ट्रान्सक्रिएशन' म्हटले जाते.

विज्ञानाच्या क्षेत्रात उपयोजित प्रतिभा तंत्रज्ञानाचे किंवा अभियांत्रिकीचे रूप धारण करते. माणसाची एखादी गरज जाणवणे ही तिची सुरुवात असते; म्हणूनच 'गरज ही शोधाची जननी आहे' असे म्हटले जाते. या म्हणीतल्या शोध या शब्दाचा अर्थ 'डिस्कव्हरी' असा नसून 'इन्व्हेन्शन' असा आहे. आकाशवाणी, दूरदर्शन, दूरध्वनी, बायोगॅस हे सगळे या अर्थाने 'शोध' आहेत. आधीच तयार केल्या गेलेल्या एखाद्या उपकरणातील त्रुटी लक्षात आल्यामुळे त्यात केलेल्या सुधारणा (इनोव्हेशन) किंवा एखाद्या तात्कालिक समस्येसाठी प्रसंगावधान दाखवून शोधलेले चतुर उत्तर यांचाही समावेश त्यातच करता येईल. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात मार्क्सवाद, समाजवाद किंवा राष्ट्रवाद अशा एखाद्या विचारप्रणालीची उभारणी करणे आणि पारंपरिक पवित्र ग्रंथांचा नव्या काळाच्या गरजांनुसार वेगळा अर्थ लावून दाखवणे आणि अगदी व्यावहारिक पातळीवर एखाद्या पक्षकाराचे वकीलपत्र घेऊन रूढ कायद्याचा वेगळ्या प्रकारे अर्थ लावून युक्तिवाद करणे(रीइंटरप्रिटेशन) यांचा समावेश उपयोजित प्रतिभेत करता येईल.

शुद्ध प्रतिभेत जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न नसतात असे समजले जाते. हे कलावंत किंवा वैज्ञानिकसुद्धा संवेदनशीलतेने अनुभव घेणे आणि चौकस निरीक्षण करणे अशी 'साधना' करीत असतात; पण निदान अमुक अनुभवाची परिणती तमुक कलाकृतीमध्ये किंवा अमुक निरीक्षणाचे फलित तमुक सिद्धांतामध्ये आपण करायचे किंवा ते तसे होईल असे पाहायचे असे गणिती आडाखे बांधत असलेले दिसत नाहीत. उलट उपयोजित प्रतिभेत ठरवून केलेली खटपट किंवा प्रयोग असतात. अमुक परिणाम साधायचा असे ठरवून केलेली कलाकृतीची रचना आणि त्यासाठी लागेल तितक्या वेळा तिच्यामध्ये दुरुस्त्या, विशिष्ट गरज पूर्ण करण्यासाठी संशोधन-प्रकल्पाची आखणी असा

प्रकार तिथे असतो; पण झालेली असो किंवा केलेली असो, त्या निर्मितीत नावीन्य असणे ही प्रतिभेच्या दोन्ही प्रकारांमधली सामायिक अट असते.

उपयोजित प्रतिभा म्हणजेच कल्पकता

शुद्ध आणि उपयोजित प्रतिभेत श्रेष्ठ आणि कनिष्ठ ठरवणे खरे म्हणजे अवघड आहे. दोन्ही प्रकारच्या प्रतिभावंतांच्या निर्मितीमध्ये एक टक्का स्फूर्ती आणि नव्याण्णव टक्के परिश्रम (वन परसेंट इन्स्पिरेशन अँड नाइंटीनाइन परसेंट पर्स्पिरेशन) असे असू शकते आणि न्यूटनने जसे मानवजातीचे भले केले आहे तसेच एडिसननेही केले आहे! तरी पण उत्स्फूर्तपणाचे आकर्षण जबरदस्त असल्यामुळे उपयोजित प्रतिभेच्या बाबतीत 'प्रतिभा' हा शब्द वापरणे हेसुद्धा पुष्कळांना त्या शब्दाचे अवमूल्यन वाटते ! अशा लोकांच्या समाधानासाठी मी उपयोजित प्रतिभेसाठी 'कल्पकता' असा शब्द वापरतो आहे. कल्पकतेचा विकास हाच 'कल्पक बून या' या पुस्तकाचा मुख्य विषय आहे. प्रतिभा आणि कल्पकता या दोन्हीला मिळून अलीकडे काही लेखक 'सर्जनशीलता' असा शब्द वापरतात; पण मला तो काहीसा कृत्रिम वाटतो. 'सृजनशीलता' असा शब्द मात्र संस्कृत शब्दसिद्धीच्या नियमांनुसार चूकच आहे. सृजन नव्हे, सर्जन हवे.

प्रतिभेची मूलभूत क्षमता सगळ्यांमध्येच

प्रतिभेची ही क्षमता सगळ्याच मानसिकदृष्ट्या निरोगी असलेल्या मुलांमध्ये असते. प्रमाण कमीजास्त असेल, इतकेच काय ते. मुलांच्या दैनंदिन वागण्यामध्ये अनेक प्रकारे या क्षमतेचा आविष्कार होताना दिसतो. मुले बोलायला शिकतात तेव्हा पहिल्यांदा मोठ्या माणसाचे अनुकरण करतात. त्यांनी शिकवलेल्याची पोपटपंची करतात; पण शब्दसंपत्ती पुरेशी साठली आणि शब्दांच्या रूपांतराचे आणि वाक्यरचनेचे काही ढोबळ नियम त्यांना अनुमानाने शोधून काढता आले, की मुले भराभर आपल्या मनाने वाक्ये जुळवायला लागतात. अशा वेळी 'पाणी भरते, पाणी भरलं' या वाक्याबरहुकूम वाक्य बनवताना 'झुरळ मरते, झुरळं मरलं' अशा 'तर्कशुद्ध' चुकाही ती करतात; पण नवी वाक्ये जुळवत राहतात. भातुकली किंवा शाळा-शाळा खेळताना मुले एकीकडे मोठ्यांच्या वागण्याचे अनुकरण करत असतात; तर त्याच वेळी आपली कल्पनाशक्ती वापरून मेजाखालच्या जागेचे घरात आणि फुलपात्र-चमच्याचे घंटेत रूपांतर करून मजेशीर पर्यायही शोधत असतात. हीच प्रतिभा पुढे चांदोबाकडे अनिमिष नेत्रांनी बघणारी सौंदर्यदृष्टी, आजोबांची टोपी आपल्या डोक्यावर ठेवून हसत सुटणारी विनोदबुद्धी, दाराआड लपून एकदम ओरडून आईला घाबरवणारा खोडकरपणा, खोडी करताना पकडले गेल्यावर वेळ मारून नेणारे प्रसंगावधान, पाहुण्यांच्या तिरकस प्रश्नांना बिनतोड उत्तरे देणारा हजरजबाबीपणा आणि पाहुणे गेल्यावर त्यांची नक्कल करणारा गमत्या स्वभाव, मित्रांचे टोळके जमवणारे चातुर्य अशा अनेक प्रकारांनी व्यक्त होत असते.

प्रतिभेचा आणि कल्पकतेचा विकास शक्य

प्रतिभेतल्या गूढ वाटणाऱ्या स्फूर्तीचा, त्यातल्या अबोध मनाच्या कार्याचा मानसशास्त्रज्ञांनी छडा लावला आहे. त्याच्या खोलात आपण येथे जाणार नाही आणि उरलेला परिश्रमांचा भाग तर जाणीवपूर्वक करायचाच असतो. त्यामुळे त्यांचा विकास घरातले, शाळेतले आणि समाजातले वातावरण नवनिर्मितीला अनुकूल ठेवून आणि नव्याने शोधली गेलेली विचार करण्याची, तर्कावर आधारित (रॅशनल) किंवा तर्काला मुद्दाम झुगारून देणारी (नॉन-रॅशनल) तंत्रे विद्यार्थ्यांना शिकवून करता येतो असा मानसशास्त्रीय संशोधनाचा निर्वाळा आहे. हे प्रशिक्षण घेण्यास वयाचीसुद्धा काही अट नाही. मनाचा लवचिकपणा टिकून असला म्हणजे झाले ! सुरुवातीला ही तंत्रे सर्वसाधारण माहितीचा वापर करून शिकता येतात आणि नंतर आपल्याला हव्या त्या क्षेत्रात त्यांचा प्रत्यक्ष वापर करता येतो.

विकसित कल्पकतेचा वापर

प्रत्येक व्यक्तीला आपल्यातल्या प्रतिभेच्या किंवा कल्पकतेच्या सुप्त सामर्थ्याची जाणीव व्हावी, तिने त्या सामर्थ्याचा विकास करून घ्यावा आणि मग ती विकसित कल्पकता आपल्या क्षेत्रात काही नवीन आणि विधायक भर घालण्यासाठी वापरावी यातच या संशोधनाची फलश्रुती आहे.

नव्याची प्रस्थापना करण्यासाठी सुरुवातीला 'जुने जाउ द्या मरणालागुनि ! जाळुनि किंवा पुरुनी टाका !' अशा आवेशाने कदाचित काही मोडतोड करावी लागते; पण केवळ तिथेच न थांबता नवरचनाही व्हायला हवी. तिच्या पाठीमागे चांगल्या मूल्यांची बैठक हवी. ती नसली तर हीच कल्पकता छळ छावण्यांमध्ये यातना देण्याच्या अधिकाधिक क्रूर युक्त्या शोधून काढते, शेअर बाजारात कोट्यवधींचा घोटाळा घडवून आणते किंवा जगभरातले संगणक आजारी पडावेत म्हणून त्यांच्यात 'विषाणू' सोडून विकृत आनंद उपभोगते ! ते न व्हावे !

*** *** ***

होइल लिहुनी कविता ....

खोल मनाच्या गुहेत जाता,
सळसळणारे नाग
फणा काढतिल फूत्कारांनी
विणतिल मायाजाल
धुक्यातल्या यक्षिणी नाचतिल
हाती घेउनि आग
आच लागुनि हिमनग ढळतिल
वाहिल झुळझुळ पाणी
त्या पाण्यातुन जन्मा येतिल
मंजुळ मंजुळ गाणी
शब्दहि सुचतिल, जुळतिल ओळी
गुणगुणता गुणगुणता
नसेल लिहिली जरी आजवर
होइल लिहुनी कविता

कल्पक बनू या

'प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास' या पुस्तकाच्या बरोबरीनेच प्रकाशित झालेले याच लेखकाचे, 'कल्पनाशक्ती कशी वाढवायची ?' याचा मूलमंत्र सांगणारे

'कल्पक बनू या' हे पुस्तक आवर्जून वाचावे.
त्या पुस्तकाची ही थोडक्यात ओळख !

प्रत्येकातच उपजत असलेल्या कल्पकतेचा
विकास करता येतो का ?
हा प्रश्न ज्याच्या मनात आहे
अशा प्रत्येकाने अभ्यासायलाच हवे असे पुस्तक !
या पुस्तकाच्या लेखनामागे
एक मानसशास्त्रीय आणि शिक्षणशास्त्रीय भूमिका आहे.
प्रयोगांची पार्श्वभूमी आहे.
सुजाण पालक, कल्पक शिक्षक, जिज्ञासू विद्यार्थी
आणि कल्पक बनू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला
हे पुस्तक मार्गदर्शक ठरू शकेल.
संवेदनशीलता जागी ठेवली,
चौकस निरीक्षण केले,
कल्पनाविहार करायला लागलात,
आणि बहुदिश विचार करायला शिकलात,
तर तुम्हीही कल्पक बनू शकता !
त्यासाठीचे अनेक कृतिपाठ या पुस्तकात तुम्हांला आढळतील .
या पुस्तकात दिलेल्या तंत्राबरोबरच
त्याच्या आत दडलेला मंत्र
जेव्हा तुमच्या कल्पकतेला दिसेल
तेव्हा उद्याचे कलावंत, शास्त्रज्ञ, समाजसुधारक,व उद्योजक...
निर्माण होतील,
असा लेखकाचा दृढविश्वास आहे.

ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक प्रकाशने

१. **व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत** रु. ६०/-
(सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी समग्र मांडणी)

२. **नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत?** रु. ५०/-
(प्रकल्पांसंबंधी अनुभवातून लिहिलेले पुस्तक)

३. **प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास** रु. ५०/-
(ललित लेखन कसे करावे याचा मूलमंत्र देणारे पुस्तक)

४. **कल्पक बनू या** रु. ७०/-
(कल्पनाशक्ती वाढविण्याची गुरूकिल्ली सांगणारे पुस्तक)

५. **असे घटते सुंदर अक्षर** रु. १०/-
(हस्ताक्षर सुधारण्यासाठी कृतिपुस्तिका)

६. **हसत खेळत बुद्धिविकास** रु. १००/-
(बुद्धिच्या विविध पैलुंसाठी विविध खेळ)

७. **छंद आकाश दर्शनाचा** रु. ५०/-
(आकाशातील नक्षत्रे-ताऱ्यांचा परिचय)

८. **प्रज्ञाबोध मालिका - ५ पुस्तकांचा संच** रु. २००/-
(राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेसाठी उपयुक्त - दोन्ही माध्यमांमध्ये)

९. **वेध यशाचा** रु. ७५/-
(स्वत:चा अभ्यास स्वत: करण्यासाठी उपयुक्त तंत्रे)

१०. **बुद्धीवैभव** रु. २०/-
(बुद्धीचे १२० पैलू उलगडून सांगणारे पुस्तक)

११. **गिर्यारोहणगाथा** रु. ४०/-
(गिर्यारोहणाची प्राथमिक माहिती व प्रेरणा देणारे पुस्तक)

१२. **प्रबोधन गीते- भाग:२ ध्वनिफीत** रु. ४०/-
(ज्ञान प्रबोधिनीतील स्फूर्तिगीते)

इतरही अनेक पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर

नियतकालिके

१. **छात्र प्रबोधन** वार्षिक वर्गणी : रु. १२५/-
(कुमारांसाठी अभिनव मासिक)

२. **प्रशिक्षक** वार्षिक वर्गणी : रु. ४०/-
(शिक्षकांसाठी द्वैमासिक)

● **संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०. ☎ (०२१२) ४७८०९५

आपल्याकडच्या शालेय अभ्यासक्रमात
चित्रकलेला स्थान आहे, संगीताला आहे, हस्तकलांना आहे;
पण ललितलेखन कलेला मात्र नाही !
ते का नसावे ?
या अस्वस्थतेतून लिहिले गेलेले पुस्तक !

प्रतिभा उपजत असते आणि तिचा विकास
ज्याने त्याने आपला आपण चुकत माकत करायचा असतो,
ही गैरसमजूत आधुनिक मानसशास्त्राने खोटी ठरविली आहे.
प्रत्येकामध्येच प्रतिभेचे बीज असते.
पद्धतशीरपणे प्रयत्न करून त्या बीजाचा विकास करता येतो.
स्वतः लेखकाने गेली २०-२५ वर्षे याच क्षेत्रात केलेल्या
संशोधन आणि प्रयोगांवर आधारलेले पुस्तक !

शब्दांशी दोस्ती करत,
कविता, गाणी, गोष्टी, संवाद, विनोद अशा
साहित्यप्रकारांचे लेखन करण्याचे
तंत्र अन् मंत्र सोदाहरण स्पष्ट करणारे पुस्तक !

शालेय विद्यार्थी, किंबहुना ललित लेखन करू इच्छिणाऱ्या
कोणत्याही वयातील व्यक्तीला कृतिपुस्तिकेप्रमाणे
एकलव्याच्या पद्धतीने वापरता येईल असे पुस्तक !

तुमच्यातल्या सुप्त प्रतिभेला
चांगली जागी करून कामाला लावण्यासाठी
लिहिलेले प्रतिभेच्या प्रांतातील अभिनव पुस्तक !